
अनिकेत समुद्र
अलवणी

# अलवणी

## अनिकेत समुद्र

ई साहित्य प्रतिष्ठान

अलवणी (कादंबरी)

लेखक : अनिकेत समुद्र
Phone no. 9604602448
Email: aniket.com@gmail.com
ब्लॉग 'डोक्यात भुणभुणणारा मराठी भुंगा'
(http://manaatale.wordpress.com)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

9869674820

प्रकाशन :१५ सप्टेंबर २०१६

©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईवानगी घेणे साहित्य प्रतिष्ठानची पर- आवश्यकआहे.

# मनोगत

आकाश नावाचा एक लेखक. भोरच्या एका जुन्या घरात आकाश आपल्या कुटुंबासह सुट्टीसाठी दाखल होतो. सुट्टी-परी सुट्टी आणि अडकलेले पुस्तकाचे लेखन असा दुहेरी विचार त्याच्या डोक्यात असतो. पण घडते भलतेच. त्या घरात अडकलेल्या अतृप्त शक्ती त्याच्या पत्नीच्या, शाल्मलीच्या शरीराचा ताबा घेतात. जाणकार रामुकाका अचानक घरातुन निघून जातात, पण नशिबाने त्याचा जिवलग मित्र, जयंता मदतीला धावुन येतो.

पुढे काय होते? कोण असतात त्या अदृश्य शक्ती? रामुकाका कुठे निघून जातात. अनेक प्रश्नांची उत्तरांची उकल थरारक आणि घाबरवणाऱ्या प्रसंगांनी होते.

गुगल प्ले-स्टोअर वरुन लाखभरापेक्षा जास्त वेळा डाऊनलोड झालेल्ली आणि वाचकांच्या पसंतीस उतरलेली ही भयकथा आता ई-साहीत्य प्रतिष्ठानच्या वाचकांना भयभीत करण्यासाठी सज्ज आहे.

मी अनिकेत समुद्र, पक्का पुणेकर (!), व्यवसायाने संगणक अभियंता, पुण्यातीलच एका संगणक कंपनीत कार्यरत. फोटोग्राफ़ी आणि लेखनाची आवड जोपासायला आवडते. माझा ब्लॉग 'डोक्यात भुणभुणणारा मराठी भुंगा' http://manaatale.wordpress.com ला स्टार-माझा (आताचा एबीपी माझा) तर्फ़े पारीतोषिक मिळाले होते.



अर्पणपत्रिका

हे पुस्तक

माझ्या ब्लॉगच्या असंख्य वाचकांना अर्पण

ज्यांनी वेळोवेळी मला प्रतिक्रिया देऊन

माझ्या लेखनाचा हुरुप वाढवला

अनिकेत समुद्र

ही कादंबरी पूर्णतः काल्पनिक असून त्यांचा कोणत्याही जिवीत वा मृत व्यक्ती, स्थळ वा घटनांशी संबंध नाही. ही कादंबरी निखळ मनोरंजनासाठी आणि काही सामाजिक संदेश देण्यासाठी असून त्यातून कोणतीही अंधश्रद्धा वा भिती पसरवण्याचा लेखक वा प्रकाशक यांचा हेतू नाही.

या कादंबरीतील काही भाग बारा वर्षांखालील मुलांना वाचण्यासाठी पालकांचे मार्गदर्शन असणे योग्य होईल.

# अलवणी

लेखक – अनिकेत समुद्र

ट्रींग ट्रींग... ट्रींग ट्रींग.....

ट्रींग ट्रींग... ट्रींग ट्रींग........

ट्रींग ट्रींग...

पुर्वाश्रमीचा अभियंता आणि आता एक उभरता लेखक 'आकाश जोशी' अर्थात 'अक्की' चा फोन वाजत होता.

आकाश आपल्या संगणकावर कथेची पानं प्रुफ-रीड करत होता. कामात असताना आणि विशेषतः कामात लिंक लागलेली असताना मध्ये अध्ये कुणाची लुडबुड त्याला सहसा खपत नसे, पण भ्रमणध्वनीवर त्याचा जिवश्च-कंठश्च, बालपणापासूनचा मित्र 'जयंत पेठकरचा' नंबर बघून आकाशला रहावले नाही.

आकाश आणि जयंत लहानपणापासूनचे एकमेकांचे मित्र, एकाच शाळेत, एकाच कॉलेजातून त्यांनी शिक्षण पुर्ण केले. दोघेही अभियंते झाले पण दोघांचाही कलाक्षेत्राकडे विशेष ओढा होता आणि त्यामुळेच दोघांचेही कामात लक्ष लागेना. मग प्रथम आकाश आणि पाठोपाठ जयंत नोकरीचा राजीनामा देऊन बाहेर पडले.

आकाश लेखनात उतरला तर जयंत शॉर्ट फिल्म मेकींग मध्ये.

“बोला राजे.. कशी काय आठवण काढलीत??”, आकाश म्हणाला…

“तुझ्या त्या खुरट्या दाढीवरून हात फिरवणं बंद कर आधी..”, जयंत म्हणाला.

आकाश समोर नसला तरी फोनवर बोलताना आपल्या खुरट्या दाढीवरून हात फिरवत बोलण्याची त्याची लकब जयंताला चांगलीच ठाऊक होती. फक्त हेच काय दोघांच्याही सवयी एकमेकांना चांगल्याच ठाऊक होत्या. दोघांमध्ये फरक एकच होता तो म्हणजे आकाशचे लग्न होऊन सात एक वर्ष होऊन गेली होती, त्याला एक ६ वर्षाचा गोंडस मुलगा होता, तर जयंत मात्र अजूनही एकटाच होता.

“बरं, केलं बंद.. बोल, कशी आठवण काढलीस?”, आकाश म्हणाला

“आम्ही कश्याला तुमची वेगळी आठवण काढू? तुम्ही तर नेहमी आमच्या मनातच असता, तुम्हाला आमची आठवण रहावी म्हणून फोन केला..”, जयंत आकाशची खिल्ली उडवत म्हणाला.

“का थट्टा करता राजे.. अहो तुम्हाला कोण विसरेल? आणि तुमचं तर आता फिल्ममध्ये करीयर सुरु होते आहे. तुमच्याशी ओळख ठेवावीच लागणार..”, आकाश

“हम्म.. तुम्ही पडलात संसारी लोकं, संसारात गुरफटलेले, आम्ही काय मोकाट सोडलेले वळु. म्हणलं स्वारी कुठे आहे पहावी, मोहीतला सुट्टी लागली ना आता, मग म्हणलं.. कुठं गेलास की काय गावाला???”, जयंत

“छे रे.. कुठंच नाही गेलो बघ. एक तर हे कादंबरीचं काम रखडलं आहे, प्रकाशकांचे फोन वर फोन यायला लागले आहेत आणि ते सोडून कुठं जाणार?”, आकाश

“अरे.. अरे.. पोराला सुट्टी लागली आहे, त्याच्या शाळा सुरु झाल्या की आहेच मग रुटीन त्याच, शाल्मली वहीनी पण कंटाळल्या असतील, जाऊन ये दोन-चार दिवस…”, जयंत

“तिचं काय जातंय कंटाळायला? आणि पिकनीकला जाऊन करायचं काय? ही आपली सदा-न-कदा मोहीतच्या मागे. आणि रात्री पाठ टेकली की हीचे डोळे बंद होतात. आता तुझ्यापासून काय लपलं आहे का?.. आय मीन.. यु नो अबाऊट आवर सेक्स लाईफ राईट.. शेवटंच कधी आम्ही….”, आकाश..

“अरे हो.. पण तिची बाजु पण समजावून घे ना. तुझं ते कार्ट.. तुझ्यावरच गेलेलं. तू काय लहानपणी वेगळा होतास का? दिवसभर सारखा दंगा, मस्ती चालूच. परत तुला तुझ्या कामात व्यत्यय आणलेला चालत नाही. घरातलं करायचं, त्याची शाळा, ग्राऊंड, क्लासेस, जेवण, दमून जात असतील त्या बिचाऱ्या…

ऐक माझं चार दिवस जाऊन ये कुठे तरी, नक्की फरक पडेल बघ…”, जयंत आकाशचं म्हणण अर्ध्यावर तोडत म्हणाला.

“आणि हे कादंबरीचं?? त्याचं काय करु?”, आकाश..

“बरं हे बघ एक काम कर, अश्या ठिकाणी जा जिथे तुला एकांत मिळेल, तुम्ही दोघं एकमेकांसाठी वेळ देऊ शकाल, त्याचबरोबर फावल्या वेळात तुला तुझ्या कादंबरीवर सुध्दा काम करता येईल..”, जयंत

“पण अशी जागा मिळायला हवी ना?”, आकाश

“अरे आपले गुगल काका आहेत ना.. शोध तिथं एखादा बंगला चांगला महीन्याभरासाठी घे भाड्याने.. आणि हो.. आपल्या रामुकाकांनापण घेऊन जा बरोबर. मी फिल्मसाठी कोकणात चाललो आहे १५-२० दिवस, तसंही त्यांना काही काम नाही, घेऊन जा त्यांना, म्हणजे वहीनींना घरातलं बघायला नको… काय?”, जयंत

“बरं बाबा.. बघतो असं काही मिळतं आहे का ठिकाण ते… आणि हो.. भेटू एकदा निवांत. बऱ्याच दिवसांत भेट नाही झाली…”, आकाश

“ओके, भेटू नक्की.. चल ठेवतो मग.. एन्जॉय..” असं म्हणून जयंतने फोन बंद केला.

फोन संपल्यावर आकाशने लॅपटॉप पुढे ओढला पण त्याचे कथेमध्ये लक्ष लागेना.

“जयंत म्हणाला ते पण बरोबर आहे. एकदा मोहीतची शाळा सुरु झाली की मग शाल्मलीला पुन्हा सवड मिळणे अवघड. आणि काय सांगावं एखाद्या नवीन ठिकाणी पुन्हा एकदा दोघांमधील संपलेले पॅशन पुन्हा एकदा नव्याने निर्माण होऊ शकते.”, संगणकाच्या स्क्रिनकडे बघत आकाश विचार करत होता.

शेवटी त्याने आपली विंडो बंद केली आणि गुगलमध्ये जवळपासच्या ठिकाणी एखादा बंगला आहे का ते शोधु लागला.

बऱ्याच वेळ शोधाशोध केल्यानंतर पुण्यापासून ६०-७० कि.मी. वर वसलेल्या भोर ह्या निसर्गरम्य गावातील बंगल्याची त्याला एक जाहीरात सापडली. जाहीरातीत दाखवलेले फोटो

सुध्दा त्याला आवडले. आजुबाजुचा परीसर गर्द झाडीचा होता, बंगला तसा एकांतात, त्याला हवा अगदी तस्साच होता.

जाहीरात तशी बऱ्याच जुन्या तारखेची म्हणजे अगदी तिन-चार वर्षापुर्वीची होती, 'परंतू सहसा भाड्याने देणाऱ्या जाहीराती सारख्या कुठे बदलत असतात. प्रयत्न तर करून बघु!' असा विचार करून आकाशने जाहीरातीत दिलेला नंबर आपल्या भ्रमणध्वनीवरून लावला.

"आपण फिरवलेला नंबर अस्तीत्वात नाही..", एक रेकॉर्डेड मेसेज आकाशच्या कानावर पडला.

"आयला.. चुकीचा नंबर फिरवला का काय?", असं स्वतःशीच म्हणून आकाशने पुन्हा एकदा बारकाईने आकडे दाबत आकाशने तोच नंबर दाबला.

"आपण फिरवलेला नंबर अस्तीत्वात नाही..", एक रेकॉर्डेड मेसेज आकाशच्या कानावर पडला.

"च्यायला... जाहीराती करता कश्याला मग?", कपाळावर आठ्या आणत आकाश पुटपुटला आणि त्याने आपला मोबाईल संच दणकन टेबलावर आपटला. मग त्याने आपला लॅपटॉप पुन्हा समोर ओढला आणि दुसऱ्या जाहीराती पहायला सुरुवात केली.

तोच.. आकाशचा मोबाईल किणकिणला.. मोबाईलच्या स्क्रीनवर मगाचचाच नंबर झळकत होता.

"हॅलो..", आकाश..

“तुम्ही मगाशी फोन केला होतात का?”, पलीकडून एका स्त्रीचा अत्यंत हळु आवाज ऐकू आला.

“अं..हो.. हो.. मीच केला होता मगाशी फोन. मला तुमची जाहीरात सापडली.. भोर गावातील बंगल्याबद्दल…”, आकाश

“किती दिवस पाहिजे?”, पलीकडून पुन्हा तोच आवाज. आकाशला मोबाईल कानाला घट्ट लावून सुध्दा आवाज निट ऐकू येत नव्हता.

“निदान ३ आठवडे तरी.. किती भाडं आहे?”, आकाश

“भाड्याचं काही नाही, तुम्ही द्याल ते मंजूर आहे. तुम्ही जा रहायला. मध्ये कुणालातरी पाठवीन पैसे घ्यायला..”, ती स्त्री म्हणाली.

“अहो असं कसं.. काही तरी सांगा ना नक्की…”, आकाश म्हणाला.

“मी सांगितलं ना, तुम्ही जे काही द्याल ते मंजूर आहे..”, ती स्त्री..

“बरं ठिक आहे, बाकी सोयी काय आहेत? बंगल्याची स्थिती काय आहे?”, आकाश

“बंगला उत्तम स्थितीत आहे, पण सध्या तिथे कोणी नोकर-चाकर नाहीत तेंव्हा तुम्ही तुमचाच कोणी असेल तर घेऊन जा. दिवाणखाना, बैठकीची खोली, माजघर वगैरे थोडे फार साफ करून घ्यायला लागेल… जेंव्हा कोणी तिकडे येणार असेल तेंव्हा मी तुम्हाला फोन करेन. बंगल्याची किल्ली दाराच्या वरच्या कोनाड्यात कोपऱ्यातच आहे…”, असं म्हणून त्या स्त्री ने फोन बंद केला सुध्दा..

“काय अजब प्रकार आहे हा? पैश्याची काही अट नाही, किल्ली बाहेरच ठेवलेली..”, आकाश स्वतःशीच विचार करत होता.

“आकाश! जेवायला काय करु रात्री?”, शाल्मलीने आकाशचा फोन संपल्याचे पाहून विचारले.

आकाशने दोन क्षण विचार केला आणि म्हणाला, “ते जेवणाचे राहु देत, आज आपण बाहेरच जाऊ जेवायला... तू बाहेर ये जरा, बोलायचे आहे”

शाल्मली बाहेर येऊन आकाशच्या समोर बसली.. “बोल..”

“आपण दोन-तिन आठवडे बाहेर गावी चाललो आहोत सुट्टीसाठी, उद्या गरजेपुरतं सामान घे बरोबर...”, आकाश म्हणाला..

“अय्या! खरंच???”, आनंदाने शाल्मली म्हणाली.. “कुठे??”

“भोर ला.. म्हणजे.. तिकडे एक बंगला घेतला आहे भाड्याने.. मस्त आहे एकदम, निवांत, एकांत...”, आकाश म्हणाला..

“बंगला?? आणि मग जेवायचं खायचं काय??? कोणी आहे का तिथे?”, शाल्मली, “का बरोबर स्वयंपाकाचं सामान घेऊन जायचे आहे?”

“ते बघ!.. कुठं जायचं म्हणलं ना, की हिला फक्त स्वयंपाकचं आठवतो...”,वैतागत आकाश म्हणाला..

“अरे म्हणजे काय? उपाशी रहाणार का? आणि मोहीतचं नको बघायला?”, शाल्मली

“जयंताकडचे रामुकाका येतील बरोबर.. ते करतील सगळं..”, आकाश..

“बाबा.. बाबा.. आपण भुर्र चाललो??”, आकाशचे बोलण ऐकून त्याचा ६ वर्षाचा मुलगा मोहीत बागडत येऊन त्याला बिलगला…

“हो रे छोनु.. तुला सुट्टी लागली नं.. म्हणून चाल्लो आपण.. मस्त मज्जा करायची, तुझे खेळं घे सगळे बरोबर हं? आपण क्रिकेट खेळू, लपाछपी खेळू, तिकडच्या नदीत मस्त पोहू…”, आकाश

“हम्म.. मज्जा…” खुश होत मोहीत म्हणाला.

“बाबा.. तुझ्या मोबाईलची बॅटरी…”, असं म्हणून मोहीतने खाली पडलेली मोबाईलची बॅटरी आकाशला दिली..

“अरेच्या… कधी पडली बॅटरी???”, आकाश..

“मगाशी नैका तू मोबाईल आपटलास, तेंव्हा…”, मोहीत..

“अरे तेंव्हा कशी पडेल.. त्यानंतर मी बोललो की मोबाईलवर, बॅटरी पडली असती तर फोन कसा आला असता? नंतर पडली असेल..”, आकाश..

“नाही, खोट्ट... बोलतो आहेस तु.. आधीच पडली.. मी बघीतली...”, मोहीत गाल फुगून म्हणाला..

“बिनडोकासारखं बोलू नको काही तरी.. मी सांगतोय नंतर बोललो फोनवर मी तर... बॅटरी मी मोबाईल आपटल्याने लुज झाली असेल जी नंतर मोबाईल ठेवताना पडली असणार..”, मोहीत फोनला बॅटरी बसवत म्हणाला..

“खोट्ट.. आध्धीच पडली..”, मोहीत अजूनही आपल्या म्हणण्यावर ठाम होता.

“बरं बाबा.. आधीच पडली. काय तू पण आकाश त्याच्याशी वाद घालतो आहेस.. चला आवरा आता, आपल्याला जेवायला बाहेर जायचेय ना??”, शाल्मली म्हणाली...

“जेवायला... भुर्र... ये....ssssss”, असं म्हणत मोहीत शाल्मलीला येऊन बिलगला.. “आई मी आईसक्रीमपण खाणार हं...”

“तू पटकन आवरलंस गुड बॉय सारखं तर...” असं म्हणून शाल्मली आकाशला आतल्या खोलीत आवरायला घेऊन गेली.

आकाश मात्र अजूनही त्या मोबाईलकडे कपाळावर आठ्या घालून बघत होता.

---

“स..स्स्स. काय थंडी आहे रे इथे?”, शाल्मली हातावर हात चोळत आकाशला म्हणाली..

“हो.. अगं झाडी बघ ना किती आहे आजुबाजुला..”, आकाश

“अरे हो.. पण मगाशी घाटात पण होतीच की झाडी, इथे अंमळ जास्तीच आहे नाही का?”, शाल्मली

“हो, पण मगाशी गाडीच्या काचा बंद होत्या त्यामुळे नाही जाणवली. इथे आपण खाली उतरलो आहोत.. वाटणारच जास्ती गार…”, आकाश आपलाच मुद्दा दामटवत म्हणाला.

“आणि गम्मत बघ ना, वाराच नाहीये काही, तरीही इतकं गार…”, शाल्मली.

“मग काय झालं? वारा असला तरच थंडी वाजती असं कुठे लिहीलं आहे का?”, आकाश.

“बरं रे..! तू म्हणतोस तसं. अर्थात जास्ती गार असण्यात वाईट काहीच नाहीये, उलट मला तर इथं खुप्पच मस्त वाटतं आहे, उन्हाळयात थंडी.. मस्तच…”, शाल्मली गाडीच्या डीक्कीतून बॅगा काढत म्हणाली.

रामुकाका दोघांच्या गप्पा-कम-भांडणं गालातल्या गालात हसत ऐकत होते तर मोहीत गाडीतून उतरून अंगात वार भरल्यासारखा मोकाट धावत होता.

हसत खिदळत चौघे जण बंगल्याच्या दारापाशी येऊन थांबले. आकाशने दाराच्यावरच्या कोनाड्यातून हात फिरवला. अपेक्षेप्रमाणे तेथे त्याला किल्ली सापडली. त्याने कुलुप काढले आणि दाराची कडी काढुन दरवाजा उघडला त्याचबरोबर एक उग्र, नाकाला झोंबणारा दर्प बाहेर आला. आपसुकच चौघांचेही हात नाकावर गेले.

“ई…कसला घाण वास आहे हा…”, शाल्मली म्हणाली

“शी..!!! बाबा..! कुठे आलो आहे आपण??”, मोहीतनेही आपलं मत व्यक्त केलं..

आकाशने पटापट सर्व खिडक्या उघडल्या. थोडा वेळ गेल्यानंतर त्या वासाची तिव्रता कमी झाली.

“गार्लीक… गार्लीकचा वास आहे हा…”, शाल्मली म्हणाली. “आता इथे गार्लीक कुठून येणार?? काहीतरी बोलू नकोस. बहुतेक बरेच दिवस बंगला बंद असावा त्यामुळे थोडासा कुबट वास असेल..”, आकाश म्हणाला.. “नाही.. हा गार्लीकचाच वास आहे.. हो कीनई ओ रामु काका??”, शाल्मली रामुकाकांकडे बघत म्हणाली.

रामुकाकांनीही मान डोलावली.. आणि म्हणाले, “हो लसणाचा वाटतो आहे खरा हा वास….”

एव्हाना सर्वजण दिवाणखान्यात पोहोचले होते. बंगला तसा नुकताच स्वच्छ केलेला वाटत होता. साधारणपणे सातशे-आठशे स्क्वेअर फुटांचा तो ऐसपैस दिवाणखाना पाहून सर्वच जण स्तंभीत झाले. अगदी पुरातन काळातली म्हणजे साधारण ५०-६० वर्षांपुर्वीच्या रहाणीमानाची आठवण करून देणारे फर्नीचर त्या दिवाणखान्यात होते. मोठ्ठाल्ली पितळी भांडी, फिक्कट झालेले तैलरंगातील पिढ्यांपिढ्यांतील कर्त्या पुरुषांची चित्र, दिवाणखान्याच्या मध्यभागी एक दणकट

झोपाळा, दिवाणखान्याच्या चोहीबाजुने भिंतींना लागून असलेली भारतीय बैठक, काळपट रंगाचे लाकडी खांब, छताला लोंबकळणारी दोन काचेची मोठ्ठी झुंबरं, दुधाळ रंगाच्या काचेच्या दिव्याच्या हंड्या आणि लाकडाची जमीन.

"बरं का पोरांनो...", रामुकाका म्हणाले.. "हा बंगला नक्कीच कुठल्यातरी मालदार व्यक्तीने बांधलेला असणार. हे सर्व सामान त्याकाळची त्या घराण्याची आर्थीक सुबत्ता स्पष्ट करते आहे..." रामुकाका एक एक करत त्या दिवाणखान्यातील वस्तु, त्याचा उपयोग, त्याची माहीती सांगत होते तोच त्यांना मोहीतचा आवाज ऐकू आला..

"आई-बाबा.. इकडे या ना.. फनी डेकोरेशन.. पटकन या...", मोहीत शक्य तितक्या जोरात ओरडत होता.

लगोलग आकाश, शाल्मली आणि रामुकाका आवाजाच्या दिशेने धावले. मोहीत एका बेडरुममध्ये होता त्या खोलीत तिघेही जण गेले.

आकाश आणि शाल्मली बेडरुममधील मोहीत दाखवत असलेले डेकोरेशन पाहून आश्चर्यचकीत झाले होते तर रामुकाकांच्या चेहऱ्यावर मात्र चिंतेचे जाळे पसरले होते.

बेडरुममधील छताला लसणाच्या माळा करून बांधलेल्या होत्या आणि त्यावर आता जळमट चढली होती. खिडक्यांच्या गजालासुध्दा काही ठिकाणी लसणाच्या पाकळ्या चिकटवलेल्या दिसत होत्या.

"हा काय मुर्खपणा आहे??", आकाश हसत हसत म्हणाला... "रामुकाका तुम्ही मगाशी म्हणालात मालदार माणुस... मला वाटतं ही लोकं लसणाचे व्यापारी असावेत, काय म्हणता???"

परंतू रामुकाका अजूनही भिंतीला चिकटून थिजून उभे होते.

“रामुकाका?? काय झालं?”, शाल्मली म्हणाली.

“अं?? नाही काही नाही.. चला.. चला बाहेर चला... इथं नका थांबु...”, घाई घाईने रामुकाका म्हणाले.

“रामुकाका काय झालं?”, त्यांना हाताला धरून थांबवत आकाश म्हणाला..

“हे.. हे काही ठिक दिसत नाही...”, रामुकाका

“काय ठिक दिसत नाही रामुकाका?”, आकाशच्या चेहऱ्यावर सुध्दा आता चिंता पसरु लागली होती.

“ही.. एवढी लसणं,,. बांधुन ठेवलेली.. तुम्हाला माहीती आहे.. लसुण असे कधी बांधुन ठेवतात?”, रामुकाकांनी विचारले..

“नाही..”, आकाश शाल्मलीकडे प्रश्नार्थक नजरेने बघत म्हणाला..

शाल्मलीनेसुध्दा नकारार्थी मान डोलावली..

“जेंव्हा घरातल्या लोकांवर भूतबाधा झालेली असते तेंव्हा लसूण मोठ्या प्रमाणात वापरतात... असं म्हणतात प्रेतात्म्याला लसणाचा उग्र वास सहन होत नाही आणि त्यामुळेच त्याच्यापासून बचाव होण्यासाठी...”, रामुकाका बोलत होते..

“काय तुम्ही रामुकाका...”, आकाशच्या चेहऱ्यावरची चिंता आता पार गेली होती... “अहो आजच्या युगात कोण विश्वास ठेवतो असल्या गोष्टींवर?”

“बरोबर आहे… आजच्या युगात जे दिसले ते खरं आणि जे नाही दिसले, जे अदृष्य आहे ते खोटं असाच सारासार विचार तुम्ही लोकं करता. पण जसा देवाच्या रुपाने एक न दिसणारी पवित्र शक्ती अस्तीत्वात आहे असं आपण मानतो तशीच एक अपवित्र शक्ती सुध्दा ह्या जगात आहे. ज्याने पाहीली, ज्याने अनुभवली तो ह्या गोष्टींवर कधीच अविश्वास दर्शवणार नाही आणि ह्या लसणाच्या माळा त्याचेच द्योतक आहे.”, रामुकाका म्हणाले.

“ए आकाश.. चल जाऊ यात आपण इथून.. उगाच कश्याला विषाची परीक्षा पहायची. तसेही आपण पैसे दिलेले नाहीत. त्यांना फोन करून काहीतरी कारणं सांगु.. आपण दुसरीकडे जाऊ..”, शाल्मली घाबरून म्हणाली.

“गपे वेडाबाई. इतके छान, निवांत घर कुठं मिळणार? आणि ते पण इतक्या कमी पैश्यात?”, आकाश..

“पण आकाश.. रामुकाका…”, शाल्मली..

“शाल्मली.. अगं जुनी लोकं, त्यांचे विचार आणि आपले विचार कधीच मिळत नाहीत, मिळणार नाहीत. त्या काळच्या त्यांच्या भावना, त्यांची मतं, त्यांचा जगाकडे पहाण्याचा दृष्टीकोन त्या काळीच ठिक होता. आजच्या काळात तेंव्हा बोलल्या गेलेल्या, मानलेल्या किती गोष्टी सिध्द झाल्या आहेत? सत्यात उतरल्या आहेत? काळ बदलला, लोकं बदलले, त्यांचे विचार बदलले. आणि काळानुरुप ह्या असल्या गोष्टी सुध्दा काळाच्या पडद्याआडच गेल्या आहेत. आपण एका कानाने ऐकायचे आणि दुसऱ्या कानाने सोडून द्यायचे.

रामुकाका, तुम्ही स्वयंपाकाचे बघा, भुक लागायला लागली आहे, मोहीतने पण काही खाल्ल नाहीये. तो पर्यंत आम्ही जरा आराम करतो.”, असं म्हणून आकाश खोलीच्या बाहेर पडला, त्यापाठोपाठ मोहीत आणि शाल्मलीसुध्दा बाहेर आले.

रामुकाका बऱ्याचवेळ त्या खोलीत कसलातरी अंदाज घेत थांबले होते, शेवटी ते पण बाहेर आले, त्यांनी खोलीचे दार लावून घेतले आणि त्याला बाहेरून कडी घालून टाकली.

रामुकाका स्वयंपाकघरात गेले तर आकाश, शाल्मली आणि मोहीत दिवाणखान्यात विसावले.

“हुश्श.. दमलोबुवा ड्राईव्ह करून…”, आकाश म्हणाला.. “पण काहीही म्हणा, वर्थ आहे इथं येणं…”

“हो ना.. आणि शांतता पण कित्ती आहे नै?”, शाल्मली आकाशच्या म्हणण्याला दुजोरा देत म्हणाली..”असं वाटतं इथं येऊन सारं कसं थांबून गेलं आहे. इथं येईपर्यंत सारं कसं सजीव वाटत होते. वारा, हलणारी झाडं, पक्षी, रस्त्याने धावणारी कुत्री.. पण इथं… इथं तसं काहीच नाही….नै…”

“हम्म..”, आकाशने नुसती मान डोलावली..

थोडावेळ शांततेत गेला. आकाशला सुध्दा ही शांतता खायला उठली. शाल्मली म्हणते तशी ही शांतता काहीतरी विचित्रच होती.. अंगावर आल्यासारखी.. इथं छान वाटत होते ते गार होतं म्हणून, शांत होतं म्हणून.. पण तरीही मनाला एक प्रकारची घुसमट जाणवत होती, दडपण आणत होती..

काहीतरी.. काहीतरी चुकल्यासारखे वाटत होते खरे….

“कदाचित बऱ्याच दिवसांनंतर एखाद्या वेगळया जागी गेल्याने वाटतं असेल..”, आकाशने मनोमन विचार केला…

शेवटी शांतता असह्य झाली तसे तो शाल्मलीला म्हणाला, “जा रामुकाकांना काही मदत हवी का बघ, सॉल्लीड भुक लागली आहे, लवकर करा जेवायचं…”

शाल्मली लगेच उठली आणि रामुकाकांना मदत करायला स्वयंपाकघरात गेली.

स्वयंपाक घरात जाणारा व्हरांडा खुप्पच मोठ्ठा होता. थोड्याथोड्या अंतराने अश्या व्हरांड्यात दोन्ही बाजुला तिन-चार खोल्या होत्या.

शाल्मलीला त्या व्हरांड्यातून जाताना फार बैचैन वाटत होतं, कारण नसताना इरीटेशन होतं होत. सारखं कोणीतरी आपल्याकडे बघतंय, आपल्यावर नजर ठेवतय असंच वाटत होतं. भराभर पावलं टाकत ती व्हरांडा ओलांडून स्वयंपाकघरात आली आणि तीची पावलं जागच्या जागीच खिळली..

समोर रामुकाका………………………………………………………

रामुकाका स्वयंपाकघरातील भिंत आणि छत जिथे एकत्र होते त्या कोनापाशी एकटक बघत होते.. जणु काही तिथे काहीतरी होते… दबा धरून बसलेले. कदाचित मानवी डोळयांना ‘ते’ दिसत नव्हते, पण अथांग शक्ती असलेल्या मनाला ते जाणवत होते..

“रामुकाका?”, शाल्मलीने दारातूनच हाक मारली.

शाल्मलीच्या हाकेने रामुकाका एकदम भानावर आले.

“काय झालं रामुकाका? काय बघत होतात??”, शाल्मलीने विचारले.

रामुकाकांनी शाल्मलीचा एक हात त्यांच्या हातात घट्ट पकडला.. आणि नुसत्या डोळयांनी खुण करून ते शाल्मलीला म्हणाले, “ते बघ.. तिथे कोपऱ्यात..काही दिसते आहे तुला???”

शाल्मलीने सर्वत्र निरखून पाहीले.. “नाही.. नाही रामुकाका!! काही नाहीये तिथे.. काय दिसते आहे तुम्हाला?”

“नाही, मला पण काही दिसत नाहीये.. पण.. काही तरी नक्कीच आहे तिथे.. दिसत नसलं तरी जाणवतं आहे…”, रामुकाका

शाल्मलीचा चेहरा भितीने पांढराफटक पडला होता. भितीने तिने एक आवंढा गिळला..

“नका ना हो रामुकाका असं बोलू. कश्याला घाबरवता आहात, नाहीये तिथे काहीच.. तुम्ही नका बघु तिकडे, तुम्हाला स्वयंपाकात काही मदत हवी आहे का??”, शाल्मली.

“बेटा.. कोपरा.. खास करून भिंतीचा वरचा कोपरा.. तुला माहीती आहे काय विशेष असतं कोपऱ्याचं?”, रामुकाका

शाल्मलीने पुन्हा एकदा रामुकाका बघत होते तिकडे नजर टाकली आणि मानेनेच तिने नाही अशी खूण केली.

“भिंतीचा कोपरा.. नेहमी संगम असतो चांगल्या-वाईटाचा. परंतू वरचा कोपरा.. तिथे जमीन आणि अवकाश एकत्र मिळते.. एक शक्ती असते त्या कोपऱ्यात. कधी चांगली…. कधी………”, बोलता बोलता रामुकाका थांबले..

“मी.. मी जाते बाहेर.. तुम्हाला काही लागलं तर हाक मारा..”, असं म्हणून शाल्मली बाहेर पळाली.

दिवाणखान्यात मोहीत आणि आकाशची उश्यांची मारामारी चालू होती.

शाल्मलीचा घामेजलेला आणि भितीने पांढराफटक पडलेला चेहरा बघून आकाश म्हणाला, “काय गं? काय झालं???”

शाल्मलीने स्वयंपाकघरात घडलेला किस्सा आकाशला ऐकवला.

“च्यायला, त्या म्हाताऱ्याच्या..”, असं म्हणून आकाश तावातावाने उठला..

“च्चं.. जाऊ देत ना अक्की.. त्यांना वाटलं ते त्यांनी सांगितलं, विश्वास ठेवायचा की नाही ते आपण ठरवायचं ना?”, शाल्मली.

“अगं हो.. पण त्याला काय वाटतं ते त्याने स्वतःशीच ठेवावं ना.. आपल्याला कश्याला ऐकवतो आहे?”, आकाश..

“जाऊ देत.. तू नको तुझा मुड खराब करु....”, असं म्हणून शाल्मली त्याच्या शेजारी येऊन बसली... “..चल आपण सामान अनपॅक करु आणि थोडं फ्रेश होऊ ओके??”

आकाशने मान हलवून संमती दर्शवली आणि दोघंही सामानाची आवरा-आवर करायला उठले.

आकाश वॉश घेऊन, आवरून पुन्हा दिवाणखान्यात आला तेंव्हा सुर्य अस्ताला जाऊन बराच वेळ झाला होता. दाट झाडीमुळे उरला सुरला उजेडसुध्दा नाहीसा झाला होता आणि मिट्ट काळोख पसरला होता. शाल्मली खिडकीचा पडदा सरकवून बऱ्याच वेळ बाहेर बघत बसली होती..

“शाल्मली??”, आकाशने हाक मारली तशी ती एकदम दचकून जागी झाली.

“काय गं? आता काय झालं दचकायला? का तो म्हातारा पुन्हा काही बोलून गेला?”, शर्टाच्या बाह्या फोल्ड करत आकाश म्हणाला..

“नाही .. काही नाही...”, शाल्मली आपली भिती दाबत म्हणाली..

“अगं काय झालं? सांगशील का जरा???”, आकाश वैतागून म्हणाला..

“अरे.. मला असं.. म्हणजे.. बाहेरून कसलातरी आवाज येत होता, म्हणून बघत होते बाहेर..”, शाल्मली

“कसला आवाज?”, आकाश..

“पालापाचोळ्याचा.. काहीतरी.. म्हणजे.. कुणीतरी घसटत घसटत चालण्याचा..”, शाल्मली..

“इथे?? इथे कोण येणार आहे चालत चालत?”, आकाश जागेवरून उठत म्हणाला…

“कुठे चालला आहेस??”, शाल्मलीने परत घाबरून विचारले..

“बघतो बाहेर कोण आले आहे… उगाच तुझी भिती आहे ती तरी जाईल ना…”, असं म्हणून आकाशने दार उघडले त्याचबरोबर अतीथंड हवेचा एक मोठ्ठा झोत आतमध्ये आला. आकाशसुध्दा क्षणभर दचकला आणि मग म्हणाला…”बघ.. तुच बघ.. कोणीसुध्दा नाही बाहेर.. अगं वाऱ्याने झाडं पानं हलत असतील त्याचा आवाज ऐकला असशील तू…” आणि त्याने दार लावून घेतले.

“चला.. जेवायला वाढले आहे…”, रामुकाका स्वयंपाकघरातून बाहेर आले होते आणि व्हरांड्यातूनच त्यांनी बाहेर आवाज दिला.

लगोलग आकाश, शाल्मली आणि मोहीत स्वयंपाकघरात पळाले.

साधारणपणे ३ तासांनंतर सर्वजण आप-आपल्या पांघरुणात गुरगुटून झोपले होते.

घड्याळात साधारणपणे १२-१२.३० वाजून गेले असतील. पालीच्या सतत चुकचुकण्याने आकाशची झोप चाळवली गेली. शेवटी वैतागून त्याने डोळे उघडले.

समोरच्या खिडकीतून चंद्राचा मंद प्रकाश खोलीत येऊन स्थिरावला होता. खिडक्यांचे पडदे चंद्राच्या प्रकाशाने उजळून निघाले होते. त्या प्रकाशात आकाशला एक आकृती त्याच्याकडे रोखून पहाताना दिसली.

कोण होती ती आकृती? इतक्या रात्री आकाशच्या बेडरुममध्ये ती काय करत होती?

आकाशने शेजारी बघीतले, शाल्मली जागेवर नव्हती.

आकाश दचकून उठून बसला आणि त्याने निरखून त्या आकृतीच्या चेहऱ्याकडे बघीतले.

“माय गॉड.. शाल्मली.. यु स्केअर्ड मी…”, उशीला टेकत तो म्हणाला.

शाल्मली काहीच बोलली नाही. तिच्या चेहऱ्यावर एक मंद हास्य तरळून गेले.

“काय करते आहेस तु?”, आकाश म्हणाला.

शाल्मलीने हळुवार आपल्या हाताचे बोट तिच्या ओठांवर नेले आणि अस्पष्ट आवाजात ती म्हणाली.. “श्शुsssss”.

थोड्यावेळ ती आकाशकडे रोखून पहात राहीली आणि मग तिने हळुवारपणे स्वतःचे कपडे उतरवायला सुरुवात केली.

“यु ओके???”, आकाश स्तिमीत होत तिच्याकडे पहात म्हणाला.

सर्व कपडे उतरवल्यावर ती सावकाश चालत आकाशच्या जवळ आली. घामाने तिचे शरीर ओलेचिंब झाले होते तर आकाश मात्र हुडहुडी भरल्यासारखा पांघरुणात बुडून गेला होता.

तिने आपले ओठ आकाशच्या ओठांवर ठेवले. एखाद्या गरम इस्त्रीचा स्पर्श व्हावा तसा चटका आकाशच्या ओठांना बसला. त्याने स्वतःला तिच्यापासून बाजुला करण्याचा प्रयत्न केला, पण शाल्मलीच्या घट्ट मिठीतून त्याला निसटणे अशक्य झाले होते.

इतक्या वर्षात प्रथमच शाल्मलीने प्रणयक्रिडेमध्ये स्वतःहून पुढाकार घेतला होता. आकाशने फारसा प्रतिकार न करता स्वतःला तिच्या स्वाधिन करून टाकले.

साधारणपणे तासाभरानंतर आकाश तृप्त चित्ताने पहुडला होता. इतक्या वर्षात प्रथमच त्याने शाल्मलीबरोबरचा शृंगार इतक्या उत्कटतेने अनुभवला होता. नेहमी अ‍ॅट्रॅक्टीव्ह भासणारी शाल्मलि आज नुसतीच अ‍ॅट्रॅक्टीव्ह नाही तर सिडक्टीव्ह पण भासली होती. शारीरीक प्रणय-क्रिडा प्रकार जे त्याने आजपर्यंत फक्त पुस्तकात वाचले होते, जे फक्त त्याने 'तसल्या' चित्रपटांमध्ये पाहीले होते ते आज त्याने शाल्मलीसोबत अनुभवले होते.

“शमु.... यु आर टु..गुड...”, स्वतःशीच हसत आकाश म्हणाला.. “दॅट वॉज अ ग्रेट सरप्राईज...”, असं म्हणत त्याने शाल्मलीकडे पाहीले.

पण शाल्मली केंव्हाच झोपी गेली होती...................

---

“आकाश... ए आकाश.. अरे उठ ना!”, शाल्मली आकाशला गदागदा हलवत होती..

आकाशच्या चेहऱ्यावर आदल्या दिवशीच्या रात्रीच्या आठवणींनी अजूनही मंद हास्य पसरले होते.

“बाबा... उठा ना बाबा...”, आकाश उठत नाही म्हणल्यावर मोहीततही शाल्मलीबरोबर आकाशला उठवण्यात सामील झाला..

“काय आहे रे.. झोपु द्या ना जरा...”, वैतागून डोळे उघडत आकाश म्हणाला.

“आकाश अरे.. रामुकाका कुठे दिसत नाहीयेत...”, शाल्मली त्रासीक चेहरा करत म्हणाली..

“अगं गेले असतील बाहेर कुठे तरी... येतील परत...”, आकाश चेहऱ्यावर पांघरुण ओढत म्हणाला..

“अरे नाही, सकाळपासून नाहीयेत.. घड्याळात बघ जरा, ११.३० वाजून गेलेत, असं न सांगता कसे कुठे जातील??”, शाल्मली..

“च्यायला.. म्हातारा घाबरून गेला का काय पळुन?”, आकाश बेडमधुन उठत म्हणाला

“आकाश.. अरे निदान मोहीतसमोर तरी नको बोलुस असं वेडं वाकडं.. तो पण बोलू लागेल तसाच.. आणि रामुकाकांचे सामान आहे इथेच, तेच दिसत नाहीयेत. तू उठ आणि जरा शोधुन ये बरं त्यांना…”, शाल्मली.

“जाऊ देत ना, गेला तर गेला, मी नाही त्याला शोधायला जाणार.. डोक्यात गेला तो म्हातारा माझ्या.. जा तुच बनव काहीतरी ब्रेकफास्ट, येईल तो, कुठे जाणारे?”, आकाश म्हणाला..

कंटाळून शेवटी शाल्मली स्वयंपाकघरात जायला उठली, तसा आकाशने तिचा हात धरून तिला जवळ ओढले..

“आकाश..ssss, मोहीत बघतोय..”, शाल्मली म्हणाली..

“शमु.. यु वेअर ऑसम यस्टरडे…”, आकाश म्हणाला..

“कश्याबद्दल?”, गोंधळून मोहीतकडे पहात शाल्मली म्हणाली..

“ओके. ओके.. नाही बोलत काही मोहीत समोर बास्स??.. सॉरी.. जा.. तुच मस्त बनव काही तरी खायला…”, असं म्हणून आकाशने शाल्मलीचा हात सोडला.

शाल्मली स्वयंपाकघरात गेली. आकाशने मग आपला मोर्चा मोहीतकडे वळवला..

“सो.. हिरो.. आज काय प्लॅन??”

“बाबा आपण बाहेर झाडांमागे लपाछपी खेळायचे?”, मोहीत म्हणाला..

“ओके.. डन.. मी आंघोळ करून मस्त फ्रेश होऊन येतो, मग आपण खेळू .. चालेल??”, आकाश

“येssss. मी बाबांबरोबर लपाछपी खेळणार!, मी बाबांबरोबर लपाछपी खेळणार!!”, असं म्हणत बागडत मोहीत बाहेर पळाला.

आकाशही मग अंथरुणातून उठला आणि ब्रश करायला बाथरुममध्ये गेला.

आकाश गेल्यावर थोड्यावेळाने समोरच्या कपाटावर कसलीशी हालचाल झाली. कपाटावरून हळुवारपणे घरंगळत, ओघळत काहीतरी खाली जमीनीवर उतरलं आणि बेडरुममधुन बाहेर गेलं. ते काय होतं ह्याचं वर्णन करणं अवघड, पण थोडक्यात सांगायचं झालं तर आपणं जेंव्हा घट्ट डोळे मिटून घेतो तेंव्हा लाल-चॉकलेटी-काळया रंगाच्या पार्श्वभुमीवर आपल्याला काळपट रंगाचे जे विचित्र आकार तरंगताना दिसतात, त्या आकारांचा एखादा लोळ जसा दिसेल तसंच ते काहीसं होतं

दोन तासांनंतर, आकाश आणि मोहीतचा लपाछपीचा खेळ चांगलाच रंगात आला होता. पळायला आणि लपायलाही भरपुर जागा असल्याने बाप-लेक अगदी पळून पळून दमून गेले होते.

शेवटी आकाश दमून बंगल्याबाहेरच्या बाकावर येऊन बसला..

“चला ना बाबा.. अजून थोडं खेळूयात…”, मोहीतला अजूनही खेळायचेच होते.

“बास रे बाबा.. दमलो मी.. तू खेळ जरा वेळ एकटा, आपण नंतर खेळू ओके??”, मोहीतला समजावत आकाश म्हणाला.

“काय ओ बाबा… जा मी कट्टी..” असं म्हणून आकाश एकटाच खेळण्यात मग्न झाला..

आकाशने एक मॅगझीन उघडले आणि तो सुध्दा वाचनात गुंग झाला.

“झुssssssम.. आय एम.. सुपरमॅन…”, मोहीतचा मधुनच आवाज आकाशला ऐकू येत होता… जसं जसा मोहीत लांब, जवळ येत होता तसं तसा त्याचा आवाज कमी जास्त होत होता.

पण काही वेळानंतर, बराच वेळ होऊनही मोहीतचा काहीच आवाज येईना तसा आकाश जागेवरून उठला..

“मोहीतsss”, आकाशने एक हाक मारली.

पण मोहीतचा काहिच आवाज आला नाही.

“मोहीतsss”, आकाशने पुन्हा एक हाक मारली आणि तो झाडीत मोहीतला शोधायला पळाला.

सर्वत्र जिवघेणी शांतता होती. मोहीतला इतक्यावेळ उगाच एकट्याला सोडले ह्याचा आकाशला पश्चाताप होऊ लागला होता.

“मोहीतsss”, पुन्हा एक हाक, ज्याला मोहीतकडून काहीच उत्तर येऊना.

बरेच अंतर आत गेल्यावर एका झाडापाशी आकाशला मोहीत दिसला. तो भेदरून झाडाला टेकून बसला होता.

“मोहीत?? काय झालं? इथं काय करतो आहेस तु…??”, काळजीने आकाशने विचारले

मोहीत झाडीत दूरवर कुठेतरी नजर लावून बसला होता.

आकाशने सभोवती सर्वत्र पाहीले पण त्याला कोणीच दिसेना.

“काय झालं बेटा?”, आकाशने पुन्हा विचारले.

“बाबा.. मला भिती वाटतेय…”, मोहीत म्हणाला.
“भिती? कसली भिती वाटते आहे सोनुला? काय झालं सांग मला, मी आहे ना तुझ्याबरोबर?”, आकाश मोहीतच्या डोक्यावरून हात फिरवत म्हणाला..

“तिकडे एक ताई होती…”, झाडीत बोट दाखवत मोहीत म्हणाला
“ताई? तिकडे तर कोणीच नाही बेटा..”, आकाशने बोट दाखवलेल्या जागेकडे बघत आकाश म्हणाला..

“आत्ता नाहीये, मगाशी होती..”, आकाशला चिकटत मोहीत म्हणाला. “काही म्हणाली का ती ताई तुला??”, आकाश

“ती मगाशी ना तिथे, झाडाला टेकून रडत बसली होती. मी तिला म्हणलं.. आय एम सुपरमॅन, तुला मदत करु का? तर तिने खूप रागाने बघीतलं माझ्याकडे..”, मोहीतला त्या आठवणीने परत भरून आलं…

“हो.. अश्श झालं.. परत दिसु देत ती ताई मला.. मी बघतोच तिच्याकडे…”, आकाश म्हणाला… “चल जाऊ आपण घरी, भुकू लागली असेल ना मोहीतला..” असं म्हणून तो मोहीतला घेऊन परत जाऊ लागला..

“बाबा तुम्हाला गंम्मत सांगू, ती ताई ना… टकलू होती, तिने किनई लाल रंगाची साडी घातली होती आणि टक्कल दिसु नये म्हणून ना तिने डोक्याला साडी गुंडाळली होती…”, मोहीत म्हणाला..

“श्शी.. काहीतरी बडबडु नको मोहीत.. कोणी नव्हतं तिथं…”, आकाश वैतागून म्हणाला..

“हो.. होती ती ताई.. आणि तिच्या तोंडाला आणि हाताला किनई खुप बाऊ झाला होता…”, मोहीत सांगत होता..

आकाशने त्याच्या पाठीत एक धपाटा घातला.. “बास झालं तुझं काल्पनिक पुराण चल आता घरी…” असं म्हणत तो मोहीतला ओढत बंगल्यात घेऊन आला..

पाठीत धपाटा बसताच मोहीतने पुन्हा भोकाड पसरलं.. त्याचा आवाज ऐकून शाल्मली बाहेर आली..

“अरे काय झालं रडायला..???”, मोहीतला जवळ घेत ती म्हणाली.

“काही नाही, नेहमीचेच.. ह्याचे काल्पनिक विश्व जरा जास्तच विस्तारच चाललं आहे.. आवरा जरा.. हा सुपरमॅन झाला कि कधी एलीयन येतात, तर कधी डायनॉसॉर तर कधी अजून कोण…”, आकाश मोहीतकडे रागाने बघत म्हणाला.

“अरे त्याचे खेळच आहेत ते.. कश्याला ओरडतोस उगाच त्याला?… आज काय केलं आता?…”, शाल्मली म्हणाली..

“विचार त्यालाच.. काहीतरी बोलत असतो.. म्हणे कोणतरी टकलू ताई होती जंगलात…”, आकाश

शाल्मलीने एकदम दचकून आधी मोहीतकडे आणि मग आकाशकडे पाहीले…

“टकलू ताई?.. कशी होती दिसायला…?”, शाल्मलीने मोहीतला विचारले.

मोहीतने आकाशला सांगितलेले सर्व वर्णन शाल्मलीला सांगितले.

मोहीत बोलत असताना शाल्मलीच्या चेहऱ्यावरचे रंग भराभर बदलत होते. तिच्या कपाळावर घामाचे बिंदु जमा व्हायला लागले.

“शमु.. यु ऑलराईट?? काय झालं…?”, शाल्मलिच्या चेहऱ्याकडे बघून आकाश म्हणाला..

शाल्मली काही न बोलता बंगल्यात पळाली, पाठोपाठ मोहीत आणि आकाश.

शाल्मली धावत एका अडगळीच्या खोलीत पोहोचली.

“शाल्मली काय झालं..? जरा सांगशील का???”, आकाश संभ्रमावस्थेत म्हणाला..

शाल्मलीने कोनाड्यातून एक जुनाट चित्र बाहेर काढले आणि ते मोहीतसमोर धरून म्हणाली..”अशीच होती ती ताई?”

“हो.. अश्शीच होती.. अश्शीच होती..”, मोहीत त्या चित्रावर बोट ठेवत म्हणाला…

शाल्मलीचे डोळे विस्फारले होते. थरथरत्या हाताने तिने ते चित्र आकाशच्या समोर धरले..आज सकाळी आवरताना आम्हाला सापडलं हे चित्र…

“नेत्रा गोसावी”, रंग उडलेल्या शाईने लिहीलेले नाव असलेले आणि मोहीतने जसे वर्णन केले होते तश्याच एका स्त्रीचे चित्र त्या कागदावर होते, पण आकाशला हलवून सोडणारी मुख्य गोष्ट तिथे होती आणि ते म्हणजे त्याच कागदावर खालच्या बाजुला कंसात लिहीलेले आकडे -

**(जन्म १२ मार्च १९२७ – मृत्यु २१ मे १९५७)**

***मृत्यु – २१ मे १९५७!!!!***

“आता कसं वाटतं आहे?”, शाल्मलीच्या डोक्यावरून हात फिरवत आकाश म्हणाला

शाल्मलीने क्षीणपणे डोळे उघडले आणि कसनुसे हसत तिने आकाशकडे पाहीले व थोडीशी मान हलवली.

आकाशने शाल्मलीच्या कपाळावर हात ठेवला, तिचा अजूनही ताप उतरण्याची काहीच चिन्ह दिसत नव्हती. शाल्मलीचं अंग अजूनही तापलेले होते.

“हे बघ शमु.. तुला वाटतं तसं काही नाहीये. तू उगाचच नाही तो विचार करते आहेस..”, आकाश शाल्मलीचा हात हातात घेऊन म्हणाला..”मोहीत आणि त्याचे खेळ तुला माहीती आहे ना! एखादी गोष्ट बघीतली की तिच गोष्ट घेऊन बसतो तो कित्येक दिवस, हो कि नाही?”

“……………..”

“मी सांगतो तुला काय झालं असेल ते, तू सामान आवरत असताना तुला ते चित्र सापडलं त्यावेळेस मोहीत पण तिथेच होता बरोबर ना? मग मोहीतने तेच चित्र डोक्यात ठेवलं. हे काय आज पहिल्यांदा झालं का? एलियन्स चे पिक्चर बघीतले की पुढचे कित्येक दिवस त्याचा खेळ एलियन्सना मारण्याचा असतो, राक्षसांचे कार्टून पाहीले की त्याच्या खेळात सारखे राक्षसच

येत असतात, तसाच हा प्रकार आहे, तू उगाच नको टेन्शन घेऊस, झोप आता, सकाळी उठलीस ना, की बरं वाटेल हं??", असं म्हणून आकाशने शाल्मलीचे पांघरुण निट केले आणि खोलीतला दिवा मालवून तो बाहेर पडला.

मोहीत खाली कारमध्ये बसुन गाडी गाडी खेळत होता, आकाश बंगल्याचे दार उघडून मोहीतशी खेळायला बाहेर आला आणि त्याने दार लावून घेतले.

खालचे दार लावण्याचा आवाज आला तसे शाल्मली आपल्या बेडवरून उठली आणि सावकाश चालत चालत खिडकीपाशी गेली. तिने खिडकीचा पडदा बाजुला करून खाली बघीतले. गाडीपाशी मोहीत आणि आकाश आप-आपसात खेळण्यात मग्न होते.

शाल्मली सावकाश माघारी वळली तेंव्हा तिच्या चेहऱ्यावर एक क्रुर हास्य होते. तिच्या चेहऱ्यातला गोडवा केंव्हाच गायब झाला होता आणि त्या क्रुर हास्याने तिचा चेहरा अधीकच विद्रुप दिसत होता. तिची नजर कुठेतरी शुन्यात लागली होती, तरीही तिला समोरच्या वस्तु बरोबर दिसत होत्या.

हळु हळु चालत ती ड्रेसिंगच्या टेबलापाशी गेली. तिने खण उघडला आणि स्वतःचे लाल रंगाचे लिपस्टीक बाहेर काढले.

लिपस्टीकचा खालचा भाग गोल फिरवून तिने लाल रंगाचे लिप्स्टीक बाहेर काढले. रक्तासारखा तो लालभडक रंग बघून शाल्मलीचे डोळे आनंदाने चमकु लागले. मान डाव्या बाजुला कलवून ती बऱ्याचवेळ त्या लाल रंगाकडे बघत बसली.

मग थोड्यावेळाने ती बेडशेजारील भिंतीपाशी गेली आणि एखाद्या यंत्रमानवासारखी मान वर करून तिने भिंतीच्या वरच्या टोकाकडे पाहीले. पुन्हा एकदा तिच्या चेहऱ्यावर तेच विकृत हास्य पसरले. तिने आपली मान मागे लवंडवली, दोन्ही हातांचे तळवे वाकडे करून हात

मागे घेतले, पायाचे तळवे एखाद्या बॅले डान्सरने बोटांवर नाचण्यासाठी उचलावेत तसे उचलले आणि मग तिने आपले डोळे मिटून घेतले.

क्षणार्धात तिचे शरीर पिसासारखे हलके झाले आणि तरंगत तरंगत भिंतीच्या छताला जाऊन चिकटले. मग तिने लिपस्टीक धरलेला आपला हात पुढे केला आणि भिंतीवर काहीतरी लिहीले. आपल्याच अक्षरांकडे बघून तिच्या डोळयात एक खुनशी भाव उमटून गेले.

मग हळु हळु ती पुन्हा जमीनीवर आली आणि बेडवर आपल्या पांघरुणात शिरून झोपून गेली.

---

रामुकाका नाहीसे होऊन दोन दिवस होऊन गेले होते, पण त्यांचा काहीच पत्ता लागलेला नव्हता. शाल्मलीची सुध्दा तब्येत ठिक नव्हती त्यामुळे आकाशनेच स्वयंपाकघरात थोडंफार काहीतरी स्वतः आणि मोहीतपुरतं खायला बनवलं.

बाहेर वारा पडलेला होता आणि त्यामुळे वातावरणात फारच उष्मा जाणवत होता. आकाशने खिडकीतून एकदा बाहेर बघीतलं. चंद्राची किरण कशीबशी जमीनीपर्यंत पोहोचत होती. बाहेरचं दृष्य अतिशय स्तब्ध होते, कसलीच हालचाल नव्हती, जणु काही एखाद्या चित्रकाराने चितारलेले चित्रं. सुंदर पण तरीही निर्जीव.

आकाशने खिडकी लावून घेतली. मोहीतसुध्दा दिवसभर खेळून दमून गेला होता, बाहेरच्या बैठकीवर पडल्या पडल्या तो झोपून गेला.

आकाशने त्याला हळुवार कवेत घेतले आणि खोलीतला दिवा मालवून तो आपल्या बेडरुममध्ये आला. बेडरुममध्ये आल्या-आल्या थंडगार वाऱ्याची झुळुक त्याच्या अंगावरून गेली.

वारा नसतानाही, खालच्या खोलीत इतका उकाडा असताना, वरच्या खोलीत, बेडरुममध्ये इतके थंड कसे ह्याचे आकाशला क्षणभर आश्चर्य वाटून गेले. खोलीतला झिरोचा पिवळा दिवा खोलीत मळकट प्रकाश फेकत होता. त्याने सावकाश मोहीतला बिछान्यावर ठेवले, मग त्याने आपले बाहेरचे कपडे घड्याकरून कपाटात ठेवले आणि रात्री घालायचे कपडे बाहेर काढुन कपाटाचे दार लावले. दार लावल्यावर त्याने सहज कपाटाच्या दारावरच्या आरश्यात बघीतले आणि विजेचा झटका बसावा तसा एक सणसणीत शॉक त्याला बसला. त्याच्या छातीतून एक शार्प कळ निघून सर्व शरीरभर पसरली. मागच्या भिंतीला टेकुन, गुडघे पोटाशी घेऊन, लाल कपडे घातलेली एक आकृती त्याला आरश्यात दिसली. चेहरा निट दिसला नसला तरीही आकाशवर रोखलेले ते डोळे त्याला आरश्यात दिसले. संताप, द्वेष, आक्रोश, उद्वेग सर्व काही त्या नजरेत भरलेले होते.

आकाशने पटकन मागे वळून पाहीले, परंतू मागे कोणीच नव्हते. आकाशने पुन्हा एकदा आरश्यात पाहीले, परंतू ह्यावेळेस त्याला कोणीच दिसले नाही.

आकाशने खोलीत सर्वत्र नजर टाकली, पण शाल्मली आणि मोहीत व्यतीरीक्त त्याच्या नजरेस कोणीच पडले नाही.

तो एक क्षण... आकाशच्या काळजाचा थरकाप उडवून गेला. आकाश अजूनही दरवाज्याचे हॅन्डल घट्ट धरून उभा होता. आपण जे पाहीलं तो एक नजरेचा धोका होता?, का खरंच तिथे कोणीतरी होतं ह्याबद्दल त्याचं मन सुध्दा संभ्रमावस्थेत होतं.

आकाश सावकाशपणे आपल्या पांघरुणात शिरला आणि डोळे घट्ट बंद करून झोपण्याचा प्रयत्न करु लागला. त्याचे मानेचे, पाठीचे स्नायु आकुंचले होते. कधीही, कुठल्याही

क्षणी पाठीला कुणाचातरी स्पर्श होईल की काय ह्या विचारांनी त्याच्या छातीची धडधड वाढली होती. घड्याळातला प्रत्येक क्षण स्लो-मोशन मध्ये असल्यासारखा पुढे सरकत होता. एखाद्या अवकाशात असावी तशी शांतता त्या खोलीत पसरली होती, अत्यंत गुढ, अथांग, छातीवर आणि मनावर दडपण आणणारी. घड्याळयाच्या काट्यांचा 'टक-टक-टक-टक' आवाज कानठळया बसवत होता.

आकाश एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर होत झोपण्याचा प्रयत्न करत होता, पण काही केल्या त्याला झोप लागत नव्हती. सतत कोणीतरी आपल्यावर पाळत ठेवून आहे असा भास त्याला होत होता. शेवटी वैतागून तो उठला आणि त्याने डोळे उघडले. पहिल्यांदा सर्वत्र अंधारच दिसत होता, पण थोड्याच वेळात त्याची नजर त्या मंद प्रकाशाला सरावली. त्याने नजर खोलीभर सर्वत्र फिरवली. तो कश्याचातरी शोध घेत होता, परंतू त्याला अपेक्षित असलेले त्याला खोलीत काहीच दिसले नाही.

त्याने शाल्मलीकडे पाहीले. तिचा चेहरा अतिशय दमलेला, अशक्त, निस्तेज भासत होता. आकाशने हात लांब करून तिच्या कपाळावर ठेवला. ताप एव्हाना थोडा कमी झाला होता.

आकाश बऱ्याच वेळ डोळे मिटून बसुन राहीला. त्याचे कान कसल्याही प्रकारचा आवाज टिपण्यासाठी आसुसले होते, परंतू मगाचचीच ती शांतता अजूनही सर्वत्र पसरली होती.

आकाश शेवटी परत एकदा आपल्या पांघरुणात शिरला आणि डोळे मिटून पडून राहीला. खुप उशीरा कधीतरी निद्राराणी त्याच्यावर मेहेरबान झाली आणि आकाश झोपी गेला.

सकाळच्या सोनेरी सुर्यकिरणांनी आदल्या रात्रीचा वातावरणातला तणाव निवळून काढला होता. खिडकीच्या पडद्यांमधुन झिरपणाऱ्या किरणांनी खोली लख्ख उजळून निघाली होती. शाल्मलीचा ताप सुध्दा एव्हाना उतरला होता.

“कसं वाटतं आहे शोनु?”, आकाशने शाल्मलीला विचारले.

“ठिक आहे आता, थोडा अशक्तपणा वाटतो आहे पण..”, शाल्मली उठून उशीला टेकून बसत म्हणाली… “एक छोटंसं काम करतोस का माझ?”

“हो.. सांग ना..”, आकाश

“त्या निळया बॅगेत ना, रेडी टु मिक्स टॉमेटो सुप्स ची दोन-तीन पाकीटं आहेत, प्लिज बनवून देतोस? मोहीतला पण कर, तो पण घेईल…”, शाल्मली म्हणाली.

“ॲट युअर सर्व्हीस मॅम…”, असं म्हणून आकाशने शाल्मलीला एक सॅल्युट ठोकला आणि तो तेथून बाहेर पडला…

आकाशने स्वयंपाकघरात पाणी गॅसवर गरम करायला ठेवले आणि सुपचे एक पाकीट उघडून तो पातेल्यात टाकतच होता तोच त्याच्या कानावर शाल्मलीची किंकाळी ऐकू आली.

आकाशने घाईघाईत गॅस बंद केला आणि धावत धावतच तो बेडरुममध्ये गेला.

शाल्मली विस्फारलेल्या नजरेने आपल्या हातांकडे बघत होती.

"काय झालं?", आकाशने आत येत दारातूनच विचारले.

"आकाश.. हे बघ.. हे काय झालं माझ्या हाताला???", शाल्मली आपले हात पुढे करत म्हणाली.

आकाशने शाल्मलीचे हात पाहीले... हाताला लाल रंगाचा काहीतरी चिकट पदार्थ लागला होता.

आकाशने तिचा हात स्वतःच्या नाकाजवळ आणला आणि वास घेऊन तो म्हणाला, "लिपस्टीक.. लिपस्टीकचा वास आहे हा..."

शाल्मलीने सुध्दा आपल्या हातांचा वास घेऊन मान डोलावली.

"पण मी तर लिपस्टीक लावली नाही.. मग माझ्या हाताला लिपस्टीक कुठून लागली???", शाल्मली..

मोहीत हा सर्व प्रकार आपल्या किलकिल्या डोळ्यांनी पहात होता.

"मला माहीत आहे आईने लिपस्टीकचे काय केले ते!!", मोहीत...

आकाश आणि शाल्मलीने प्रश्नार्थक नजरेने मोहीतकडे पाहीले.

"आई बॅड गर्ल आहे, ते बघ तिने भिंतींवर रेघोट्या मारून ठेवल्या आहेत..", असं म्हणून मोहीतने भिंतींकडे बोट दाखवले.

आकाश आणि शाल्मलीने मोहीत दाखवत असलेल्या दिशेने पाहीले. दोघांचेही डोळे विस्फारले गेले. दोघंही आळीपाळीने कधी एकमेकांकडे तर कधी भिंतीवर उमटलेल्या त्या अगम्य भाषेतील अक्षरांकडे बघत राहीले.

भितीचा, आश्चर्याचा आवेग ओसरल्यानंतर आकाश म्हणाला, “काय आहे ते? जेवढं मला आठवतं आहे, आधी नव्हतं तिथे काही लिहीलेले…”

“मी.. मी नाही लिहील ते..”, शाल्मली आपल्या हातांकडे पुन्हा पुन्हा बघत म्हणाली.. “केवढं उंच आहे ते, माझा हात तरी पुरेल का तिथं पर्यंत…”

“आय नो शमु.. पण मग हे…?”, आकाश

“काय आहे ते लिहीलेलं?? संस्कृतमध्ये काही लिहीलं आहे का?”, शाल्मली…

“नाही, संस्कृत वाटत नाहीये, बहुदा मोडी लिपी आहे ती…”, आकाश

“पण इतक्या उंचावर जाऊन कोणी लिहीलं असेल? जुन्या काळचं बांधकाम आहे हे, किती उंची आहे इथल्या खोल्यांना..”, शाल्मली

“हो.. पण.. हे नवीनच लिहीलेले दिसते आहे, जुनं असतं तर त्यावर जमलेली धुळ दिसली असती, आणि..”, आकाश

“आणि काय आकाश?”, शाल्मली

“आणि.. तुझ्या हाताला लागलेले हे लिपस्टीक!!”, आकाश

दोघंही विचारात बुडून गेले. त्यांची तंद्री भंगली ती आकाशच्या मोबाईल वाजण्याने.

आकाश त्या आवाजाने एकदम दचकला. बऱ्याच वेळ तो मोबाईलकडे बघत राहीला आणि मग त्याने सावकाश मोबाईल उचलला..

“हॅलो.. आकाश साहेब…झोपला होतात की काय?”, पलिकडून जयंताचा, आकाशच्या मित्राचा आवाज आला.

“अं..नाही नाही, जागाच आहे…”, आकाश

“अहो मग फोन एवढ्या उशीरा का उचललात???”, जयंत

“नाही.. कुठं.. ठिक आहे.. ठिक आहे सगळं…”, आकाश

“अरे पण मी कुठं विचारले, कसं चाललं आहे? असा भंजाळल्यासारखा का वागतो आहेस?”, जयंत.. “बरं ठिक आहे ना सगळं?”

“हो.. हो.. ठिक आहे सगळं..”, आकाश

“आकाश.. काय झालंय? तुझ्या आवाजावरून वाटत नाहीये सर्व ठिक आहे.. जरा निट सांगशील का???”, जयंत

आकाश मोबाईल घेऊन खोलीच्या बाहेर आला. आधीच घाबरलेल्या आणि आजारी शाल्मलीसमोर त्याला बोलायला नको वाटत होते. त्याने बेडरुमचे दार लावून घेतले आणि तो खालच्या मजल्यावर आला व मग त्याने सावकाश घडलेला सर्व घटनाक्रम जयंतला सांगायला सुरुवात केली.

जयंताने आकाशचे सर्व म्हणणे शांतपणे, मध्ये काहीही न बोलता, आकाशला न टोकता ऐकून घेतले. आकाशचे बोलून झाल्यावर तो म्हणाला, “मित्रा, एक काम करतोस का?”

“हम्म.. बोल ना!”, आकाश म्हणाला..

“तू ते जे काही भिंतीवर लिहीलेले म्हणतो आहेस, त्याचा एक मोबाईलमधुन फोटो काढुन एम.एम.एस करतोस का? मी बघतो त्याचं काही तरी. आमच्या इथे एक मेक-अप आर्टीस्ट आहेत, बरेच एजेड आहेत ते.. त्यांना मोडी लिपी वाचता येत असावी…”, जयंत म्हणाला..

आकाशने बरं म्हणून फोन ठेवून दिला आणि तो धावतच वरच्या खोलीत आला.

शाल्मली रुमालाला आपले हात पुसण्यात गुंग होती.

आकाशने भिंतीकडे मोबाइल धरला आणि ’ते’ जे काही लिहीलेले होते त्याचा एक फोटो काढुन जयंतला लगेच एम.एम.एस करून टाकला.

“काय झालं?”, शाल्मलीने विचारले…

“काही नाही, जयंताच्या स्टाफ मध्ये एक जण आहेत, त्यांना बहुदा मोडी लिपी येत असावी. हे जर मोडी लिपीतच काही लिहीलेले असेल तर आपल्याला अर्थ कळेल त्याचा. मी ह्याचा एक फोटो जयंतला पाठवला आहे..”, आकाश म्हणाला.

दोघंही जणं विमनस्क अवस्थेत बेडवरच विचार करत बसले होते.

प्रत्येक क्षण युगायुगाचा वाटत होता. आकाश पुन्हा पुन्हा आपल्या मोबाईलवर रेंज आहे ना, बॅटरी आहे ना ह्याची चाचपणी करत होता.

थोड्याच वेळात जयंताचा फोन आला. आकाशने रिंग वाजल्या वाजल्या तो फोन उचलला..

“हा बोल जयंत.. काही कळालं?”, भिती मिश्रीत उत्सुकतेने आकाशने विचारले.

“आकाश….”, थोड्यावेळ थांबून जयंत पुढे म्हणाला .. “तू मगाशी जे काही सांगितलेस ते ऐकून प्रकरण मला काही ठिक दिसत नाहीये.. तू एक काम कर, सर्वजण एकत्रच, एका खोलीतच थांबा, एकमेकांपासून वेगळे होऊ नका, शक्यतो माहीत नसलेल्या गोष्टी हाताळू नका, मी ५-६ तासात पोहोचतो आहे तिकडे..”

“अरे हो.. पण काय झालं ते तर सांगशील??”, आकाश

“सांगतो, आल्यावर सविस्तर सांगतो. कदाचित माझा अंदाज चुकीचासुध्दा असेल, तसे असेल तर सोन्याहून पिवळे.. मी तिथे आल्यावर बोलू आपण…”, जयंत

“अरे पण ते काय लिहीले आहे ते तर सांगशील का???”, आकाश म्हणाला…

“रिव्हेंज.. बदला… एव्हढचं लिहीलं आहे ते आकाश, मी शक्य तितक्या लवकर येतोय तिकडे..” असं म्हणून जयंताने फोन बंद केला.

आकाशने हळुवारपणे फोन बंद केला. त्याने मोहीत मग शाल्मलीकडे आणि नंतर भिंतीवरल्या त्या लिखाणाकडे नजर टाकली आणि तो म्हणाला… “जयंता येतोय इकडेच..”

मग तो बेडवरून खाली उतरला आणि त्याने खोलीचे दार बंद करून घेतले……………….

जयंत बंगल्यावर पोहोचला तेंव्हा घड्याळात ३ वाजून गेले होते.

“वहिनी कश्या आहेत?”, जयंतने दारातूनच विचारले

“शाल्मली ठिक आहे. ताप उतरला आहे तिचा, पण अजूनही अशक्तपणा आहे तिच्या अंगात”, जयंताला आतमध्ये घेत आकाश म्हणाला.

जयंत आत आल्यावर आकाशने दार लावून घेतले.

“कसा झाला प्रवास?”, जयंताच्या हातातली बॅग घेत आकाश म्हणाला.

“चल एकदा वहीनींना भेटून घेतो, मग आपण सविस्तर बोलू”, आकाशचा प्रश्न टाळत जयंत म्हणाला.

“बरं, चल वरच्या खोलीत आहे शाल्मली”, असं म्हणून आकाश जिन्याकडे गेला, जयंतसुध्दा त्याच्यामागोमाग वरच्या खोलीत गेला

शाल्मलीला नुकतीच झोप लागली होती. मोहीतला सुध्दा सकाळपासून कुठेच बाहेर पडता आले नव्हते त्यामुळे तो सुध्दा कंटाळून झोपून गेला होता. दोघांना झोपलेले पाहून जयंत माघारी फिरला. मग त्याला काहीतरी आठवले, तसे पुन्हा तो खोलीत आला आणि त्याने आकाशला खुणेनेच काहीतरी विचारले.

आकाशने त्याला भिंतीकडे बोट दाखवून ती अक्षरं दाखवली. जयंताने काही क्षण तिकडे निरखून पाहीले आणि मग काहीही न बोलता तो पुन्हा खोलीच्या बाहेर पडला. पाठोपाठ आकाश सुध्दा बाहेर आला आणि त्याने खोलीचे दार लावून घेतले.

जिन्यातून खाली येताना दोघंही गप्पच होते. खाली आल्यावर जयंताने त्याच्या बॅगेतून 'स्मर्नऑफ व्होडका' ची बाटली काढली आणि आकाशला म्हणाला, "जा पाणी घेऊन ये.. आपण बाहेरच पायऱ्यांवर बसु.."

आकाश पाणी आणायला स्वयंपाकघरात गेला, तोवर जयंताने बॅगेतून काही चिप्सची पाकीटं, एक खारावलेल्या दाण्यांचे आणि एक खारावलेल्या काजुचे पाकीट जे त्याने कोकणातून येताना घेतले होते ते बाहेर काढले आणि तो बंगल्याबाहेरच्या पायऱ्यांवर येऊन बसला. थोड्याच वेळात आकाशसुध्दा स्वयंपाकघरातून पाणी आणि दोन थर्माकॉलचे ग्लास घेऊन बाहेर आला.

"हे काय? असल्या ग्लासमधुन प्यायची?", जयंत आकाशच्या हातातल्या त्या ग्लासकडे बघत म्हणाला.

"मग काय झालं? आता इथं थोडं नं आम्ही काचेचे सुबक नक्षीकाम केलेले ग्लास घेऊन आलो होतो…", आकाशने दोन्ही ग्लास जयंताच्या हातात दिले

जयंताने तोंड वेडीवाकडं करत दोन पतियाळा पेग बनवले, बरोबरच्या पिशव्या फोडल्या आणि भिंतीला टेकून बसला. आकाशसुध्दा त्याच्याशेजारीच भिंतीला टेकून बसला.

दोन-तिन घोट घश्यात गेल्यावर आकाश म्हणाला, "बोल काय म्हणतोस?? काय प्रकार आहे हा?"

“आकाश,………. तुझा भूत, आत्मा, वगैरे गोष्टीवर विश्वास आहे?”, सरळ आकाशच्या डोळयात बघत म्हणाला

“काय?? भूत????”, आकाश हसत म्हणाला..”अरे काही काय? आपण कुठल्या काळात रहातोय? विज्ञानाने इतकी प्रगती केली आहे आणि तु…”

“हो? की नाही? तेवढं सांग, विज्ञान मी सुध्दा शिकलो आहे…”, आकाशला मध्येच थांबवत जयंत म्हणाला.

“नाही…..”, दोन क्षण विचार करून आकाश म्हणाला.

जयंत काहीच बोलला नाही, हे पाहून आकाश पुढे म्हणाला, “म्हणजे तुला असं म्हणायचं आहे की हा सर्व भूताटकीचा प्रकार आहे?”

“मी खात्रीने तर नाही सांगू शकत तसं, पण एकुण परिस्थिती पाहून माझा तरी तसाच समज झाला आहे…”, जयंत

“अरे पण.. आजच्या जमान्यात कुठं असतात भुत? ह्या सगळया जुन्या कल्पना झाल्या, आजकाल कोण मानतं असल्या गोष्टींना?”, आकाश

“का? काळ बदलला की भुतं बदलतात का? पूर्वीच्या काळी मानल्या गेलेल्या काही गोष्टी ह्या अंधविश्वासातून मानल्या गेलेल्या होत्या हे ओघवत्या काळात सिध्द होत गेले. पण भूत

ही संकल्पना खरी का खोटी हे खात्रीलायक रित्या अजूनपर्यंत तरी कोणीही सिध्द केलेले नाही. ज्यांनी अनुभवले त्यांनी मानले, ज्यांनी अनुभवले नाही, त्यांचा अर्थातच ह्या संकल्पनेवर विश्वास बसणार नाही.", जयंत म्हणाला.

"पण तुला असं का वाटतं आहे, हा सर्व प्रकार..", आकाश

"ह्या बंगल्याला स्वतःचा असा नक्कीच एखादा इतिहास असणार, इथं नक्कीच काहीतरी वाईट, कुणालातरी दुखावणारे घडलेले असणार... तुच विचार कर, इथं आल्यानंतर असं थोडंस वेगळं नाही वाटत??"

"........."

"थोडासा अस्वस्थपणा नाही जाणवतं"?

"..................."

"इथं आपण दोन-चार लोकं सोडली तर आजुबाजुला एकही सजीव प्राणी पक्षी का नाही?"

"त्या खोलीत बांधलेल्या लसणाच्या माळा, आणि रामुकाकांनी त्याचा सांगितलेला संबंध आणि भिंतीवर ती मोडीलिपीतली अक्षरं...", जयंत

"हो, ती अक्षरं तर एक कोडचं आहे, कोणी जाऊन ती अक्षरं लिहिली असतील इतक्या उंचावर?", आकाश

“वहिनींच्या हाताला लागलेल्या लिपस्टीकवरून तू काहीच निष्कर्ष कसा नाही काढु शकत आकाश? मला तर वाटतं वहीनींनीच ती अक्षरं लिहिली असावीत, किंबहुना त्यांच्या हातून ती अक्षरं लिहून घेतली गेली असावीत…”, जयंत

“ओह स्टॉप इट जयंत.. तू आता काहीच्या काही बोलत आहेस.. तुला असं म्हणायचं आहे की शाल्मलीला भुताने पछाडले वगैरे आहे???”, आकाश वैतागून म्हणाला

“हे बघ, मी खात्रीलायक रित्या तसं म्हणत नाही, आपल्याला ह्या प्रकरणाच्या मुळाशी जावंच लागणार आहे, पण परिस्थिती तसेच काहीसे सुचवती आहे. तू वहीनींना तीच अक्षरं पुन्हा एखाद्या पानावर लिहायला सांग, मला जवळ जवळ खात्री आहे, ते अक्षर आणि हे अक्षर नक्की जुळेल.. लावतोस पैज?”, जयंत हात पुढे करत म्हणाला.

आकाश काहीच बोलला नाही.

“त्या दिवशी रात्री, तुच म्हणालास, शाल्मलीचे एक नवीनच रुप तू पाहीलेस, खरं का खोटं?”, जयंत

“म्हणजे? त्या दिवशी मी एका भुताबरोबर संभोग केला असं तुला म्हणायचे आहे?”,आकाश

जयंताने खांदे उडवले, मग कपात उरलेला पेग एका घोटात पिऊन टाकला आणि पुन्हा एक नवीन पेग बनवला.

“दुसऱ्या दिवसापासून वहीनींना अचानक आलेला ताप माझ्या म्हणण्याला एक प्रकारची पुष्टीच देतो..”, जयंत

“ताप? त्याचा काय संबंध? ती केवळ मोहीतच्या प्रकरणामुळे घाबरली होती, कदाचित टेन्शन आल्याने सुध्दा तिला ताप आला असेल..”, आकाश

**“आपण आत्ताच आत्मा ह्या प्रकाराबद्दल बोललो. आपले मानवी शरीर हेच मुळी आपल्या आत्म्यावर निर्भर असते. सर्व शक्ती आत्मा रुपाने एकवटलेली असते. जेंव्हा दुसरा आत्मा आपल्या शरीराचा ताबा घेऊ पाहील तेंव्हा प्रतिकार होणारच. शाल्मलीच्या बाबतीतही तोच प्रकार झालेला असणार. तिला आलेला थकवा हे एक त्याचेच द्योतक असू शकते..”, जयंत**

आकाश शुन्यात एकटक नजर लावून विचार करण्यात मग्न झाला होता..

“हे बघ.. आपल्याला आत्ता काहीच कल्पना नाहीये की हा सगळा प्रकार काय आहे. आपल्याला शोध घ्यायला काहीतरी एक दिशा हवी आहे.. आपण हिच दिशा पकडून चालूयात. कदाचित पुढे गेल्यावर आपल्याला काही पुरावे मिळतील, कदाचित हे सिध्द होईल की हा भूताटकीचा प्रकार नाही, मग तेंव्हा आपण दिशा बदलू हवी तर. पण सध्या असा विचार करून पुढे जाण्यात काय चुक आहे?”, जयंत बोलत होता.

आकाश त्या प्रणयाच्या रात्रीचा शाल्मलीचा चेहरा, तिचे वागणे आठवण्याचा प्रयत्न करत होता.

“आकाश?? काय म्हणतो आहे मी?”, आकाशच्या पायाला हलवून जयंत म्हणाला.

“हम्म.. ठिक आहे. मला खात्री आहे, तसा काहीच प्रकार नसणार, पण तुझा गैरसमज दूर होण्यासाठी आणि कुठून तरी एक सुरुवात म्हणून हवं तर, आपण ही दिशा पकडू”, आकाश

जयंताने मान हलवून त्याला संमती दर्शवली.

“बरं आता मला सांग, कुठून आणि कशी सुरुवात करायची?”, आकाश

“सांगतो. इकडे येत असतानाच मी त्याचा विचार केला आहे…”, असं म्हणून जयंत उठला आणि तो आपल्या गाडीपाशी गेला. गाडीचे दार उघडून त्याने एक मोठी काळी बॅग बाहेर काढली आणि तो आकाशपाशी येऊन बसला.

“काय आहे ह्या बॅगेत?”, आकाशने विचारले.

“कॅमेरा.. व्हिडीओ कॅमेरा…”, जयंत म्हणाला..

“आणि काय करायचं ह्याचं? ह्याने तू भूत बित शुट करणार आहेस की काय? आम्हाला तर बाबा गेल्या ५-६ दिवसात काळं कुत्र सुध्दा नाही दिसलं आणि तुला भूत कुठून दिसणार?”, आकाश म्हणाला

“हा थर्मल कॅमेरा आहे आकाश.. हा आपल्या भोवतालची उर्जा, अंधारात मनुष्याची आकृती त्याच्या शारीरीक तापमानामुळे रेकॉर्ड करु शकतो..”, जयंता ती बॅग उघडत म्हणाला.

“म्हणजे.. मला नाही कळालं!, ह्यात भुत-बित काही असेलच तर ते कसं काय बुवा रेकॉर्ड होईल?”, आकाश

“सांगतो, पण त्याआधी मला सांग भूत म्हणजे काय? म्हणजे.. तुझ्या दृष्टीने भूताची व्याख्या ती काय?”, जयंत म्हणाला.

“भूत म्हणजे.. आता तसं कसं सांगता येईल? पण साधारणपणे एखादी व्यक्ती मरण पावली आणि तिच्या काही इच्छा अपुर्ण राहील्या असतील तर तिच्या आत्म्याला मुक्ती मिळत नाही. मग तिचा आत्मा इतरत्र भटकत रहातो.. कदाचित तेच भूत असावं!”, आकाश

“बरोबर.. आता आत्मा म्हणजे काय?”, जयंत

आकाशने आपले ओठ वाकडे केले आणि खांदे उडवून म्हणाला…”माहीत नाही…”

“आत्मा म्हणजे एक प्रकारची उर्जाच असते नाही का! जी आपल्याला डोळयांनी दिसु शकत नाही कदाचित, पण त्याचं अस्तित्व सुध्दा आपण नाकारु शकत नाही. हा थर्मल कॅमेरा आत्मा.. जसा आपण समजतो आहे तसाच, आणि जर ’ती’ गोष्ट म्हणजे खरंच एखादी अदृष्य शक्ती, उर्जा असेल तर तो नक्की चित्रीत करु शकेल.

आपले डोळे त्याच गोष्टी बघु शकतात ज्यावरून लाईट परावर्तीत होतो, पण ह्याचा अर्थ असा नाही की सर्व प्रकारचा लाईट आपण बघु शकतो. आपले डोळे कदाचित सर्व गोष्टी पाहु शकत नाहीत. आत्मा, त्यातून निर्माण होणारी उर्जा, त्यातून परावर्तीत होणारा लाईट त्याच

प्रकारातला. त्याला वैज्ञानिक भाषेत म्हणतात 'इक्टोप्लासमीक स्पेक्ट्रल लाईट' आणि हा कॅमेरा तो लाईट टिपू शकतो."

"पण.. पण तू म्हणतोस तसं सगळं खरंच असेल तर शाल्मलीच्या, मोहीतच्या, आपल्या दोघांच्या जिवाला धोका आहे. त्यापेक्षा आपण इथं थांबूयातच नको, आत्ताच सामान भरु आणि निघुयात इथून. काय म्हणतोस?", आकाश जागेवरून उठत म्हणाला.

"नाही आकाश, तसं करणं कदाचित योग्य ठरणार नाही. वहीनींची तब्येत आत्ता ठिक नाहीये. आपला अंदाज.. देव नं करो, जर बरोबर असेल तर वहीनींचं शरीर, त्यांची मानसिकता अतिशय क्षीण झालेली आहे. इथं असलेल्या त्या अघोरी शक्तीने चवताळून जाऊन वहीनींच काही बरं वाईट करण्याचा प्रयत्न केला तर? त्यापेक्षा आपण एक-दोन दिवस थांबून काय प्रकरणं आहे ह्याचा छडा लावायचा प्रयत्न करुयात असं मला वाटतं..", जयंत म्हणाला.

"ठिक आहे.. पण तो पर्यंत?? सुरक्षितेसाठी काहीतरी उपाय करणं गरजेचं आहे नाही का??", आकाश

"मला वाटतं आपण इतक्या सगळ्या गोष्टी मानलेल्या आहेतच, त्यावर सध्यातरी डोळे झाकून विश्वास ठेवलेला आहेच, तर मग आपण रामुकाकांनी सांगितलेले पण ऐकले तर?", जयंत म्हणाला

"रामुकाका? काय म्हणाले होते ते..?", आकाश आठवण्याचा प्रयत्न करत म्हणाला.

"ते.. खालच्या खोलीत बांधलेल्या लसणांच्या माळांबद्दल म्हणाले होते असं तू म्हणाला होतास ना? कदाचित आपण त्या खोलीत सुरक्षित राहु. आजची रात्र तिथे काढायला काय हरकत आहे?", जयंत म्हणाला

आकाशने विरोध दर्शवायला तोंड उघडले, पण त्याला माहीत होते की दुसरा काही पर्याय पण नाहीये.

दोघांच्या गप्पा संपेपर्यंत सुर्यास्त होऊन गेला होता आणि बाहेर अंधारायला लागले होते.

"चल तर मग, लागू यात पटापट कामाला..", असं म्हणून जयंत उठला, पाठोपाठ आकाशही उठला आणि ते आतमध्ये आले.

"मी इथं खोलीच्या बाहेर कॅमेरा लावून ठेवतो, तो पर्यंत तू वहीनी आणि मोहीतला घेऊन ह्या खोलीत ये.. आणि आवश्यक काही असेल, खाण्याचे काही असेल, पाणि तर ते पण खोलीतच आणून ठेव. आपण आज रात्री काहीही झालं तरीही खोलीच्या बाहेर पडणार नाही आहोत..", जयंत म्हणाला.

काही क्षण दोघांनीही एकमेकांकडे पाहीले आणि मग आकाश वरच्या खोलीत शाल्मली आणि मोहीतला आणायला पळाला तर जयंत ट्रायपॉड सेट करून त्यावर कॅमेरा लावण्यात गुंग होऊन गेला.

जस जसा सुर्य खाली गेला आणि अंधाराचे साम्राज्य वाढु लागले तस तसा वातावरणातला तणाव वाढू लागला.

शाल्मलीला आकाश आणि जयंतने विशेष काही सांगितले नव्हते परंतू दोघांच्या वागणुकीत, हालचालीत पडलेला फरक, अचानक खालच्या खोलीत येऊन रहाणे ह्यावरून काहीतरी विचित्र घडत आहे ह्याची तिला जाणीव झाली होती. मोहीत सुध्दा शाल्मलीला बिलगूनच बसला होता.

खोलीतला दिवा लावण्यात आला आणि खऱ्या अर्थाने रात्रीची सुरुवात झाली.

आकाशने खोलीचे दार लावून घेतले. कॅमेरा ट्रायपॉड माऊंट करून खोलीच्या बाहेरच लावला होता. जयंत जुने विषय काढुन वातावरणातला तणाव निवळवण्याचा प्रयत्न करत होता, परंतू त्याच्या प्रयत्नांना विशेष यश येत नव्हते.

घड्याळात ९.३० वाजून गेले आणि अजून विशष अशी काही हालचाल कुठे जाणवली नव्हती.

“कदाचित आपण जो विचार केला होता तो पुर्ण चुकीचा असेल…”, आकाशने विचार केला खरा, परंतू वातावरणात होत चाललेला बदल, विनाकारण वाढत असलेला दबाव त्याला शांत बसु देत नव्हता.

दहा वाजून गेले तसे सर्वांनीच थोडं फार खाऊन घेतले आणि आपल्या पांघरुणात शिरून झोपण्याचा प्रयत्न करु लागले. अर्थात झोप येणं अशक्यच होतं, पण दिवसभरातल्या घडामोडींमुळे शरीराला आणि मनाला थकवा आला होता त्यामुळे नकळतच सर्वांचे डोळे मिटले गेले.

साधारणपणे रात्री १ वाजता कसल्याश्या आवाजाने आकाशला जाग आली. बऱ्याच वेळ तो कसला आवाज असावा ह्याचाच आकाश करत होता. जणु काही कोणीतरी झाडू मारत असल्याचा तो आवाज वाटत होता.. किंवा… किंवा कोणीतरी सरपटत चालण्याचा..

आकाशने हळुच हलवून जयंताला जागे केले. जयंता लगेच उठून बसला. दोघंही बाहेरील आवाज कान देऊन ऐकू लागले. तो आवाज हळु हळु जवळ जवळ येत होता. काही क्षणातच तो दाराच्या अगदी जवळ आला आणि मग तेथून पुढे जिन्यापाशी गेला. हळु हळु तो आवाज दूर दूर गेला. बहुदा ते जे कोणी होतं ते जिन्याचा आधार घेऊन वरच्या खोलीकडे चालले होते.

काही क्षण शांततेत गेले आणि मग एक संतापलेली चित्कार दोघांना ऐकू आली आणि परत तोच सरपटण्याचा आवाज जिन्यांवरून खाली येताना ऐकू आला. हळु हळु तो आवाज पुन्हा एकदा दारासमोर आला आणि तेथेच थांबला. 'ते' दाराच्या बाहेर थांबले होते. दोघांच्याही मध्ये फक्त एक लाकडी दार होते. जर का ते पलीकडचे आघोरी, सैतानी, पाशवी असेल तर ह्या सर्वांच्या जिवनाची दोरी त्या एका लाकडाच्या दाराने बांधली गेली होती. ते दार उघडले गेले असते तर पुढे काय झाले असते हे वेगळे सांगायची आवश्यकता नव्हती.

बराच वेळ शांततेत गेला. प्रत्येक क्षण मनावर दडपण टाकत होता.

"आकाश....", अचानक आलेल्या शाल्मलीच्या आवाजाने आकाश आणि जयंत दचकले.

आकाश उठून शाल्मलीच्या जवळ गेला.

"काय गं? काय झालं??", आकाशने विचारले..

"आकाश.. कसं तरी होते आहे... खुप घुसमटल्यासारखे होतेय.. आकाश...", गळयावरून जोरात हात फिरवत शाल्मली म्हणाली

आकाशने वळून जयंताकडे पाहीले, जयंत सुध्दा उठून शाल्मलीकडे आला.

"वहीनी.. काय होतंय...?", जयंता म्हणाला..

“चावतंय काही तरी सर्व शरीराला… खुप साऱ्या घोंघावणाऱ्या माश्या शरीरावर बसल्या आहेत असं वाटतं आहे.. असंख्य मुंग्या शरीराचा चावा घेत आहेत असं वाटतं आहे… आकाश.. काहीतरी कर

प्लिज…”,.. शाल्मली अस्वस्थ होत म्हणाली.

“हो.. हो… मी करतो काही तरी,..”, अगतिक होत आकाश म्हणाला..

शाल्मली अस्वस्थ होत अंथरुणात तळमळत होती. सतत एकदा गळयावरून, मानेवरून हात फिरवत होती, तर कधी हात झटकत होती..

“जयंत? काय होतंय शाल्मलीला?”, आकाशने जयंताला विचारले.

“वहीनी, स्वप्न पडले आहे का काही? उठून बसता का जरा?, पाणी प्या म्हणजे बरं वाटेल..”, जयंत म्हणत होता.

शाल्मलीने डोळे उघडले आणि ती बेडवरून खाली उतरून पाणी प्यायला जाऊ लागली. पण त्याचवेळेस एखाद्या पाशवी शक्तीने तिला भिंतीकडे लोटले. शाल्मली क्षणार्धात भिंतीकडे फेकली गेली. एखाद्याने जोरदार थोबाडीत द्यावी आणि त्या आघाताने जसे तोंड एका बाजुला फेकेले जावे, तशी शाल्मलीची मान एका बाजुला कलली. तिची बुबुळ डोळयाच्या वरपर्यंत गेली आणि त्यामुळे तिचे डोळे पांढरे फटक दिसु लागले. चेहऱ्यावर झालेल्या त्या जोरदार आघाताने तिचे रिबीनीने बांधलेले केस विस्कटले गेले आणि तिच्या चेहऱ्यावर पसरले. शाल्मलीचे पाय एखाद्या लाकडासारखे कडक झाले. आणि मग ती हात पाय मागच्या बाजुला भिंतीकडे वळवून भिंतीचा आधार घेत वर वर सरकत छताला जाऊन चिकटली.

आकाश आणि जयंत विस्फारलेल्या नजरेने तो प्रकार बघत होते.. त्यांचा स्वतःच्या डोळयांवर विश्वासच बसत नव्हता.

थोड्या वेळाने शाल्मलीच्या तोंडातून शब्द बाहेर पडले. खरं तर तो शाल्मलीचा आवाज नव्हताच. गोड गळयाच्या शाल्मलीचा असा घोघरा, फाटका, चिरका आवाज असणं शक्यच नव्हतं...

“सोडनार नाय.. एकाला पन सोडनार नाय... जिता नाय जानार तुमी इथून भार... किति दिस लपशील इथं खुलीत.. येशील नवं बाहेर..”, असं म्हणून तो आवाज खदा खदा हसला.

त्या हसण्याने आकाश आणि जयंताच्या अंगावर काटा उभा राहीला..

हळु हळु शाल्मली पुन्हा जमीनीवर आली आणि तिथेच कोसळली...

आकाश आणि जयंताने थोडावेळ वाट पाहीली आणि मग त्यांनी शाल्मलीला उचलले आणि बेडवर आणून झोपवले.......



उर्वरीत रात्र शांततेत गेली. त्या प्रकरणानंतर नवीन काही घडलं नाही. आकाश आणि जयंत रात्रभर जागेच होते, झोपं लागणं शक्यच नव्हतं. जे आजपर्यंत केवळ ऐकलं होतं, चित्रपटांतून पाहीलं होतं ते आज डोळयांदेखत घडलं होतं. शरीराला पुन्हा पुन्हा चिमटा काढूनही ते एक वाईट्ट स्वप्न नसून सत्य होतं ह्याची कटू जाणीव दोघांना सतत होतं होती.

सकाळी सुर्याची किरणं बंद खिडकीच्या फटींमधून आतमध्ये आली खरी, पण त्यातही एक प्रकारचा मलूलपणा होता जणु काही सुर्याचे तेज त्या किरणांमधुन कोणीतरी हिरावून घेतले होते.

शाल्मली अजूनही झोपलेलीच होती, तिच्या चेहऱ्यावर थकवा दिसुन येत होता, तिचं शरीरसुध्दा तापाने फणफणलं होतं. फरक इतकाच होता की ह्यावेळेस त्याचे कारण जयंत आणि आकाश दोघांनाही माहीती होतं. बिचाऱ्या शाल्मलीला मात्र त्याची तिळमात्र कल्पना नव्हती. जयंता आणि आकाशने तिला ह्याबद्दल काहीच न सांगण्याचे ठरवून टाकले.

थोड्यावेळाने जयंताने खोलीचे दार उघडले. बाहेर थर्मल कॅमेरा अजूनही 'रेकॉर्डींग मोड' मध्ये चालू होता. जयंताने कॅमेराचा स्विच ऑफ केला आणि कॅमेरा घेऊन आतमध्ये आला.

जयंताच्या हातातला कॅमेरा बघून आकाश जागेवरून उठून बसला. दोघांनी एकवार शाल्मलीकडे पाहीले. ती झोपलेली आहे ह्याची खात्री झाल्यावर दोघंही सावकाश खोलीच्या बाहेर आले आणि त्यांनी खोलीचे दार लोटून घेतले. मग दोघंही बाहेर व्हरांड्यात येऊन बसले.

आकाशने कॅसेट रिवाईंड केली आणि मग प्ले चे बटन दाबून रेकॉर्डींग चालू केले.

पहिला बराच वेळ कॅमेरात नुसताच काळोख होता. कॅमेराच्या एल.सि.डी. स्क्रिनवर वेळेची नोंद दिसत होती. दोघंही जण त्या स्क्रिनसमोर डोकं खुपसुन काही दिसते आहे का ह्याचा पहाण्याचा प्रयत्न करत होते. कॅसेट पुढे पुढे जात होती आणि शेवटी ती वेळ जवळ येऊन पोहोचली.

आकाश आणि जयंत अधीक बारकाईने त्या स्क्रिनकडे पाहु लागले. थोड्यावेळाने तोच तो घसटत घसटत पुढे सरकण्याचा आवाज येउ लागला, परंतू स्क्रिनवर कोणीच दिसत नव्हते. हळु हळु तो आवाज दूर गेला. कालांतराने दूरवरून एक जोराने ओरडण्याचा आवाज आला आणि मग पुन्हा तो घसटत चालण्याचा आवाज जवळ जवळ येऊन स्तब्ध झाला.

काही क्षण गेले आणि नंतर एक अंधुकशी आकृती वेगाने सरकत कॅमेराच्या इथून खोलीकडे वळलेली दिसली. साधारण मानवाच्याच आकाराची निळया, पिवळया, तांबड्या, हिरव्या रेघांची किनार असलेली ती आकृती क्षणार्धात आली आणि दिसेनाशी झाली.

जयंताने पटकन कॅमेरा स्टॉप केला, थोडा रिवाईंड केला आणि मग स्लो-मोशनमध्ये प्ले केला. परंतू त्या रेघांव्यतीरीक्त तेथे पहाण्यासारखे काहीच नव्हते.

त्या दृश्याने आणि नंतर घडलेल्या घटनाक्रमांच्या आठवणींनी दोघांच्याही अंगावर काटा आला.

जयंताने कॅमेरा बंद केला आणि मग दोघांनीही एक दीर्घ श्वास घेतला.

“काय करायचं आता?”, बऱ्याच वेळानंतर आकाशने जयंताला विचारले

“आय विश आय नो…”, हताशपणे जयंत म्हणाला

“मला वाटतं अजून इथे वेळ घालवण्यात अर्थ नाही, आपणं जे पाहू नये ते काल पाहीलं. अजून विषाची परीक्षा कश्याला पहायची? शाल्मलीच्या जिवाला धोका आहे हे तर स्पष्ट आहेच, पण ह्याचा अर्थ असा नाही की आपण सुरक्षित आहोत…”, आकाश हवेत हात हलवत म्हणाला.

“हो, ते तर आहेच, पण इथून गेल्यावर प्रश्न मिटतील कश्यावरून? ज्यावरून शाल्मलीच्या शरीरात ’ते’ जे कोण आहे त्याला प्रवेश मिळत आहे, कश्यावरून ’ते’ आपल्याला शाल्मलीला घेऊन जाऊ देईल? कश्यावरून आपली ही घाई-गडबडीत केलेली कृती शाल्मलीच्या जिवावर उठणार नाही?”, जयंत

“पण मग करायचं काय? च्यायला कॉलेजमध्ये बरं होतं, कधी, कुठं, काही अडलं की आपण गुगल उघडून बसायचो…”, आकाश

“हे.. दॅट्स अ गुड आयडीया… तुझ्याकडे लॅपटॉप आहे, नेट कनेक्शन आहे.. लेट्स ट्राय गुगल.. व्हॉट से?” जयंताच्या चेहऱ्यावर एक आनंदाची लकेर उमटली.

“अरे काही काय? इथे कुठे गुगल? अश्या गोष्टी थोडं नं गुगल वर मिळणार आहेत?”, जयंताचा मुद्दा खोडून काढत आकाश म्हणाला.

“अरे बघायला काय हरकत आहे? झाला तर फायदाच आहे ना!!, जा उठ, घेऊन ये तू लॅपटॉप आणि नेटकार्ड”, आकाशच्या हाताला धरून जवळ जवळ उठवतच जयंता म्हणाला.

थोड्यावेळाने आकाश लॅपटॉप घेऊन आला. लॅपटॉपच्या कडेला असलेल्या यु.एस.बी.नामक खाचेत त्याने नेट-स्टीक लावली. बऱ्याच वेळ नेटवर्क सर्च केल्यावर शेवटी नेट कनेक्ट झाले.

संगणकातील ब्राउझरची विंडो उघडून आकाशने 'गुगल.कॉम' चे संकेतस्थळ उघडले. थोड्यावेळाने संगणकाच्या पडद्यावर रंगीत अक्षरात गुगल असे लिहीलेले गुगल चे संकेतस्थळ उघडले.

“हम्म.. बोल काय शोधु इथं?”, आकाशने विचारले

“अम्म.. शोध 'हाऊ टु स्केअर घोस्ट?' किंवा 'हाऊ टू गेट रिड ऑफ घोस्ट्स', भूतांना कसे घाबरावे.??”, जयंत म्हणाला..

“खरंच का?”, जयंता आपली थट्टा करतो आहे असं वाटून आकाशने विचारले.

“अरे हो.. खरंच सांगतो आहे.. बघ काही माहीती मिळते आहे का…”, जयंत म्हणाला

आकाशने सर्च बारमध्ये तसे टाईप करून सर्चचे बटन दाबले आणि थोड्याच वेळात तशी माहीती उपलब्ध असलेल्या अनेक संकेतस्थळांचे पत्ते संगणकाच्या पटलावर अवतरले…

“आयला.. हे गुगल गम्मतच आहे बाबा.. खरंच आहे, काहीच्या काही माहीती मिळते इथे…”, असं म्हणून आकाश त्या एक एक लिंक उघडून वाचु लागला. जयंतासुध्दा आकाशच्या जवळ येऊन ती माहीती वाचु लागला

पहीली पहीली माहीती फारशी उपयुक्त नव्हती. बहुतेक ठिकाणी तेंन तेच प्युअर / होली वॉटर, ख्राईस्ट क्रॉस वगैरे माहीती उपलब्ध होती. ती माहीती खरी का खोटी हा मुद्दा दूर होता, परंतू त्यापैकी कुठलीही गोष्ट इथं लगेच उपलब्ध नव्हती.

दोघंही जणं एकामागोमाग एक संकेतस्थळं पालथे घालत होते आणि एका ठिकाणी ते अचानक थांबले…

“हे बघ.. इथं काय लिहीलं आहे…”, आकाश संगणाककडे बोट दाखवत म्हणाला..”त्यांनी गार्लीक सुचवले आहे…”

“म्हणजे.. रामुकाका म्हणाले ते बरोबर होते तर..”, जयंत म्हणाला..

“अरे, पण मग जर हे खरं असेल तर…. तर काल रात्री ’तो’ प्रकार का झाला? आपण ज्या खोलीत होतो, तिथे तर लसणाच्या कित्तीतरी माळा होत्या”, आकाश म्हणाला.

“हो, बरोबर आहे… पण म्हणजे बघ ना.. त्या माळा कधी काळी लावल्या होत्या आपल्याला कुठे माहीत आहे? कदाचित त्या माळा ३०-४० वर्षांपूर्वी लावलेल्या असतील.. कदाचित त्यातली तिव्रता कमी झाली असेल….”, जयंत

“हम्म, ते ही आहेच म्हणा… बर बघु पुढे अजून काय लिहीलं आहे…”, असं म्हणून आकाश पुढे वाचु लागला.

“हे बघ.. मीठ.. लिहीलं आहे…”, आकाश पुढच्या बुलेट पॉईंटपाशी थांबत म्हणाला..

“मीठ?? का? म्हणजे त्याचे कारण काय सांगितले आहे?”, जयंताने विचारले..

“मीठ हे जमीन, पाणी आणि हवा ह्यांचबरोबर सुर्यापासून निघालेल्या उष्णतेपासून अर्थात एक प्रकारची आग निर्माण झालेले असते. हे सर्व घटक पंचमहाभूतांपैकीच आहेत. त्यांच्यापासून मीठ निर्माण होते तेंव्हा ह्या घटकांची शक्ती त्यामध्ये अंतर्भुत होते असं इथं लिहीलं आहे. आणि त्यामुळेच जर तुम्ही मीठाने बॉर्डर आखलीत तर भूतं ती बॉर्डर पार करून तुमच्यापर्यंत पोहोचु शकणार नाहीत…”, आकाश त्या संकेतस्थळावरील माहीती वाचत म्हणाला.

“हम्म.. हे सुध्दा खरं का खोटं माहीत नाही, पण जे काही लिहीलं आहे, ते पटण्यासारखं आहे…”, जयंता म्हणाला

“हो.. आणि आपल्याकडे मिठ पण आहे…”, आकाशने त्याचं वाक्य पुर्ण केलं.

आकाशने पुढे वाचण्यासाठी मान खाली वाकवली पण दोघांचेही लक्ष विचलीत झालं ते बंगल्याच्या गेटपाशी झालेल्या अचानक हालचालीने.

दोघांनीही चमकून कुंपणाकडे पाहीले. गेटपाशी एक आकृती स्थिर उभी होती. दोघांनीही एकमेकांकडे पाहीलं.

आकाशने लॅपटॉप खाली ठेवला आणि तो उठून उभा राहीला. जयंतासुध्दा जागेवरून उठून उभा राहीला आणि दोघंही कुंपणाकडे पहात राहीले.

त्या आकृतीने बंगल्याचे गेट उघडले आणि ती हळु हळु दोघांच्या दिशेने येऊ लागली. ती आकृती जवळ आल्यावर तिचा चेहरा स्पष्ट दिसु लागला तसा काहीश्या अविश्वासाने आकाश म्हणाला.. “रामुकाका?/?????”

रामुकाका सावकाश पावलं टाकत दोघांच्या जवळ येऊन उभे राहीले. त्यांच्या खांद्याला एक पिशवी होती तर दुसऱ्या हातात एक चुळबुळ करणारा मांजराचं छोटंस पिल्लु.

“रामुकाका? अहो होतात कुठे तुम्ही? असे अचानक कुठे निघून गेलात? काही सांगून जायची पध्दत…”, आकाशने प्रश्नांची सरबत्तीच सुरु केली.

“सांगतो.. सांगतो.. जरा मला आतमध्ये तरी येऊ द्यात…”, रामुकाका पायऱ्या चढुन व्हरांड्यात येत म्हणाले…

“अहो काय सांगतो?? इथे काय परिस्थिती ओढावली आहे तुम्हाला माहीत आहे का? आम्ही कुठल्या संकटातून जात आहोत…”, आकाश

“काय झालं?”, रामुकाकांनी विचारले..

मग आकाशने रामुकाका गेल्यानंतर थोडक्यात घडलेल्या घटना त्यांना ऐकवल्या.

थोडावेळ जाऊ देऊन रामुकाका म्हणाले…”मी सांगितलं होतं तुम्हाला.. तुमचाच विश्वास बसला नाही माझ्यावर…”

आकाशला तेंव्हा रामुकाकांची केलेली अवहेलना आठवली आणि त्याने खजील होऊन मान खाली घातली.

“बरं ते जाऊ द्या.. जे झालं ते झालं.. शाल्मली ताई कुठे आहेत?” रामुकाका म्हणाले

आकाशने समोरच्या खोलीकडे बोटं दाखवलं.

रामुकाका जागेवरून उठले आणि त्या खोलीत गेले. दोन क्षण थांबून त्यांनी खोलीत सर्वत्र नजर टाकली आणि मग निर्धास्त मनाने ते शाल्मलीजवळ गेले. मग त्यांनी खांद्याच्या पिशवीतून एक कागदाची पुडी काढली आणि त्यात असलेली राखाडी भुकटी शाल्मलीच्या कपाळाला लावली.

आकाश काही बोलण्यासाठी पुढे झाला, पण जयंताने त्याला हाताने थांबण्याची खुण केली.

मग रामुकाकांनी ती भुकटी मोहीतच्या कपाळाला लावली, नंतर ते आकाश आणि जयंताच्या जवळ आले आणि दोघांच्याही कपाळाला ती भुकटी लावली आणि नंतर स्वतःच्याही कपाळाला ती भुकटी लावून घेतली.

“रामुकाका? काय आहे हे? ह्या असल्या भुकटीने भुतबाधा वगैरे उतरते असा तुमचा समज आहे का?”, आकाशने न रहावून विचारले.

रामुकाका त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाले, “हे बघ आकाश.. जेंव्हा चांगले काही घडत असते ना, तेंव्हा नेहमी वाईटाची तयारी ठेवावी आणि त्याला धैर्याने सामोरे जायला खंबीर व्हावे. त्याचबरोबर, जेंव्हा एखाद्याचा वाईट काळ चालू असतो तेंव्हा चांगुलपणावर विश्वास ठेवावा. जशी दिवसानंतर रात्र आहे, तसेच रात्रीनंतर दिवस येणारच आहे, फक्त तो दिवस पहायला आपण डोळे उघडे ठेवायला हवेत.

प्रयत्न करणे आपल्या हाती आहे. हातावर हात घेऊन बसलो तर काहीच होणार नाही. आपण काही मांत्रीक, तांत्रीक नाही, कुठला उपाय रामबाण ठरेल हे आपल्याला माहीत नाही. गावच्या मंदीरातील हा अंगारा आहे. तो लावल्याने कोणाचे वाईट तर नक्कीच होणार नाही, झालं तर चांगलंच होईल नाही का???”

रामुकाका बोलत होते तोच शाल्मली आतल्या खोलीतून अंगाला शाल गुंडाळून बाहेर आली. पहील्यापेक्षा तिचा चेहरा आता बराच बरा दिसत होता. अंगात अशक्तपणा होता, पण निदान ताप उतरायला सुरुवात झाली होती.

रामुकाका आणि आकाशने एकमेकांकडे पाहीले..

“रामुकाका??? अहो कुठे होतात तुम्ही???”, रामुकाकांना पहाताच शाल्मली म्हणाली.

“सांगतो.. या.. बसा इथं.. तुमच्याशी बरंच काही बोलायचं आहे..”, असं म्हणून रामुकाका व्हरांड्यातील एका खांबाला टेकून खाली बसले. बाकीची मंडळीही त्यांच्याशेजारी कोंडाळं करून बसली.

सर्वांच्या नजरा रामुकाकांकडे लागल्या होत्या.

रामुकाकांनी आपल्या पिशवीमधुन एक लाल रंगाची लांबट पुस्तीका काढुन सर्वांच्या मध्ये ठेवली, त्याला मनःपुर्वक नमस्कार केला आणि ते म्हणाले, “मला इथं आल्यापासूनच खरं तर काहीतरी विचित्र वाटतं होतं. मलाच का? तुम्हाला का नाही? ह्याच उत्तर माझ्याकडे नाही. पण पहिल्यापासूनच आपल्या व्यतिरिक्त अजून कुणाचं तरी इथं अस्तित्व आहे जे कदाचित आपल्या डोळ्यांना दिसत नाहीये पण त्याला आपण दिसतो आहोत.. कोणीतरी आपल्यावर, आपल्या हालचालींवर सतत लक्ष ठेवून आहे असंच मला वाटत होतं. पण तुमचा माझ्यावर विश्वास बसला नाही.”

रामुकाकांनी आपल्या सदऱ्याच्या आत हात घालून आपली गळ्यातली रुद्राक्षाची माळ बाहेर काढली. उजव्या हाताने त्या माळेचे मणी त्यांनी आपल्या दोन्ही डोळ्यांना लावले, मग ती

माळ आपल्या कपाळावर टेकवली आणि ते पुढे म्हणाले, “त्या रात्री मी इथेच शेजारच्या खोलीत झोपलो होतो. किंबहुना झोपण्याचा प्रयत्न करत होतो असं म्हणा. पण मला झोप लागलीच नाही.

खोलीच्या एका कोपऱ्यात मी अंगाची कोंडाळी करून पडून होतो. रात्री हवेतला गारवा अचानक वाढला. दातावर दात वाजायला लागले आणि मला एका विचित्र जाणीवेने ग्रासले. खोलीत नक्कीच कोणीतरी होतं माझ्या.. सर्वांगावरून एक सरसरून काटा येऊन गेला. त्या अंधारात एक आकार तयार होत होता. कोणासारखा?, कश्याचा?, कश्यासाठी?... काहीच कल्पना नाही. त्या आकाराला एक न दिसणारे, ओळखू न येणारे डोळे होते जे माझ्याकडे रोखून बघत होते.

त्या गोठवणाऱ्या थंडीतही मला दरदरून घाम फुटला. हातपाय लटपटायला लागले. वाटलं आयुष्याचा हाच तो शेवट.. आपला मृत्यु अटळ असल्याची जाणीव होऊ लागली. तिथून उठून निघून जावेसे वाटत होते, पण शरीर साथच देत नव्हते. सर्व संवेदना बोथट झाल्या होत्या.

तो विचित्र आकार काही पावलं (!?) माझ्या दिशेने आला आणि मग तिथेच थांबला. इतक्यावेळ त्याचे ते अदृश्य डोळे माझ्या डोळयांकडे रोखले गेले होते, पण आता ती नजर माझ्या डोळयांवरून हटून माझ्या गळयाकडे लागली होती. संतापलेली, क्रोधीत, जळजळवणारी नजर...

नकळत माझा हात माझ्या गळयाकडे गेला आणि माझ्या हाताला ही रुद्राक्ष्याची माळ लागली. तो आकार ही माळ बघुनच थांबला होता. त्याच्या संतापाची झळ मला जाणवत होती. तो आकार हळु हळु दोन पावलं मागे सरला आणि तेथील कपाटाला टेकून बसला. त्याचे डोळे (!), त्याचा चेहरा (!) माझ्याकडेच बघत होता. खुप वेळ आम्ही दोघंही समोरासमोर बसलो होता.

शेवटी मी ती माळ हातात घट्ट धरली आणि डोळे मिटून आठवतील त्या देवांचा जप करु लागलो. मी किती वेळ डोळे बंद करून होतो मलाच ठाऊन नाही, पण जेंव्हा डोळे उघडले

तेंव्हा समोर कोणीच नव्हते. खरं तर आधीही कोणींच नव्हते. मला कोणी दिसलेच नव्हते, पण.. पण अंधारात.. अंधाराचाच एक आकार झालेला मला जाणवला होता.

सकाळ होताच मी कुणाचीच पर्वा न करता घरातून बाहेर पडलो आणि वाट फुटेल तिकडे चालत सुटलो. खुप अंतर दूर गेल्यावर मग शरीराचे एक एक अवयव काम करु लागले, संवेदना पुर्ववत होऊ लागली. मी त्या बंगल्यापासून खुप दूर आलो होतो, पण तुम्ही अजूनही तिथेच होतात आणि तुम्हाला झाल्या प्रकाराची कदाचित जाणीव सुध्दा झालेली नव्हती. तुम्हाला एकट्याला सोडवून ही जाववेना आणि परत माघारी फिरायची सुध्दा इच्छा होईना.

मग मी भोर गावात गेलो. तेथे अनेक लोकांशी बोललो, अनेकांना माझा अनुभव सांगितला. काही लोकांनी वेड्यात काढले तर काही लोकांनी न बोलणेच पसंद केले. परंतू शेवटी एक गृहस्थ भेटले आणि त्यांच्याकडूनच ह्या बंगल्याबद्दल, इथल्या लोकांबद्दल, इथल्या घटित/ अघटित घटनांबद्दल ऐकायला मिळाले आणि बऱ्याचश्या गोष्टींचा उलगडा झाला."

रामुकाका दोन क्षण थांबले, त्यांनी आळीपाळीने सर्वांकडे पाहीले. सर्वजण न बोलता रामुकाकांकडे टक लावून पहात होते.

"बरं मग काका, आता इथून बाहेर पडण्याचा काही मार्ग?", आकाशने विचारले.

"त्या आधी, इथे काय घडले होते? आत्ता जे घडते आहे ते का घडते आहे हे आपण जाणून घेणे महत्वाचे आहे. एकदा ते कळाले की इथून बाहेर कसे पडायचे ह्याचा आपल्या सर्वांना विचार करून मार्ग काढता येईल..", रामुकाका.

"रामुकाका.. आकाश.. नक्की काय घडले आहे इथे? मला काहीच कशी कल्पना नाही? कश्याबद्दल बोलत आहात तुम्ही?", शाल्मली म्हणाली.

“काही नाही शमु.. मी सांगतो तुला नंतर.. रामुकाका तुम्ही बोला पुढे…”, आकाश शाल्मलीचा प्रश्न टाळत म्हणाला..

“नाही आकाश.. शाल्मली ताईंना काय घडलं होतं हे माहीत असणं गरजेचे आहे. कदाचित दोन्ही वेळेस जेंव्हा हा प्रकार घडला तेंव्हा त्यांचे मन, त्यांचा अंतरात्मा बेसावध होता. जर घडला प्रकार त्यांना सांगितला तर त्या मनाने अधीक सक्षम होतील, कदाचित पुढच्या वेळेस त्या मनाने खंबीर रहातील..”, रामुकाका म्हणाले.

“दोन वेळेस?? नाही रामुकाका, फक्त एकदाच झालं हे काल….”,आकाश म्हणाला..

“नाही आकाश.. मी बरोबर म्हणालो दोन वेळेस. त्या दिवशी रात्री.. ती शाल्मली नव्हती आकाश.. ती.. ती नेत्रा गोसावी होती…”, रामुकाका कापर्‍या आवाजात म्हणाले.

शाल्मली गोंधळलेल्या नजरेने सर्वांकडे बघत होती.

आकाशने एकवार प्रश्नार्थक नजरेने जयंताकडे पाहीले. जयंताने मानेनेच त्याला संमती दिली. मग आकाशने घडलेला प्रकार शाल्मलीला ऐकवला.

क्षणाक्षणाला शाल्मलीच्या चेहर्‍यावरचे भाव बदलत होते. आकाशचे बोलून झाल्यावरत ती बर्‍याच वेळ सुन्न बसुन राहीली. मग अचानक अंगावरची शाल झटकून ती उभी राहीली आणि सर्वांगावरून तिने जोरजोराता हात फिरवला जणु काही अंगावर ५०-१०० झुरळं चढली असावीत. लगोलग ती बांथरुममध्ये गेली आणि बराच वेळ नळाने हात, पाय, तोंड धुवून ती बाहेर आली.

शाल्मली परत त्या कोंडाळयात बसली तेंव्हा तिच्या डोळयातून अश्रुंच्या धारा लागल्या होत्या.

रामुकाकांनी शाल्मलीच्या खांद्यावरून, पाठीवरून हात फिरवून तिला शांत केले आणि मग पुढे म्हणाले... "तर आता मी तुम्हाला ह्या बंगल्याचा, इथल्या लोकांचा आणि आपल्यात वावरणाऱ्या नेत्रा आणि त्रिंबकलालचा इतिहास ऐकवणार आहे..."

त्यांनी पुन्हा एकदा सर्वांच्यामध्ये ठेवलेल्या त्या लाल रंगाच्या लांबट पुस्तकाला नमस्कार केला आणि ते पुढे बोलू लागले...............................



*१९३० साली तत्कालीन इंग्रज कलेक्टर जॉनाथन हेअडी ह्यांनी हा बंगला बांधला. सुट्टीसाठी किंवा हवापालट म्हणून आपल्या कुटूंबाबरोबर ते इथे रहायला येत यायचे. त्यांच्याकडे घरकामासाठी पार्वतीबाई नावाची एक महीला आणि त्यांची ३ वर्षांची छोटुकली नेत्रा दोघीजणी येत असत. १९४७ साली हिंदुस्तान स्वतंत्र झाल्यावर जॉनाथनचे कुटूंब आपल्या मातृदेशाकडे, इंग्लंडकडे परतले.*

*जॉनाथनच्या जाण्यानंतर विष्णूपंत आचार्य ह्यांनी हिंदुस्तान सरकारकडून हा बंगला विकत घेतला. इंग्रजी कुटुंब परत गेले, परंतू त्यांची मोलकरीण, पार्वतीबाई आणि त्यांची मुलगी नेत्रा इथेच राहील्या. नेत्रा एव्हाना २० वर्षांची झाली होती. पार्वतीबाई थकलेल्या असल्याने विष्णूपंतांच्या घरी नेत्राच कामासाठी येऊ लागली.*

*नेत्रा.. दिसायला अत्यंत सुंदर होती. केवळ ती एक मोलकरीण होती आणि तिचे रहाणीमान, कपडे साध्यातले होते म्हणून, नाही तर उंची कपड्यांमध्ये ती एखादी परीच भासली असती. तिचा गौरवर्ण, निळसर डोळे आणि सोनेरी छटा असलेले लांबसडक केस पाहून कुणी म्हणायचे एखाद्या गोऱ्यानेच पार्वतीबाईंना फळवला असणार, नाहीतर एका सर्वसाधारण रुप असणाऱ्या पार्वतीबाईंना असे कन्या रत्न कुठून प्राप्त होणार? तसेही नेत्राचे वडील कोणं होते? कुठे होते? हे कुणालाच माहीत नव्हते.*

*नेत्राला आईशिवाय दुसरं कोणीच नव्हतं आणि त्यामुळेच तारुण्यात येताच तिचे पाय जमीनीवर टेकेनासे झाले.*

*नेत्रा खरं म्हणाल तर काळाच्या काही वर्ष आधीच जन्माला आली होती. तिचे वागणं त्या कालावधीला साजेसे नव्हतेच. कदाचित ती सध्याच्या कलयुगाच्या काळात चपखल वाटली असती. तारुण्यात हातात खुळखुळणारा पैसा, मदमस्त तारुण्य आणि बंधन कुणाचेच नाही असे असताना नेत्रासारखी भटकभवानी घसरली नसती तर नवलच.*

*ज्या काळात बायका पुरुषांसमोर मान वर करून बघत नसत, चेहऱ्यावरून पदर घेऊन फिरत असत त्या काळात नेत्रा अनेक तरूणांशी दिवसाढवळ्या नेत्रपल्लवी करत असे. अनेक तरुण केवळ तिच्या नजरेनेच घायाळ झाले होते.*

*नेत्राला आपले कौमार्य गमवायला फार वेळ लागला नाही आणि पहील्या पहील्यांदा एखादं-दुसऱ्यांदा घडलेला शरीरसंबंध नंतर मात्र वारंवार घडु लागला.*

*अश्यातच नेत्राची नजर विष्णूपंतांचे थोरले चिरंजीव त्रिंबकलालवर पडली. उंचापुरा, घाऱ्या डोळयांचा, विलायतेत शिक्षण झाल्याने बोलण्या-चालण्यात एक प्रकारचा आब असलेला, गंभीर-घोगऱ्या आवाजाचा आणि बक्कळ संपत्तीचा मालक असलेला त्रिंबकलाल नेत्राला मनापासून भावला.*

*अडचण फक्त एकच होती आणि ती म्हणजे त्रिंबकलाल विवाहीत होता.*

*परंतू काय अघटित घडले कुणास ठाऊक, पण त्रिंबकलालची नजर वाकडी पडु लागली. नकळत घडणारी नेत्राबरोबरची नजरानजर कालांतराने वारंवार घडु लागली आणि काही दिवसांतच त्या नजरांना एक अर्थ प्राप्त झाले. सर्वांदेखत बोलणे शक्य नसल्याने दोघंजण नजरेच्या भाषेत बोलू लागले.*

*उघड उघड दोघांच्या संबंधांना मान्यता मिळणे शक्यच नव्हते आणि म्हणूनच ते दोघंजण लपून-छपून भेटु लागले. बहुतांशवेळी रात्री-अपरात्रीच तर कधी कधी दिवसा-उजेडी परंतू दूर निर्जन स्थळी.*

*परंतू अश्या गोष्टी लपून थोड्या नं रहातात. ५०-१०० घरांची वस्ती असलेल्या त्या छोट्याश्या गावात बातम्या पसरायला वेळ लागला नाही आणि पहाता पहाता ही बातमी विष्णूपंतांच्या कानावर गेली.*

*विष्णूपंतांनी त्र्यंबकलालला बोलावून घेतले. लोकं म्हणतात, विष्णूपंत त्या वेळेस रागाने थरथरत होते. त्यांच्या चेहऱ्यावर पसरलेली तांबुस छटा त्यांच्या कानातल्या भिकबाळीच्या रंगाशी बरोबरी करण्याचा प्रयत्न करत होती. त्र्यंबकलाल पंतांच्या खोलीत गेले तेंव्हा घरातल्या बायका माजघरातून पड्द्या आड लपून बाहेरची चर्चा ऐकण्याचा प्रयत्न करत होत्या.*

*त्र्यंबकलालला पाहून पंतांच्या तळपायाची आग मस्तकात गेली. त्यांनी मागचा पुढचा विचार न करता सर्वप्रथम त्र्यंबकलालच्या श्रीमुखात भडकावून दिली. पंतांचा तो आवेश पाहून त्र्यंबकलाल सत्य नाकारु शकले नाहीत, परंतू स्वतःची बदनामी टाळण्याकरता त्यांनी सर्व दोष नेत्रावर ढकलला.*

*'नेत्रा काळी जादू करण्यात पटाईत आहे, तिने तसेच काहीसे अघोरी करून मला वश करून घेतले' असा धादांत आरोप त्याने केला.*

*शेवटी काहीही झाले तरी त्र्यंबक पंतांचा पोटचा पोरगा. पंतांनी त्याचे म्हणणे उचलून धरले.*

*नेत्रा काळी जादु करते ही बातमी वेगाने गावात पसरली.*

*ज्या तरुणांना नेत्राने शैय्यासोबत नाकारली होती त्यांनी संधीचा फायदा घेऊन नेत्राला अधिकच बदनाम करायला सुरुवात केली. नेत्रामुळे तरुण पिढी बिघडत चालली आहे, तिला गावाच्या हद्दीतून बाहेर काढावे अशी मागणी जोर धरु लागली आणि शेवटी प्रकरण पंचायतीपर्यंत पोहोचले.*

*गावाच्या मध्यावर असलेल्या पिंपळाच्या पाराभोवती पंचायत न्यायनिवाडा करायला बसली. सर्व पुरुषांमध्ये नेत्रा एकटी उभी होती सर्वांच्या वासनेने बुरसटलेल्या, बरबटलेल्या नजरांना नजर देत.*

*पंचायतीने नेत्राला दोषी ठरवले आणि तिला शिक्षा दिली 'अलवनी'ची.*

*पतीच्या निधनानंतर स्त्रियांचे केशमुंडन करून त्यांना कुरुप केले जात असे आणि त्यानंतर त्यांना लाल-रंगाच्या साडीत गुंडाळले जात असे. त्याकाळी अश्या विधवा स्त्रियांना 'अलवनी' म्हणत असतं. अश्या स्त्रियांना मरेपर्यंत त्याच वेशात विधवेचे आयुष्य घालवावे लागे.*

*नेत्रा विधवा नव्हती, तिचे कुणाशीही लग्न झाले नव्हते. परंतू जिच्या रुपाला भुलून तिने अनेक तरुणांना फितवले तेच रुप नष्ट करण्याचा विडा सर्वांनी उचलला.*

*सर्वांसमोर तिचे मुंडन करण्यात आले. असं म्हणतात त्यावेळी नेत्रा कमालीची शांत होती. ती ना ओरडली, ना रडली. परंतू ज्यांनी तिच्या नजरेत पाहीले त्यांच्या सर्वांगाचा थरकाप उडाला.*

*त्या घटनेनंतर नेत्रा स्वतःहूनच गावाबाहेर निघून गेली. गावाबाहेरच्या जंगलात एका झाडाखाली ती बसुन असायची. ती कधी कुणाशी बोलली नाही आणि कोणी तिच्याशी बोलायला गेले नाही. चार-पाच दिवसांनंतर गावातल्याच एका विहीरीत तिचा मृतदेह सापडला. नेत्राने विहीरीत उडी मारून आत्महत्या केली होती.*

*नेत्राच्या मृत्युची बातमी समजताच त्र्यंबकलालचा धीर सुटला. तो अचानक वेड्यासारखाच वागु लागला. त्याने स्वतःच्या चुकीची कबुली आणि नेत्रावर केलेल्या खोट्या आरोपांची माहीती पंतांना सांगितली. परंतू आता बोलून काय फायदा होता? वेळ केंव्हाच निघून गेली होती.*

*नेत्राच्या आईने नेत्राच्या देहाचा ताबा घेण्यास नकार दिला. आपल्या ह्या कुलक्षणी मुलीचे तिच्या मृत्युनंतरही तोंड बघायची त्यांची इच्छा नव्हती. शेवटी पंतांनी नेत्राच्या देहाला स्व-खर्चाने अंत्यसंस्कार करण्याची तयारी दर्शवली. तशी रीतसर परवानगी पंचायतीकडून घेऊन त्याची एक लेखी प्रत त्यांनी गावातील पोलीस पाटलाकडे सुपुर्त केली होती.*

*जुजबी वैद्यकीय तपासणी आणि नेत्राचा खून नसुन आत्महत्याच आहे ह्याची खात्री पटल्यावर पोलीस पाटलांकडून पंतांना नेत्राचा देह सुपुर्त केला जाणार होता. पंतांनी ब्राम्हणांना बोलवून दशक्रियाविधीची तयारी करून घेतली. दर्भाच्या जुड्या, हळद/कुंकु/गुलाल, सुगंधी उदबत्या, यज्ञासाठी लागणारे सामान हे सर्व तर होतेच, पण दोन दिवस मंत्र-पठण करवून पंतांनी तांदळाचे, काळे तिळ घातलेले पिंड सुध्दा करवून घेतले होते. पण आदल्या रात्रीच गुढरीत्या नेत्राचा देह पोलीस पंचायतीतून नाहीसा झाला. पोलीसांनी सर्वत्र शोध घेतला परंतू हाती काहीच लागले नाही.*

*त्या रात्रीनंतर अजून एक विचित्र गोष्ट घडली. त्र्यंबकलालने स्वतःला ह्या बंगल्याच्या तळघरातील एका खोलीत कोंडून घेतले. त्याने सर्वांशीच बोलणं तोडून टाकले. पहील्या-पहील्यांदा इतरांनी ह्या घटनेकडे दुर्लक्ष केले, परंतू दोन आठवडे उलटून गेले आणि त्र्यंबकलालच्या खोलीतून कुबट, कुजलेला वास यायला सुरुवात झाली तशी घरातल्या लोकांची चुळबुळ सुरु झाली.*

*घरातल्या लोकांना आधी वाटले की त्र्यंबकलालनेच स्वतःच्या जिवाचे काही बरे वाईट करून घेतले की काय? परंतू जेंव्हा लोकं दरवाजा तोडायला आली तेंव्हा आतून त्र्यंबकलालने ओरडून त्यांना तसं न करण्याबद्दल ऐकवले. तसेच दार उघडले गेले तर तो खरंच स्वतःचं काही करून घेईल अशी धमकी वजा सुचना सुध्दा त्याने केली. अनेकांनी त्याला समजावून सांगायचा प्रयत्न केला, पंतांनी आवाज चढवून पाहीले परंतू त्र्यंबकलालवर काडीचाही फरक पडला नाही.*

*त्र्यंबकलालसाठी खोलीच्या बाहेर ठेवलेले जेवणं, खाणं दिवसेंदिवस बाहेरच पडून राही. मधूनच कधी तरी दोन-चार दिवसांनी ताटातले अन्न संपलेले दिसे.*

*साधारण महीनाभरानंतर, एकदा तळघरातून कुणाचातरी घसटत घसटत चालण्या/फिरण्याचा आवाज ऐकू येऊ लागला. तळघरात कोणी मांजर बिंजर अडकली की काय म्हणून एक महीला तळघरात गेली आणि थोड्याच वेळात तीची एक जोरदार किंकाळी ऐकू आली.*

*घरातले सर्वजण धावत तळघरात पोहोचले. ती बाई अत्यंत भयभीत झाली होती. भितीने तिच्या सर्वांगाला काप सुटला होता, तिच्या तोंडातून बारीक बारीक फेस येत होता. भेदरलेल्या नजरेने ती समोर बघत होती.*

*अंधुकश्या प्रकाशात घरातल्या लोकांना एक आकृती बसलेली दिसली. जवळून पाहील्यावर सर्वांना धक्काच बसला. त्र्यंबकलाल खोलीच्या बाहेर येऊन बसला होता. त्याचा चेहरा पुर्णपणे बदलेला होता. चेहऱ्यावरचे तेज नाहीसे झाले होते. गालफडं खप्पड झाली होती, केस पांढरे फटक झाले होते, डोळे सुजून खोबणीतून बाहेर आल्यासारखे वाटत होते. हातापायाच्या काड्या झाल्या होत्या. त्याला धरूनही उभं रहावत नव्हते, जणू काही पायातला जोरच निघून गेला होता. तो हळु हळु खुरडत खुरडत कुठेतरी जाण्याचा प्रयत्न करत होता.*

*त्या स्त्रीची नजर मात्र त्र्यंबकलालवर नाही तर दूरवर अंधारात कुठेतरी दुसरीकडेच लागली होती. सर्वांनी तिला आणि त्र्यंबकलालला उचलून तळघराच्या बाहेर आणले.*

*बाहेर येताना ती स्त्री स्वतःशीच पुटपुटत होती.. 'अलवनी....'... अलवनी....*

*त्र्यंबकलाल अंथरूणाला खिळून होता. वैद्य झाले, आयुर्वेदीक औषधं झाली, मंत्र/तंत्र झाले पण त्याच्या प्रकृतीवर यत्कींचीतही फरक पडला नाही.*

*बऱ्याच वेळ तो झोपूनच असायचा आणि जेंव्हा जागा असायचा तेंव्हा तळघराच्या दाराकडे पहात रहायचा. काही आठवड्यांनंतर त्याचे तळघराकडे बघणे बंद झाले आणि मग तो भिंतीकडे, छताकडे तासंतास पहात रहायचा. त्याचे डोळे अज्जीबात हालायचेपण नाहीत.*

*हा प्रकार साधारणपणे एक महीनाभर चालला आणि त्यानंतर त्र्यंबकलालची ज्योत मालवली. शेवटच्या दिवसांत तो फक्त "नेत्रा.. मला माफ कर.. नेत्रा मला माफ करं.. असंच म्हणत बसायचा.*

*त्र्यंबकलाल गेला आणि घरातली शांतताच जणू भंग पावली. लोकांना चित्र-विचित्र भास होऊ लागले. कधी कुणाला रात्री घसटत चालण्याचा आवाज येई, तर कधी कुणाला तळघराच्या दाराशी नेत्रा दिसे. तसा नेत्राने कधी कुणाला त्रास दिला नाही, पण तिच्या नजरेला नजर देण्याची कुणाचीच हिंमत नव्हती. स्वयंपाकघरात जावं, दिवा लावावा आणि समोर कोपऱ्यात डोळ्यांतून निखारे घेऊन बसलेली नेत्रा दिसावी. कपाटाचं दार बंद करून शेजारी बघावं तर संतापलेली नेत्रा नजरेस पडे. पहिल्यांदा हा केवळ मनाचा खेळ असेल असं समजून दुर्लक्ष व्हायचे, परंतू जेंव्हा घरातले नोकरदार घरं सोडून जाऊ लागले, बायका स्वयंपाकघरात, माजघरात एकट्या दुकट्याने जायला घाबरु लागल्या तेंव्हा मात्र पंतांनी बंगला सोडून दिला आणि दुसऱ्या ठिकाणी आश्रय घेतला.*

*पंतांनंतर ह्या बंगल्यात कोणीच फिरकलं नाही. हळु हळु गावकऱ्यांनीसुध्दा त्यांचा जाण्या-येण्याचा रस्ता बदलला आणि तेंव्हापासून अनेक वर्ष हा बंगला असाच, एकाकी उभा आहे.......*

बोलून झाल्यावर रामुकाकांनी सर्वांकडे आळीपाळीने पाहीले. सर्वजण आपल्याच विचांरात गुंतले होते.

रामुकाकांनी शेजारचा पाण्याचा तांब्या उचलला आणि दोन-चार घोटं पाणी तहानलेल्या घश्यात ओतले.

“आता बोला, कुणाला काही प्रश्न, शंका?”, रामुकाकांनी थोड्यावेळानंतर विचारले.

“मला आहेत...”, आकाश म्हणाला.. “सर्वात प्रथम एक गोष्ट लक्षात आली नाही ती म्हणजे, फक्त आणि फक्त त्र्यंबकलालच्या चुकीच्या आरोपामुळे नेत्रा अडकत गेली. तेंव्हाच जर त्याने नेत्राची बाजु घेतली असती, तिला आधार दिला असता तर कदाचित पुढची वेळ आली नसती.

मग असं असताना नेत्राने तिच्या मृत्यु पश्चात त्र्यंबकलालचा सुड का नाही उगवला?”

“हो ना, आणि तिने घरातल्या कुणालाही कसं काहीच केलं नाही?”, जयंता आकाशच्या प्रश्नात आपला प्रश्न मिळवत म्हणाला.

“हम्म.. तो एक छोटासा, पण महत्वाचा भाग सांगायचा राहीला. विष्णूपंतांचा त्या गावात फार मोठा दरारा होता, सर्वांच्या मनात त्यांच्याबद्दल आदरयुक्त भिती होती. नेत्रा सुध्दा

त्याला अपवाद कसा असेल? पंतांनी तिचा सांभाळ केला होता, तिला ओसरी दिली होती हा एक प्रकारचा तिच्यावर केलेला उपकारच होता.

नेत्राच्या मृत्युनंतर जेंव्हा खुद्द तिच्या आईने नेत्राचा देह स्विकारण्यास, त्याला तिलांजली देण्यास नकार दिला तेंव्हा पंतांनी स्वतःहून ती जबाबदारी स्विकारली होती. नेत्राच्या आईची सर्व व्यवस्थाही त्यांनी चोख प्रकारे लाऊन दिली होती. कदाचित त्यामुळेच की काय.. नेत्राने पंतांच्या कुटुंबापैकी कुणाला हात लावला नाही.

त्र्यंबकलालचं म्हणाल, तर तो एक मोठा गुढ प्रश्न आहे. नेत्राच्या मृत्युनंतर तो खालच्या खोलीत काय करत होता हे कुणालाच ठाऊक नाही. त्र्यंबकलालला तळघरातून वरती आणल्यानंतर कोणी खाली गेलेच नव्हते त्यामुळे त्या खोलीत नक्की काय होते ह्याची कुणालाच कल्पना नाही. तेंव्हा सर्वात प्रथम आपण त्याचा शोध लावणं गरजेचं आहे, कदाचित त्यानंतरच ह्या प्रश्नाची उकल होऊ शकेल.

ह्या बंगल्याच्या बाजुला आलेल्या काही हौशी तरुणांनी त्याकाळी आपला जीव गमावल्याचेही लोकं बोलतात. पण काहींच्या मते त्यांच्यावर कोणा हिंस्त्र प्राण्याने हल्ला केला होता, तर काहींची मतं थोडी वेगळी आहेत.”

“बरं रामुकाका, पण आता ह्यातून बाहेर कसं पडायचं?”, शाल्मलीने विचारले.

“आपल्याला सर्वप्रथम नेत्रा किंवा वैज्ञानिक भाषेत बोलायचे झाले तर तिचा आत्मा अजूनही का भटकतो आहे ह्याचा छडा लावणं गरजेचं आहे. जर केवळं बदला, संताप म्हणून ती इथं येणाऱ्या प्रत्येकाचा जिव घेणार असेल तर… परीस्थिती थोडी कठीणच आहे…”, रामुकाका म्हणाले.

“पण म्हणजे नक्की काय करायचं?”, शाल्मलीने पुन्हा विचारले…

“… म्हणजे आपण तळघरात जायचं.. जेथे त्र्यंबकलाल इतके दिवस स्वतःला खोलीत बंद करून बसला होता, तो तेथे नक्की काय करत होता ह्याचा शोध घ्यायचा, आपण तेथे जायचे, जेथे सर्वप्रथम त्या कामवाल्या बाईला तळघरात नेत्रा दिसली होती… हो.. आपण तेथे जायचे……”, रामुकाका कापऱ्या आवाजात म्हणत होते………………..



बराच वेळ शांततेत गेला. सर्वजण सुन्न होऊन बसुन होते.

“रामुकाका, तुम्ही म्हणता आहात ते बरोबर आहे, रहस्याची थोडीफार उलगड तळघरात होइल हे बरोबरच आहे…”, आकाश म्हणाला..”आणि खाली जायला भिती वाटते अश्यातला ही भाग नाही, कारण जिवाला धोका हा संपुर्ण बंगल्यातच आहे.. पण तरीही खाली अजून काय असेल, काय पहायला मिळेल सांगता येत नाही. काही अनपेक्षीत घडलंच तर स्वतःचा जिव कसा वाचवायचा??”

“रामुकाका..”, जयंता म्हणाला..”त्या दिवशी.. म्हणजे तुम्ही बंगल्यातून निघून जायच्या आदल्या रात्री तुम्ही म्हणालात तुमच्या खोलीमध्ये कोणीतरी आलं होतं. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याने तुम्हाला काहीच केलं नाही. का? तुमच्याकडे काहीतरी असं होतं ज्याला बघून ’ते’ तुम्हाला काहीही नं करता निघून गेलं???”

“ते ’ते’ म्हणजे.. त्र्यंबकलाल होता तो..”, रामुकाका म्हणाले…”आपण हा जो इतिहास ऐकला, त्यावरून शेवटच्या काही दिवसांत त्र्यंबकलालच्या पायातला जिव निघून गेला होता, चालणं सोडाच, त्याला धड उभं ही रहाता येत नव्हत…”

“बरं, पण असं काय होतं तुमच्याकडे ज्याला बघून त्र्यंबकलाल तुम्हाला काहीही नं करता निघून गेला??”, आकाशने विचारले

आपल्या बंडीतून रुद्राक्षाची माळ बाहेर काढत रामुकाका म्हणाले.."कदाचित ह्याला..."

“म्हणजे रुद्राक्षाला 'ते' घाबरतात असं तुम्हाला म्हणायचं आहे का?”, आकाशने विचारले...

“कदाचित...”, असं म्हणून रामुकाकांनी मागील भिंतीकडे बोट दाखवलं...

सर्वांनी वळून रामुकाका जिकडे बोट दाखवत होते तिकडे पाहीलं. भिंतीवर एक पुरुष उंचीचे तैलचित्र लावलेले होते.

रामुकाका पुढे म्हणाले..."हे चित्र पाहीलंत? विष्णूपंतांच चित्र आहे ते.. निट बघा ते चित्र.."

सर्वजण निरखून ते चित्र बघु लागले..

“त्यांच्या गळयामध्ये बघा.. विष्णूपंतांच्या गळयामध्ये एक रुद्राक्षाची माळं आहे, आणि अगदी तश्शीच माळं माझ्या गळयामध्ये पण आहे.. त्र्यंबकलालला पहील्यापासून विष्णूपंतांबद्दल भितीयुक्त आदर होता.. कदाचित तो आजही कायम आहे. ह्या माळेने कदाचित त्यामुळेच मला वाचवलं असेल...”, रामुकाका बोलत होते.

“पण काका, आपण सरळ इथून निघून गेलो तर? इथे थांबायलाच नको ना! काय करायचं आहे आपल्याला त्या तळघरात काय आहे? काय करायचं आहे आपल्याला नेत्राचं काय झालं?, त्रिंबकलालने काय केले? सरळ बॅगा भरु आणि निघुयात इथून”, हायपर होत शाल्मली म्हणाली

“हे बघ बेटा, आपण इथं का आलो? हे आपल्याच नशीबी का आलं? कदाचित आपल्या हातून काही घडणं नियतीने लिहून ठेवले असेल. इतक्या वर्षात दुसरं कसं कोणी इथं नाही आलं? दुसऱ्या कुणाला हा अनुभव का नाही आला? आणि समजा, इथून आपण निघून गेलो तर ह्यापासून आपली कायमची सुटका होईलच कश्यावरून? परीस्थितीला पाठ दाखवून पळण्यापेक्षा परीस्थितीला आपण सामोरं जावं. अर्थात, मी सुध्दा परीस्थितीला घाबरून इथून पळालोच होतो, पण मी परत आलो. का? कदाचित माझ्या हातून काही चांगलं कार्य घडणार असावं नाही का???”, रामुकाका

सर्वांपेक्षा वयस्कर असूनही रामुकाकांनी दाखवलेल्या धैर्याचे सर्वांना कौतुक वाटलं.

“पण आमचं बाकीच्यांच काय काका? माळ फक्त तुमच्याकडेच आहे! आणि नेत्राचं काय? कश्यावरून ती सुध्दा ह्या माळेला घाबरेल?”, शाल्मलीने विचारले.

“हम्म.. ह्या प्रश्नाचं उत्तर मात्र माझ्याकडे नाही. पण बोट बुडत असेल आणि समोर दिसणारा किनारा दिसत असेल तर पाण्यात उडी मारण्याशिवाय पर्याय नाही. मग मध्येच बुडलो तर? शार्क माशाने खाल्लं तर ह्या गोष्टींचा विचार करत बसलो तर प्रयत्न न करताच मृत्यु अटळ…”, रामुकाका सर्वांकडे आळीपाळीने बघत म्हणाले.

हवेतील वाढलेल्या गारठ्याने अस्ताकडे जाणाऱ्या सुर्याची सर्वांना जाणीव झाली.

काय करायचं? कसं करायचं? ह्यावर सर्वांची, मतं, शंका ह्यावर चर्चा चालल्या होत्या. जयंता आणि आकाशने त्यांना इंटरनेटवर सापडलेल्या आपल्या मिठाच्या शोधाची कल्पना दिली होती आणि 'करून पहायला काय हरकत आहे?' म्हणून सर्वांनी ती कल्पना उचलून धरली होती. परंतू वातावरणात वाढत चाललेल्या अंधाराने सर्वजण सावध झाले.

"काका.. अंधार वाढत चालला आहे. रात्र वैऱ्याची असते काहीतरी पावलं उचलायलाच हवीत", जयंता म्हणाला.

"मला वाटतं तुम्ही सर्व इथेच थांबा, मी एकटा तळघरात जाऊन पाहून येतो, कदाचित काहीतरी मार्ग सापडेल..", रामुकाका म्हणाले.

"पण रामुकाका????....", सर्वजणं एकसुरात ओरडले..

"तुम्ही माझी काळजी करु नका. तो कर्ता करविता भगवंत माझ्या पाठीशी आहे, जर त्याने एकदा मला वाचवलं असेल, तर तो मला पुन्हा नक्की वाचवेल.." आपल्या मतावर ठाम रहात रामुकाका म्हणाले.

सकाळी येताना रामुकाकांनी आणलेलं मांजर एव्हाना चुळबुळ करु लागलं होतं. इतक्यावेळ मुक्तपणे हुंदडणारं ते मांजर रामुकाकांना बिलगून बसलं होतं.

"हे कुठून मिळालं तुम्हाला?", मांजराकडे बोटं दाखवत शाल्मलीने विचारले.

"गावातून आणलं ह्याला.. रस्त्यावर फिरत होतं..", मांजराच्या डोक्यावरून हात फिरवत रामुकाका म्हणाले.."हे आपलं दिशादर्शक यंत्र आहे..."

"दिशादर्शक यंत्र?? म्हणजे? कळालं नाही!",शाल्मलीने प्रश्नार्थक नजरेने विचारले.

“सांगतो. पाळीव प्राण्यांची इंद्रीय मानवापेक्षा कित्येक पटीने सक्षम असतात. ज्या गोष्टी आपल्याला जाणवत नाहीत त्या त्यांना जाणवतात.”,रामुकाका

“पण.. म्हणजे आपण ह्याचं करायचं काय?”, आकाशने विचारले.

“तुम्हाला तळघराचा दरवाजा माहीती आहे कुठून आहे?”, रामुकाकांनी विचारले.

सर्वांनी नकारार्थी माना हलवल्या.

“चला शोधु आपणं”, असं म्हणून रामुकाका उठले, त्यांनी मांजराला खांद्यावर घेतले आणि ते व्हरांड्यातून पुढे निघाले. त्यांच्यामागोमाग बाकीचे लोकं जाऊ लागले.

रामुकाका सर्वप्रथम वरच्या खोलीत गेले त्यानंतर ते खालच्या दिवाणखान्यात, मग त्या लसणांच्या माळा लावलेल्या खोलीत गेले. मांजर मात्र शांतपणे रामुकाकांच्या कुरवाळण्याचा आनंद घेत होते.

“एव्हाना तुम्ही ओळखलं असेलच ही खोली त्रिंबकलालची होती. जेंव्हा त्याला तळघरातून वर आणले आणि त्याची तब्येत, त्याचे विचित्र वागणं पाहून त्याला भूतबाधा तर झाली नसावी ह्या विचारांनी त्याच्या खोलीत ह्या लसणाच्या माळा बांधुन ठेवल्या होत्या. असं म्हणतात की काही आठवडे त्याची तब्येत सुधारली सुध्दा होती.”, रामुकाका म्हणाले.

सर्वांना डोळयासमोर त्या अंथरुणावर खिळलेला त्र्यंबकलाल दिसु लागला, तर जयंत आणि आकाशच्या मनात आदल्या रात्रीच्या त्या भयानक आठवणी जागा झाल्या.

रामुकाका मांजराला घेऊन बाहेर व्हरांड्यात आले आणि मग ते माजघरातून स्वयंपाकघराकडे जाऊ लागले तसं तसे ते मांजर अस्वस्थ होऊ लागले. रामुकाकांनी एकवार सर्वांकडे पाहीले.

शाल्मलीच्या अंगावर एक सरसरून काटा आला. तिची नजर भिंतींच्या कोपऱ्यात काही दिसते आहे का ह्याचा शोध घेत होती.

रामुकाकांच्या हातात मांजर बसणं अशक्य झालं तसं रामुकाकांनी मांजर खाली सोडून दिले. ते मांजर धावत धावत स्वयंपाकघराच्या कोपऱ्यात गेले आणि तेथे मोठमोठ्यांदा गुरगुरु लागले.

सर्वजणं धावतच त्या मांजराच्या मागे गेले आणि तेथे त्यांना एक भले मोठ्ठे दार दिसले. एका मोठ्ठ्या कुलुपाने आणि मोठ्ठ्या फळीने ते दार बंद केले होते.

रामुकाकांनी एकवार सर्वांकडे पाहीले आणि मग ते म्हणाले, “संपूर्ण बंगल्याला कोठेही इतके मोठ्ठे दार किंवा इतक मोठठं कुलुप लावलेलं नाही, मग इथंच का? असं काय मौल्यवान वस्तु त्या तळघरात असणार आहे की जी सुरक्षित रहावी म्हणून इतका बंदोबस्त केला गेला असावा?”

“काका, मला वाटतं मौल्यवान वस्तु तळघरात नाही तर तळघराच्या बाहेर होती.. ही माणसं, आणि त्यांचे जिव. तळघरातल्या कोणापासूनतरी जिव वाचावा म्हणून तळघर इतकी कडी-कुलुपं लावून बंद केलेली असावीत..”, जयंता म्हणाला.

“चला, उघडुयात हे दार....”, असं म्हणून रामुकाका दाराची फळी सरकवायला पुढे सरसावले.

पाठोपाठ जयंत आणि आकाशसुध्दा रामुकाकांच्या मदतीला धावले.

शाल्मली भिंतीला टेकून घाबरून उभी होती. शेजारीच मोहीतही आईचा हात धरून काय चालले आहे हे समजावून घेण्याचा प्रयत्न करत होता.

इतकी वर्ष झाली तरी दाराला लावलेली ती फळी फारच घट्ट बसली होती. ४५ मिनीटांच्या अथक प्रयत्नांनंतर कुठे ती फळी बाजुला सरकवण्यात त्यांना यश आले.

दमून घाम पुसत तिघंही जणं जमीनीवर बसले. त्या फळीने अक्षरशः सर्वांचा जिव काढला होता. थोड्यावेळाच्या विश्रांतीनंतर वेळ होती ती कुलुप तोडण्याची. तसा जयंता म्हणाला, “बाहेरच्या तुटलेल्या कुंपणाच्या लोखंडी सळया वापरून बघायचे का कुलुप उघडते का?”

इतरांनी त्याला संमती दर्शवली तसा तो धावत बाहेर गेला.

एव्हाना बाहेर जवळ जवळ काळोखच पसरला होता. जयंता काही क्षण दरवाज्यातच घुटमळला. त्या अंधारात जायला त्याचे मन धजवेना. शेवटी त्याने मनाचा हिय्या केला आणि तो ४-५ मोठ-मोठ्या ढांगा टाकत कुंपणापाशी पोहोचला. लोखंडी खांब अगदीच खिळखीळे झाले होते. थोड्याफार प्रयत्नातच ते जमीनीतून निघाले तसे जयंता एक मोठा लोखंडी खांब घेऊन परत तळघराच्या दरवाज्यापाशी पोहोचला.

तिघांनी मिळून तो खांब कुलुपाच्या गोलात अडकवला आणि नंतर त्याच्यावर प्रहार करून ओढुन कुलुप तोडण्याचे प्रयत्न चालू केले. जुन्या काळचे ते पौलादी कुलुप तुटता तुटेना. अखेर २५-३० मिनीटांच्या प्रयत्नांनंतर ठ्ण्ण.. आवाज करत ते कुलुप तुटून खाली पडले.

............. त्या दाराला लावलेली सर्व मानवनिर्मीत बंधन गळून पडली होती.....................................

तिघांनी जोर लावून तो दरवाज्या आतल्या बाजुला ढकलला. कर्र,,,,,,...... आवाज करत तो दरवाजा उघडला गेला. त्या आवाजाने कित्येक वर्षांच्या दबल्या गेलेल्या आठवणी जागा झाल्या. कित्येक गोष्टी गेली कित्येक वर्ष त्या बंद दरवाज्यामागे अडकून होती.. आज तो दरवाजा उघडल्याने त्या गोष्टी मुक्त झाल्या होत्या..

आतमध्ये जे काही होतं, ते सर्वार्थाने आता मोकळं होतं.

थंडगार हवेचा एक झोत बाहेरून सर्वांच्या अंगावर आला, जणु काही एखादा एअर कंडीशनरच लावला असावा.

“आकाश... आपण जाऊ यात का इथून? मला भिती वाटते आहे...”, शाल्मली म्हणाली.

पण आकाशचे तिच्याकडे लक्षच नव्हते. दरवाज्यापाशी उभे असलेले रामुकाका, आकाश आणि जयंत अंधारलेल्या तळघरात डोळे फाडून काही दिसते आहे का पहाण्याचा प्रयत्न करत होते, परंतू काळोख एवढा होता की दोन फुटांवर जरी कोणी उभं असलं तरी दिसण्याची शक्यता नव्हती.

रामुकाकांनी हातातली बॅटरी चालू केली आणि एकवार मागे वळून बघीतले.

“मला काही झालं तर हे दार पुन्हा पहील्यासारखं घट्ट लावून घ्या आणि इथून निघून जा, पुढे जे काही होईल ते देवाच्या हाती..”, असं म्हणून त्यांनी तळघरात पहीलं पाऊल टाकलं.

तळघराच्या पायऱ्या बर्फासारख्या थंड होत्या. रामुकाकांच्या अंगावरून एक शिरशीरी येऊन गेली. त्यांनी दोन क्षण वाट पाहीली पण काही झालं नाही. रामुकाकांनी दुसरा पाय टाकला आणि मग एक एक करत पायऱ्या उतरून खाली जाऊ लागले.

बॅटरीचा प्रकाश काही इंच पुढंपर्यंत जाऊन अंधारात लुप्त होत होता. रामुकाकांच्या दृष्टीने फक्त तेवढे काही इंचाचेच जग होते, बाकी सगळा अंधार. त्या अंधारात कोण होते, काय होते, काय करत होते ह्याची यत्कींचीतही कल्पना कोणाला नव्हती.

नारायण धारप ह्यांनी त्यांच्या एका कथेत ह्या परीस्थितीचे फार छान वर्णन केले आहे. ते म्हणतात, "*शेवाळ्याने भरलेल्या पाण्यात जेंव्हा तुम्ही उतरून पुढे पुढे जाऊ लागता तेंव्हा काय होते? पाय टाकला की शेवाळे तात्पुर्ते बाजुला होते आणि पाणी दिसु लागते, परंतू जसजसे तुम्ही पुढे जाऊ लागता, तसं तसे ते बाजुला झालेले शेवाळे पुन्हा एकत्र होते, पाण्याला आच्छादुन टाकते.... तुमच्या मागे तुमचा मार्ग बंद झालेला असतो........................*"

रामुकाकांचे तसेच झाले होते, दिव्याचा प्रकाश पुढे गेल्यावर, क्षणभरापुर्वी दिव्याच्या प्रकाशाने उजळलेल्या त्या पायऱ्या पुन्हा अंधारात बुडून जात होत्या.

साधारणपणे २५-३० पायऱ्या उतरल्यावर सपाट जमीन लागली. आतमध्ये भयानक हाडं गोठवणारी थंडी होती. रामुकाकांनी नकळत एका हाताने गळ्यातली रुद्राक्षाची माळ घट्ट पकडली.

तोंडाने सतत देवाचे नामःस्मरण चालू होते -

*ॐ गोविंदाय नमः॥। ॐ विष्णवे नमः॥। ॐ मधुसूदनाय नमः॥। ॐ त्रिविक्रमाय नमः॥। ॐ वामनाय नमः॥। ॐ श्रीधराय नमः॥। ॐ उपेंद्राय नमः॥। ॐ हरये नमः॥। श्री कृष्णाय नमः॥*

तळघरात विचित्र शांतता होती, जणु काही सारा आसमंत 'आता काय होणार?' ह्याची वाट पहात चिडीचूप बसुन होता. रामुकाकांना त्यांच्या छातीचे ठोके स्पष्ट ऐकू येत होते.

थोडे अंतर आत गेल्यावर रामुकाकांना डाव्या हाताला ती छोटी खोली दिसली जेथे काही दिवस त्र्यंबकलालने स्वतःला बंद करून घेतले होते. रामुकाका सावकाश चालत त्या खोलीपाशी गेले आणि बंद खोलीचे दार सावकाश आत ढकलेले. दार उघडेच होते.. पुन्हा एकदा तो विकृत किर्र... आवाज करत दार उघडले गेले. त्या विस्तीर्ण तळघरात दरवाज्याचा उघडण्याचा तो आवाज घुमून राहीला.

रामुकाकांनी खोलीच्या अंतःर्भागात बॅटरीचा प्रकाश टाकला. खोली मोकळीच होती. एकदा खात्री झाल्यावर रामुकाकांनी बॅटरीचा प्रकाश भिंतींवर आणि खोलीच्या छताकडे टाकला, परंतू सुदैवाने तेथे कोणीच नव्हते.

रामुकाका खोलीत शिरले आणि अत्यंत घाणेरड्या वासाचा भपकारा त्यांच्या नाकात शिरला. रामुकाकांच्या एका हातात बॅटरी होती आणि दुसऱ्या हाताने रुद्राक्षाची माळ घट्ट पकडली होती त्यामुळे त्यांना नाक झाकणे शक्यच नव्हते. रामुकाका त्या वासाची पर्वा न करता दोन पावलं टाकून अजून आतमध्ये आले.

अवकाशाच्या पोकळीत, जेथे हवा नाही, पाणी नाही, गुरुत्वाकर्षण नाही.. आणि सगळयात मुख्य जेथे जीवन नाही तेथे कसे वातावरण असेल? तसेच वातावरण खोलीच्या आतमध्ये होते, रामुकाकांची कसोटी लागत होती, त्यांच्या छातीवर प्रचंड दडपण आले होते, त्यांना श्वास घ्यायला स्वच्छ हवा मिळत नव्हती. परंतू रामुकाकांचा निर्धार पक्का होता. रामुकाकांनी बॅटरीचा प्रकाश सावकाश खोलीतून फिरवायला सुरुवात केली. जमीनीवर एका ठिकाणी त्यांना नखांचे अनेक ओरखडे दिसले. कोणीतरी असहाय्य पणे, उद्वीगतेने आपला संताप, आपली बेचैनी त्या जमीनीवर उतरवली होती. रामुकाकांचा शोध सुरु होता आणि त्यांना खोलीच्या दुसऱ्या कोपऱ्यात जे अपेक्षित होतं ते दिसले. रामुकाकांच्या चेहऱ्यावर एक विजयी हास्य पसरले.

रामुकाका 'त्या' दिशेने जाऊ लागले आणि खोलीतला गारवा अचानकपणे वाढला तसा रामुकाका सावधं झाले. त्यांच्या अंतःर्मनाने त्यांना धोक्याची सुचना द्यायला सुरुवात केली. खोलीत नक्कीच कोणीतरी आले होते. रामुकाकांनी माघारी वळवून पाहीले, पण बॅटरीच्या प्रकाश झोतात त्यांना कोणीच दिसले नाही. रामुकाकांनी पुन्हा एकदा बॅटरीचा प्रकाश भिंतीवरून छताकडे न्हेला आणि त्यांना 'ती' नजरेस पडली.

छताला हाताचे तळवे आणि गुडघे टेकवून उलटी होऊन नेत्रा रामुकाकांकडे तुच्छतेने बघत होती. तिच्या डोळयांतून संताप, तिरस्कार आग ओकत होता.

“काय रे म्हाताऱ्या, मला शोधतो काय?”, दात विचकत नेत्रा म्हणाली

रामुकाका काहीच बोलले नाहीत. खरं तर त्यांची भितीनी वाचाच बंद झाली होती. हातापायातली शक्ती गेली होती. परंतू रामुकाका तरीही धीर एकटवून तिच्याकडे बघत उभे होते.

“अरं जगायचंस नव्ह का थोड्यावेळ, काय घाई एवढी मरायची?”, छद्‌म्मीपणे हसत नेत्रा म्हणाली.

“रांडीचे, तुला काय वाटलं, चार-दोन फालतू जादुचे प्रयोग तू करून दाखवलेस म्हणजे आम्ही तुला घाबरु होय? तुला यमसदनी पाठीवल्याशिवाय हा म्हातारा मरणार नाय...”, उसन्या अवसानाने रामुकाका म्हणाले.

“अस्सं! तू मारनार व्हयं मला???”, असं म्हणून नेत्रा सात मजली हसली. तिच हासणं सर्व तळघरात दुमदुमले. नेत्रा भिंतीवरून हळु हळु सरकत खाली येऊ लागली. रामुकाकांचे हात-पाय गोठले होते, परंतू सर्व शक्ती एकटवून त्यांनी आपल्या खिश्यातून एक तांबडे पुस्तक बाहेर काढले आणि ते नेत्राच्या समोर धरले.

ते पुस्तक पहाताच नेत्रा क्षणभर जागच्या जागी थांबली आणि मग भराभर दोन-चार पावलं मागे सरकली.

“का गं भडवे, घाबरलीस नव्हं? बापाला घाबरलीस का नाय? अं? कळलं न हे काय आहे? गरुड-पुराण..! ऐकले असशीलच तू नाही का?????”, रामुकाका म्हणाले.

हातात धरलेल्या त्या पुस्तकाने त्यांच्या अंगात चांगलाच जोश संचारला होता.

नेत्रा जळफळत, डोळे विस्फारून तिथे उभी होती.

“एक पाऊल पुढे येशील तर तुझी राख होईल इथंच..”, रामुकाका ते पुस्तक पुढं धरत म्हणाले… “आन तू रे त्र्यंबकलाल, तिथं दबा धरून काय करशील.. तुला कळत नाय, माझ्या हातात काय आहे ते?? चलं ये इथं समोर माझ्या…”

रामुकाका खोलीच्या दुसऱ्या कोपऱ्यात बघून बोलत होते.

त्याचबरोबर भिंतीचा तो काळा, अंधारलेला कोपरा सजीव झाला आणि तो अंधार हळु हळु पुढे सरकत नेत्राच्या खाली जाऊन उभा राहीला.

“मादरचोद!”, रामुकाका ओरडले..”स्वतःच्या बायका पोरांना सोडून ह्या रांडेच्या मागे लागला तू.. अन ती मेल्यावरपण तिला जिता ठेवलास.? हे हे.. पिंड.. इथं लपवून ठेवलं होतंस व्हय??”, खोलीच्या त्या कोपऱ्यात त्या गोलाकार, जळमट लागलेल्या भाताच्या गोळयांकडे बोटं दाखवत रामुकाका म्हणाले.

तो अंधार रागाने थरथरत होता, संतापाच्या ज्वाळा त्यातून बाहेर पडून रामुकाकांना गिळंकृत करु पहात होत्या.

रामुकाकांना कल्पना होती ते फार काळ ह्या दोघांना थोपवून ठेवु शकणार नाहीत. दोघांपैकी कोणीही बेफाम होऊन पुढे सरसावले असते तरी परीस्थिती हाताबाहेर जाऊ शकली असती.

रामुकाका सावकाश मागे न वळता मागे सरकु लागले.

नेत्रा आणि त्र्यंबकलालच्या नजरा रामुकाकांकडे लागल्या होत्या.

रामुकाका मागे मागे सरकत दारापाशी आले आणि अचानक त्यांचा पाय एका लाकडी पाटात अडकला. अडखळून ते खाली कोसळले. त्यांच्या हातातले ते पुस्तक दूर फेकले गेले. केवळ तो एक क्षण आणि त्याचवेळी त्या अंधाराने रामुकाकांकडे झेप घेतली.

आपला मृत्यु अटळ आहे हे समजून रामुकाकांनी डोळे घट्ट मिटून घेतले आणि त्याचवेळी त्यांच्या कानावर त्र्यंबकलालची वेदनेने भरलेली किंकाळी ऐकू आली. रामुकाकांनी डोळे उघडून बघीतले. भिंतीच्या कोपऱ्यात त्र्यंबकलाला थरथरत उभा होता, रामुकाकांनी मागे वळून दाराकडे पाहीले. दारात जयंता मिठाचा पुडा घेऊन उभा होता...

“रामुकाका, चला, उठा लवकर...”, असं म्हणून त्याने रामुकाकांना हात धरून उठवले आणि त्यांना धरून जणु ओढत ओढतच तो तळघरातून बाहेर पडण्याच्या जिन्याकडे धावला............................



.... “रामुकाका चला लवकर बाहेर..”, रामुकाकांना ओढत ओढतच जयंता पायऱ्यांवरून तळघराच्या बाहेर यायला निघाला.

दोघांनीही मागे काय होते आहे, मागून कुणी येते आहे का? हे पहाण्यासाठी एक क्षणही नाही दवडला. पण त्यांना माहीत होते मागून कोणीतरी लडखडत, तडफडत, लंगडत त्यांच्या मागे मागे येत होते.

दोघेही तळघराच्या बाहेर आले. दाराबाहेर शाल्मली आणि आकाश वाट पहात उभेच होते. जयंता आणि रामुकाका बाहेर आल्यावर चौघांनीही मिळून ते तळघराचे दार जोरात ढकलले आणि बाहेरून त्याला ती भलीमोठ्ठी कडी घालून टाकली.

त्यांच्यामागावर जे कोणी येत होते ते एव्हाना दरवाज्यापाशी येऊन थडकले होते.

जयंताने क्षणाचाही विलंब न करता त्या पुड्यातून एक मुठभर मिठ घेतले आणि दरवाज्याबाहेर त्याची एक रेघ ओढली.

“किती काळ? किती दिवस? का किती तास? हे मिठ त्यांना रोखु शकेल ते माहीत नाही, पण निदान सध्यातरी आपण काही वेळापुरते सुरक्षित आहोत.”, जयंता म्हणाला.

रामुकाका आणि जयंताच्या कपाळावर घर्मबिंदु जमा झाले होते.

शाल्मलीने स्वयंपाकघरातून पाण्याने भरलेला लोटा रामुकाकांच्या हातात दिला आणि म्हणाली, “तुम्हाला जाऊन बराच वेळ झाला, तुम्हाला आम्ही खुप हाका पण मारल्या, पण काहीच उत्तर आले नाही म्हणून जयंता....”

रामुकाकांनी घटाघटा पित पाण्याचे घोट घश्याखाली उतरवले आणि मग ते म्हणाले, “चला तिकडच्या खोलीत चला, आपल्याला आता घाई करायला हवी” असं म्हणत भराभर चालत रामुकाका खोलीकडे निघाले आणि त्यांच्या पाठोपाठ जयंता, आकाश आणि शाल्मली सुध्दा.

“रामुकाका खाली, तळघरात काय झालं सांगा ना!”, नंतर जेंव्हा सर्वजण खोलीत बसले होते तेंव्हा शाल्मलीने विचारले. जयंता त्यावेळी खोलीच्या बाहेर तशीच एक मिठाची रेघ ओढण्यात मग्न होता.

तो काम संपवून आतमध्ये आला तेंव्हा रामुकाकांनी खाली, तळघरात घडलेला वृत्तांत सांगायला सुरुवात केली.

“रामुकाका, तुम्ही उगाचच जिवावर बेतणारा धोका पत्करलात..”, रामुकाकंचे बोलणं झाल्यावर शाल्मली म्हणाली

“हम्म.. पण निदान आपल्याला काही उत्तरं तरी मिळाली. त्र्यंबकलालनेच नेत्राला जिवंत ठेवले, तिच्या आत्म्याला मुक्ती मिळु दिली नाही. कदाचित हेच ते कारण असावं ज्यामुळे नेत्राने त्रिंबकलालला मारले नसावे. त्यानंतरच्या ह्या इतक्या काळात नेत्रा आता अधिक शक्तीमान झाली आहे, तिच्यावर झालेल्या अत्याचारांचा प्रत्येकावर बदला घेत सुटली आहे.”

रामुकाका पुढे काही बोलणार तोच दुरून जोर जोरात 'खड्ड..खड्ड' असा आवाज ऐकू आला. दारावर कोणीतरी जोरजोरात धडका मारतं होतं, जणू काही पिंजऱ्यात अडकलेले एखादं हिंस्त्र श्वापद...

“बरं आता काय करायचं? आपल्याला जे पहायचं होतं ते पाहीलं, आपण त्यांच्या विरोधात लढू शकत नाही हे ही अलिखीतपणे जाणलं. मग इथं थांबायचं कश्याला? चला इथून निघून जाऊ यात, ते बाहेर यायच्या आत...”, आकाश म्हणाला.

“नाही, तसं केलं तर शाल्मलीच्या जिवाला धोका आहे..”, रामुकाका म्हणाले...

“शाल्मलीच्या?? पण का?”, जयंता आणि आकाश दोघंही एकदमचं म्हणाले.

रामुकाकांनी खोलीच्या कोपऱ्यात अंग चोरून बसलेल्या आपल्या मांजराला जवळ बोलावले. मांजराला मांडीवर घेऊन कुरुवाळले, त्याच्या पाठीवर थोपटले आणि मग ते मांजर त्यांनी जयंताकडे दिले.

जयंताने प्रश्नार्थक नजरेने रामुकाकांकडे बघीतले. रामुकाकांनी नजरेनेच त्याला आपण जसे केले होते तसे करायला सांगितले.

जयंताने रामुकाकांसारखेच त्या मांजराला गोंजारले आणि ते मांजर आकाशकडे दिले. आकाशने सुध्दा तसेच केले आणि मांजर शाल्मलीच्या समोर धरले. शाल्मली त्या मांजराला घेणार तोच त्या मांजराने आपले दात बाहेर काढले आणि “म्याऊ...” असा कर्णकर्कश्श आवाज काढला आणि फिस्सकारत तेथून निघून गेली.

सर्वांनी पुन्हा एकदा प्रश्नार्थक नजरेने रामुकाकांकडे पाहीले

“नेत्राचा काही अंश अजूनही शाल्मलीच्या शरीरात आहे.. जर आपण तिला इथून न्हेण्याचा प्रयत्न केला तर…”, रामुकाका अचानक बोलायचे थांबले

“तर काय रामुकाका?”, आकाशने विचारले

परंतू रामुकाका शाल्मलीकडे निरखून पहात होते.

शाल्मली एव्हाना स्वतःशीच गालातल्या गालात हसत होती. तिच्या नजरेत झालेला बदल रामुकाकांनी अचुक हेरला होता.

“साल्या.. म्हाताऱ्या.. लै चालू आहे हा तु…”, शाल्मली म्हणाली.

जयंता आणि आकाश चमकून शाल्मलीकडे बघु लागले.

शाल्मली उठून उभी राहीली, मग तिने दोन्ही हात बाजुला करून स्वतःभोवतीच एक आनंदाने गिरकी मारली आणि मग समोरच्या बेडवर जाऊन बसली.

बराच वेळ शाल्मली स्वतःची नखं निरखून बघण्यात मग्न होती. मग सावकाशपणे तिच्या चेहऱ्यावरचे हास्य मावळले आणि त्या जागी एक छद्मी, क्रुर हास्य उमटले.

तिने मान मागे वळवून कोपऱ्यात बसलेल्या मांजराकडे पाहीले. शाल्मलीच्या नजरेला एक विलक्षण धार आली होती. मांजराची अस्वस्थपणे चुळबुळ सुरु झाली. ते कोपऱ्यातून दुसरीकडे जाण्याचा प्रयत्न करु लागले. परंतू जणु काही त्याच्या जाण्यावर कोणीतरी मर्यादा घातल्या होत्या. ते मांजर कोपऱ्यातच जागच्या जागी फेऱ्या मारु लागले.

क्षणाक्षणाला त्याच्या चालण्याच्या कक्षा लहान होत गेल्या, ते मांजर भिंतीच्या एका कोपऱ्यात दबले गेले आणि मग सुरु झाली एक असहाय्य तडफड. चारही पाय झाडत ते मांजर सुटकेचा प्रयत्न करु लागले. ते ओरडण्याचा प्रयत्न करत होते, पण घश्यातून आवाजच फुटत नव्हता,

जणु काही त्याचा घसा कुणीतरी दाबून धरला होता. मग हळु हळु त्या मांजराची तडफड बंद झाली आणि ते कोपऱ्यात हातपाय ताठ करून मलुल होऊन पडले.

ते मांजर मृत्यु पावले आहे हे कोणी वेगळ सांगायची गरज नव्हती.

शाल्मलीने मान वाकडी करून पुन्हा एकदा सर्वांकडे पाहीले आणि ती स्वतःशीच खदाखदा हसु लागली.

शाल्मली स्वतःशीच हसण्यात मग्न होती तेंव्हा जयंताने हळुच तो मिठाचा पुडा स्वतःकडे सरकवला आणि त्यातले मुठभर मिठ घेऊन शाल्मलिच्या अंगावर भिरकावले.

अंगावर गरम तप्त पाणी पडावं तसं शाल्मलीने क्षणभर अंग झटकले, तिचा क्रुर चेहरा अधीकच क्रुर झाला.

“अबे..साले.. ते मिठ बिठ मला नको घाबरवुस.. ते त्या लंगड्या त्र्यिंबकलालसाठी ठिक आहे..” असं म्हणून शाल्मली जागेवरून उठली, जयंताच्या जवळ आली आणि तिने खाड्कन जयंत्याच्या मुस्काटात लावून दिली.

शाल्मली नाजुक असली तरीही त्या कानफाटात विलक्षण जोर होता. जयंताच्या हातातला मिठाचा पुडा दूर भिरकावला गेला आणि जयंता जागच्या जागी मागे पडला.

शाल्मलीच्या हातावर, तोंडावर त्या मिठाने भाजल्यासारखे काळे डाग पडले होते, केस विजेचा धक्का बसावा तसे कडक होऊन विखुरले गेले होते आणि तिची ती भेसूर नजर तिचा चेहरा अजूनच विद्रूप बनवत होती.

शाल्मली पुन्हा बेड वर जाऊन बसली तिने पाय गुडघ्यात वाकवून पोटाशी ओढून घेतले आणि त्यावर दोन्ही हातांची घडी घालून ती सर्वांकडे बघत होती. रामुकाका, जयंता, आकाश ह्यांना काय करावे तेच सुचत नव्हते.

शाल्मलीने एक हात आपल्या केसांतून फिरवला आणि म्हणाली, “कित्ती छान वाटते आहे, बर्याच दिवसांनी असे केस, नाहीतर इतके दिवस तेच ते आपल टक्कल.....” मग अचानक बोलता बोलता थांबली आणि तिने रागाने सर्वांकडे पहिले व पुढे म्हणाली..”तुम्ही सगळे मरणार.... कुत्र्याच्या मौतीने मरणार.”

शाल्मली पुन्हा बेडवरून खाली उतरली आणि त्या मेलेल्या मांजराजवळ गेली. खाली वाकून तिने ते मांजर एका हातांनी उचलले आणि सावकाश त्याला आपल्या गालावरून, कपाळावरून, डोक्यावरून घासत फिरवले जणू ते एखादे सौफ्ट-टोय होते. मग तिने ते मांजर तळहातावर ठेवले आणि अचानक त्याच्या पोटाचा एक दाताने लचका तोडला. रक्ताची एक चीळकांडी तिच्या चेहऱ्यावर उडाली. पण शाल्मालीला त्याची परवा नव्हती. तिने तो तुकडा चावून चावून खाल्ला, मग अजून एक, आणि मग अजून एक तुकडा.

आकाशने मोहितचे डोळे झाकून त्याला जवळ घेतले.

अचानक शाल्मालीचे खाणे बंद झाले आणि ती तोंड वाकडे करून क्षणभर थांबली आणि मग तिला उलटी झाली.

“साल्या.. कधी कोंबडी, बकरा खायला घातला नाही कारे हिला? सगळे ओकून काढले बाहेर??”, अंगावर सांडलेली ओकारी हाताने झटकत शाल्मली आकाशला म्हणाली..

“नेत्रा, पण आम्ही काय पाप केले आहे? तुझ्यावर झालेल्या अन्यायाची शिक्षा आम्हाला का? शाल्मलीने तूझ काय बिघडवले होते? तिला हा त्रास का?”

रामुकाकानी पहिल्यांदाच शाल्मालीचा उल्लेख नेत्रा असा केला.

“तुमी सगळी मानव जात नाय का? कुणाला पण सोडणार नाय, मला फकस्त इथून बाहेर पडायचे होते, अडकून पडले होते इथ. तुमी आलात आणि मला बाहेर जायचा मार्ग मिळाला..”, नेत्रा म्हणाली

“पण मग शाल्मलीच का? आमच्यापैकी कोणी का नाही?”, आकाशने विचारले

“तिच्या आत्म्याने मला तिच्या शरीरात प्रवेश करू दिला, तुमच्या नाही…”, नेत्रा म्हणाली

“पण का?”, आकाश

“कदाचित.. तिला मी अश्या गोष्टीचे आमिष दाखवले जे तिच्याकडे नवते. माझ्या प्रलोभनाला ती फसली..”, नेत्रा हसत म्हणाली..

“कसले आमिष?”, आकाश

“त्या दिशी नी का आपण मज्जा मारली बेड मध्ये.. तिला जमत नसेल तस.. म्या म्हणल मी तुला तो आनंद मिळवून द्येईन मग घुसले तिच्या शरीरात…”, नेत्रा सांगत होती.. “मला एक माध्यम हवे होते इथून बाहेर पडायला, ते मिळाले, आता एकेकाला संपवणार, जो भेटेल त्याला मारणार, सोडणार नाय कुणाला..” अस म्हणून तिने एक विजयी चित्कार केला.

तिच्या त्या आवाजाने रामुकाका, जयंता आणि आकाशाच्या अंगाचा थरकाप उडाला.

“मग वाट कसली बघते आहेस.. आम्ही तुझ्या समोरच आहोत.. ये मार आम्हाला आणि मोकळे कर एकदाचे..”, रामुकाका म्हणाले.

“थोड दिस थांब रे म्हातारड्या..पूर्णिमा तर येउन्द्ये कि…त्या रात्री आपल्याला लई शक्ती असते माहीती आहे नवं?.. चंद्रमा झाकोळला नी जात ना ह्या अलवनी मुळे.. चारच दिस.. आन मग ती रात्र येणार…” असं म्हणून पुन्हा एकदा नेत्रा भेसूर खदा खदा हसली..

शाल्मलीच्या चेहऱ्यावर लागलेले रक्त आता वाळून त्याचे पोपडे बनले होते आणि ते गालाला चिकटून बसले होते. तिने केलेल्या उलटीचा घाणेरडा वास खोलीत भरून राहिला होता.

“इथून हिला घेऊन जायचा प्रयत्न करू नका, तिच्या शरीराचा आणि आत्म्याचा ताबा हाय माझ्याकडे…” असा दात विचकत नेत्रा म्हणाली आणि मग खोलीच्या कोपऱ्यात गुडघे पोटाशी घेऊन बसून राहिली.

रात्रभर शाल्मली जागी होती आणि त्या तिघांकडे नजर ठेऊन होती. सकाळी कधी तरी ती जमिनीवर आडवी झाली. बहुदा नेत्रा तिच्या शरीरातून बाहेर पडली आणि शाल्मली झोपेच्या आहारी गेली.

“बाबा.. आईला काय झालं?”, आकाशला हलवतं मोहीत विचारत होता.

आकाशने डोळे उघडून बघीतले. शाल्मली गुडघ्यात डोकं खुपसुन हमसुन हमसुन रडत होती.

आकाश तिच्या शेजारी जावून बसला.

आकाशला पाहून शाल्मलीला अजून भरून आलं.

“आकाश!.. हे .. हे काय झालं आहे सगळं?? हे रक्त कसलं लागलं आहे माझ्या अंगाला..?? आणि ही उलटी कधी केली मी??? मला काहीच का आठवत नाहीये??”, शाल्मलीने विचारले

“शमु.. डोन्ट वरी काही नाही झालंय.. जा तू फ्रेश होऊन ये, बरं वाटेल”, शाल्मलीच्या डोक्यावरून हात फिरवत आकाश म्हणाला.

एव्हाना रामुकाका आणि जयंता सुध्दा उठले होते आणि ते शाल्मलीच्या शेजारी उभे होते.

“हे बघ बेटा..”, रामुकाका म्हणाले, “काही गोष्टी अश्या असतात ज्या माहीत नसलेल्याच बऱ्या असतात. अज्ञानात सुख असते म्हणतात ना!, तसंच काहीसं.. तुला काहीही होणार नाही, आम्ही आहोत ना इथं…”

“पण रामुकाका….”

“काही गोष्टी घडतात आपल्याला जा आपल्याला क्लेश देऊन जातात, संकटात टाकतात, पण तेंव्हाच तर आपली कसोटी पणाला लागते ना! तेंव्हाच आपण मनापासून त्या परमेश्वराची आराधना करतो. आणि जेंव्हा आपण त्या संकटातून बाहेर पडतो तेंव्हाच तर आपला देव ह्या संज्ञेवर विश्वास बसतो हो कि नाही?”, रामुकाका म्हणाले.

शाल्मलीने होकारार्थी मान हलवली.

“ह्या जगात चांगलं आहे तर वाईट असणारच, रात्र आहे तर दिवस असणारच, तसेच जर दानव आहे, जर त्याचा आपल्याशी सामना झालेला आहे तर मग देव सुध्दा आहे ह्यावर विश्वास ठेवायला काय हरकत आहे?”, रामुकाका

रामुकाकांच्या बोलण्याने सर्वांना पुन्हा एकदा हुरुप आला. शाल्मली उठून बाथरुममध्ये फ्रेश व्हायला गेली.

“रामुकाका, बोलण्यापुरते ठिक आहे, पण आता काय करायचं? प्रश्न दिवसेंदिवस बिकटच होत चालला आहे”, आकाश म्हणाला

रामुकाका हनुवटीवरून हात फिरवत विचार करण्यात मग्न होते.

“मला वाटते आपण ह्या बंगल्यात काही शोध-शोध केली तर?”, बराच वेळ विचार केल्यावर रामुकाका म्हणाले.. “”म्हणजे मला तशी खात्री नाही, परंतू एखादा सुगावा, कसल्याही प्रकारची माहिती आपल्या उपयोगी पडेल. नेत्राचे दर्शन होणारे काही आपण पहिले नक्कीच नसणार. त्या काळी जी लोक इथं रहात होती त्यांनाही काही प्रसंगातून जावेल लागले असणारच. मग त्या वेळी, त्यांनी काय केले होते? अशी कुठली गोष्ट आहे, किंवा असे काय आहे कि ज्यामुळे नेत्रा अजूनही ह्या बंगल्यातच अडकून पडली आहे, असे काय आहे कि ज्यामुळे तिला इथून बाहेर पडता आलेले नाही?”

“हम्म विचार करण्यासारखी गोष्ट आहे खरी”, जयंता म्हणाला.

“चला तर मग शुभस्य शीघ्रम,,”, रामुकाका उठून उभे रहात म्हणाले.

शाल्मली त्याचवेळी बाथरूम मधून फ्रेश होऊन बाहेर येत होती. आकाशाने प्रश्नार्थक नजरेने रामुकाकांकडे बघितले.

रामुकाका म्हणाले, “तिला आराम करू देत, फार गरज आहे तिला त्याची. आज रात्री पुन्हा काय होईल आपल्याला माहित नाही..” असं म्हणून रामुकाका खोलीच्या बाहेर पडले. पाठोपाठ आकाशही बाहेर गेला

शाल्मली पहिल्यापेक्षा जरा बरी दिसत होती. आकाशाने तिला जवळ घेतले आणि तिच्या कपाळावर एक चुंबन दिले व म्हणाला, “शमू, तू काळजी करू नकोस, जोवर मी आहे तोवर तुला काही होणार नाही. तू आराम कर, आम्ही आहोतच बाहेर. काही लागले तर हाक मार.” असं म्हणून आकाश सुध्दा खोलीच्या बाहेर पडला.

बाहेरच्या व्हारांड्यामध्ये रामुकाका, जयंता आणि आकाश खोल्यांचे वाटप करून घेत होते.

“जयंता, तू वरची खोली बघ, मी दिवाणखाना बघतो आणि आकाश तू ही बेडरुमच शोध. जेणेकरून आपलं काम पण चालू राहील आणि तू शाल्मलीच्या जवळही रहाशील.”, रामुकाकांनी आपला प्लॅन सांगितला ज्याला सगळ्यांनी अर्थातच संमती दर्शवली.

“प्रत्येक कपाट, खण, कोपरा काही म्हणजे काही सोडु नका. एखादी बारीकशी गोष्ट सुध्दा आपल्याला ह्यातून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवेल…”

आपआपल्या मार्गाने जाताना जो तो एकमेकांना हेच सांगत होता.

अर्थात तळघर ह्या शोधमोहीमेतून वगळण्यात आले होते हे वेगळे सांगायची गरज नाही.

आकाश पुन्हा आपल्या खोलीत परतला. शाल्मलीचा नुकताच डोळा लागला होता, तर मोहीत 'मिकी माऊसचे' जिग्सॉ-पझल जोडण्यात मग्न होता.

आकाशने खोलीत एकवार सर्वत्र नजर टाकली. आदल्या रात्री घडलेला प्रसंग त्याच्या डोळ्यासमोर तरळत होता. शाल्मलीचा तो भेसुर चेहेरा आठवून आकाशच्या अंगावर एक सरसरून काटा आला. आकाशने घट्ट डोळे मिटून घेतले आणि आपल्या कुलदैवतेचा फोटो डोळ्यासमोर आणला, मनोभावे हात जोडले आणि काही क्षण तो शांत चित्ताने तेथेच उभा राहीला.

सर्व वाईट विचार, वाईट आठवणी, भिती एक एक करत कमी होत गेले. आकाशला प्रसन्न वाटु लागले तसे त्याने डोळे उघडले, एक दीर्घ श्वास घेतला आणि तो आपल्या शोधकार्याला लागला.

जयंता वरच्या बेडरुममध्ये गेला. खोलीच्या खिडक्या बंद होत्या आणि पडदे लावून घेतल्याने खोलीत अंधार पसरला होता. जयंताने सावधानतेने खोलीत प्रवेश केला. त्याची नजर खोलीच्या अंतरंगात लागलेली होती. चाचपडत त्याने बटनांच्या दिशेने हात न्हेला आणि अचानक त्याला असे जाणवले कि त्याचा हात कोणीतरी घट्ट पकडला आहे. जयंताने झटका देऊन हात काढून घेतला.

तो भास होता का खरंच कोणी त्याचा हात धरला होता ह्यावर त्याचे एकमत होईना. जयंता थोड्यावेळ तेथेच अंदाज घेत उभा राहिला. परंतू खोलीतून कसल्याही प्रकारचा आवाज

ऐकू येत नव्हता. धडधडत्या अंतकरणाने जयंता खोलीच्या आत गेला आणि त्याने दिव्याचे बटन दाबले. क्षणार्धात खोलीचे अंतरंग दिव्याच्या प्रकाशाने उजळून निघाले.

जयंताने खोलीतून सर्वत्र नजर फिरवली. त्याच्या नजरेस दिसेल असे तरी कोणीही त्या खोलीत नव्हते. जयंताने भिंतींच्या टोकाला असलेल्या कोपऱ्याकडे बघितले. भिंतीच्या कोपऱ्यात मोडी लिपीमध्ये लिहीलेली ती अक्षरं खोलीत येणाऱ्याचे लक्ष वेधुन घेत होती. जयंताने त्याकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला आणि फारसा वेळ न दवडता तो सुध्दा आपल्या शोधकामात बुडून गेला.

खोलीचे कोनाडे, कपाट, बेडखाली, पडद्यांच्या मागे, टेबलाचे खण, जयंताने सर्व काही पालथे घातले परंतू महत्वाचे असे काही हाती लागले नाही.

निराश होऊन जयंता मागे वळला आणि त्याच्या छातीत एकदम धस्स झाले, केवळ काही फुटांवर नेत्रा उभी होती. तिची जळजळीत, क्रोधीत नजर जयंताच्या नजरेचा वेध घेत होती.

जयंताला दरदरून घाम फुटला. नेत्रा त्याच्या आणि दरवाजाच्या मध्ये उभी असल्याने बाहेर पडायला कुठूनच मार्ग नव्हता.

नेत्राचे ओठ एकाबाजूने वर सरकले आणि एक कुचकट हास्य तिच्या चेहऱ्यावर पसरले. मग सावकाश पावला टाकत ती जयंताच्या दिशेने येऊ लागली. ओरडण्यासाठी जयंताने तोंड उघडले, परंतू त्याच्या तोंडातून शब्दच बाहेर पडेनात. त्याची भीतीनी वाचा बसली होती.

प्रतिक्षिप्त क्रियेप्रमाणे जयंता जस-जशी नेत्रा जवळ येऊ लागली तस-तसा मागे सरकू लागला.

शेवटी मागे सरकत सरकत तो भिंतीला येऊन टेकला. नेत्रा त्याच्या अगदी जवळ आली होती. तिने आपला उजवा हात पुढे केला आणि एखाद्या मरतुकड्या पक्ष्याची पकडावी तशी

त्याची गळा-मान हातात धरली. तिच्या हाताच्या त्या थंडगार, निर्जीव स्पर्शाने जयंतच्या अंगावर एक काटा येऊन गेला. नेत्राने आपल्या हाताची पकड हळू हळू वाढवत न्हेली. जयंताला गळा आवळला जात असल्याची जाणीव होत होती, पण तो काहीच करू शकत नव्हता. हळू हळू त्याला श्वास घेणे अवघड होऊ लागले.

"पुनिंदा असा खोडसाळ पणा करू नगस..", अत्यंत हळू परंतू तितकाच भेदक असा नेत्राचा आवाज जयंतच्या कानावर पडला..."नै तर तुम्हास्नी मराया मी पुर्निमेची पन वाट पहाणार नै.. जा सांग तुझ्या त्या म्हाताऱ्याला.." असा म्हणून तिने आपला हाताची पकड ढिल्ली केली.

बोलताना नेत्राच्या ओठांमधून सापासारखी एक काळी जीभ आतबाहेर करत होती, जणू सैतानाचे दुसरे रूपच ...

नेत्राने हात काढून घेताच जयंता खाली कोसळला तेंव्हा त्याला जाणीव झाली कि तो जमिनीपासून काही फूट वर उचलला गेला होता.

खाली पडल्यावर तो डोळे घट्ट बंद करून काही वेळ बसून राहिला. जेंव्हा त्याने डोळे उघडले तेंव्हा नेत्रा तेथून निघून गेली होती.

जयंता सावकाश उठला आणि खोलीतला दिवा मालवून खाली, व्हरांड्यात येऊन बसला. थोड्या वेळानंतर रामुकाका आणि आकाश पण तेथे येऊन बसले...

"जयंता.. अरे गळयाला काय झाल तुझ्या?", जयंताच्या गळयाकडे बोट दाखवत आकाश म्हणाला, तसे रामुकाका सुध्दा आश्चर्याने काय झाल ते पाहू लागले.

जयंताने वर, खोलीत घडलेली घटना त्याना ऐकवली.

“पण, काही सापडले का तुला तिथे?”, आकाशाने विचारले..

जयंताने काही न बोलता नकारार्थी मान हलवली.

“.. आणि रामुकाका तुम्हाला?”, आकाशाने रामुकाकाना विचारले.

रामुकाकानी सुध्दा काही न बोलता नकारार्थी मान हलवली.

“मलाही काहीच नाही सापडले…” असे म्हणून आकाश व्हरांड्यातच फतकल मारून खाली बसला.

सर्व जण सुन्न होऊन बसून राहिले होते. तीन दिवसांमधला एक दिवस त्यांचा वाया गेला होता. कुणाच्याही हाती काही लागले नव्हतेच, उलट नेत्राने दिलेल्या धमकीमुळे त्यांच्या जीवाला असलेला धोका कित्त्येक पटीने वाढला होता.

बराच वेळ शांततेत गेला. सर्वांची तंद्री भंगली ते खोलीच्या दाराच्या आवाजाने.

सगळयांनी वळून दाराकाडे पाहिले. दारात शाल्मली उभी होती. आकाश काही बोलण्यासाठी उठणार तेवढ्यात रामुकाकानी त्याला हाताला धरून खाली बसवले.

आकाशाने प्रश्नार्थक नजरेने रामुकाकांकडे पाहिले. रामुकाकानी बोट तोंडावर ठेवून शांत रहायची खूण केली.

शाल्मली सावकाश चालत व्हरांडा ओलांडून बाहेर गेली, तिच्या लेखी जणू काही तिथे कोणी नव्हतेच. तिने एकवार वळूनही ह्या तिघांकडे पाहिले नाही.

शाल्मली चालत चालत बंगल्याच्या गेटपाशी गेली, तिने गेट उघडले आणि ती बाहेर पडली. ती थोडी पुढे गेल्यावर रामुकाकानी जयंता आणि आकाशाला हातानेच 'चला' अशी खूण केली, तसे ते तिघेही उठून शाल्मालीच्या मागे मागे जाऊ लागले.

शाल्मली तंद्रीत असल्यासारखी चालत होती. तिला वेळेचे, काळाचे कश्याचेही भान नव्हते. पाला-पाचोळा, काटे-कुटे सर्वकाही तुडवत ती चालत होती. रामुकाका, आकाश आणि जयंताला तिच्या वेगात चालणे अवघड होत होते, परंतू शक्य तितक्या तिच्या मागे रहाण्याचा ते प्रयत्न करत होते.

बरेच अंतर गेल्यावर अचानक शाल्मली दृष्टीआड झाली. बराचवेळ शोधुनही सापडेना. आकाशला शाल्मलीची काळजी वाटु लागली होती, परंतू थोड्याच वेळात बाजुच्याच झाडीतून त्यांना हलकीशी हालचाल जाणवली.

तिघेही जण दबकत त्या झाडीपाशी पोहोचले आणि डोकावून आत पाहु लागले. शाल्मली त्यांना पाठमोरी बसुन काहीतरी करत होती.

आकाश हळु हळु पुढे जाऊ लागला. रामुकाकांनी त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला, परंतू त्यांचा हात बाजुला ढकलून आकाश शाल्मलीच्या अगदी जवळ जावून पोहोचला. शाल्मलीला त्याची मागे असण्याची यत्किंचीतही कल्पना नव्हती. निदान ती जे काही करत होती त्यात कणभरही फरक पडला नव्हता.

आकाश शाल्मलीच्या समोर जावून उभा राहीला तसे शाल्मलीने मान वर उचलून त्याच्याकडे पाहीले.

शाल्मलीच्या समोर केळीच्या पानावर पसरलेला, गुलाल, हळद-कुंकु वाहीलेला, लिंबाची फोडी ठेवलेला नैवेद्याचा भात ठेवला होता आणि शाल्मली तो भात अधाश्यासारखा खात होती. तिचा हात, तोंड सगळं भाताच्या शिताने भरलेले होते. गावातीलच कोणीतरी करणी, भुतबाधा उतरवण्यासाठी केलेल्या पुजेतील नैवेद्याचा तो भात गावाबाहेर आणून टाकलेला होता.

आकाशला बघताच शाल्मली उठून उभी राहीली. तिच्या तोंडातून एखाद्या हिंस्त्र श्वापदासारखा गुरगुरण्याचा आवाज येत होता.

आकाशने दोन क्षण तिच्याकडे रोखून पाहीले आणि सर्व शक्ती एकवटून साट्कन तिच्या मुस्काटात लावून दिली. तो प्रहार इतका जबरदस्त आणि अनपेक्षीत होता की शाल्मली दोन पावलं मागे हेलपांडली आणि मागच्या झाडावर आपटून खाली कोसळली.

आकाश, रामुकाका आणि जयंता काही वेळ तेथेच पुढील हालचालीची वाट पहात तेथे थांबले, परंतू शाल्मली निपचीत पडली होती. मग तिघांनी मिळून तिला उचलले आणि पुन्हा घरी घेऊन आले.

मावळतीला जाणाऱ्या सुर्याने त्यांच्या हातातून निसटून गेलेल्या एका दिवसाची जाणीव करून दिली.

दुसऱ्या दिवशी पुन्हा एकदा सगळे व्हरांड्यात जमा झाले.

“रामुकाका, आज काय करायचे? काल तर काहीच आपल्या हाती लागलं नाही.”, आकाश म्हणाला

“काका, आपण आज खोल्या बदलून घ्यायच्या का? पुन्हा एकदा खोल्या त्याच, पण लोकं वेगळी असे शोधुयात का? कदाचित आपल्याला सापडले नाही ते दुसऱ्याला सापडेल?”, जयंताने विचारले.

“नाही...”, थोडा विचार केल्यावर रामुकाका म्हणाले..”आधी आपण सर्व खोल्या तपासून पुर्ण करु, नाहीच काही सापडले तर मग हा पर्याय आहेच. अजून माजघर, स्वयंपाकघर आणि ’ति’ खोली ज्यात मी पहील्या दिवशी राहीलो होतो....”

जयंता आणि आकाशने रामुकाकांच्या म्हणण्याला संमती दर्शवली.

“ठिक तर मग, मी त्या खोलीत जातो, आकाश तू माजघरात जा, आणि जयंता तू स्वयंपाकघरात...” असं म्हणून रामुकाका त्या खोलीच्या दिशेने निघाले. पाठोपाठ आकाश आणि जयंता त्यांच्या तपास-खोलीच्या दिशेने निघून गेले.

रामुकाका पुन्हा एकवार त्या खोलीत आले. खोलीतच्या प्रमुख भिंतीवर लावलेले त्या करारी पुरुषाचे तैलचित्र तेजाने झळकत, इतके वर्ष तग धरून उभे होते.

रामुकाका त्या तैलचित्रासमोर जाऊन उभे राहीले. काही क्षण ते त्या चित्राकडे लक्ष विचलीत न होता पहात राहीले, मग त्यांनी सावकाश डोळे बंद केले, दोन्ही तळहात जोडले आणि ते म्हणाले.. “विष्णूपंत, आज ह्या बंगल्यात आम्ही महासंकटात सापडलो आहोत. त्या काळी जे घडले त्याच्याशी आमच्यापैकी कोणाचाही तिळमात्र संबंध नाही. कोण पापी?, कोण दोषी?, कोण चांगला?, कोण वाईट?, ह्याची आम्हाला काडीचीही कल्पना नाही.

त्याकाळी त्या घटनाक्रमात जे गुंतले होते ते केंव्हाच आपले भोग भोगायला निघून गेले, त्यांचे कालावसान होऊनही अनेक तपं ओलांडली. मग आमच्यासारख्या पापभीरु लोकांनाच हा त्रास का?

पंत, तुमच्या कुटुंब कबील्याचे तुम्ही कर्ते पुरुष, आज आम्ही तुमच्याच बंगल्यात आहोत आणि आम्ही तुम्हाला शरण आलो आहोत. तुम्ही तुमच्या कुटुंबाचे जसे संरक्षण केलेते तसेच रक्षण आमचे सुध्दा कराल अशी आशा आम्ही बाळगतो. आज तुम्ही हयात असतात, तर ही वेळ आलीच नसती, परंतू तुम्ही शरीराने इथे नसलात तरी तुमचा अंश, तुमचा आत्मा इथे येणाऱ्या निरपराध लोकांचे संरक्षण करण्यास नक्कीच सक्षम आहे.

पंत, आमचे रक्षण करा, आम्हाला ह्यातून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवा पंत……"

रामुकाका बऱ्याच वेळ डोळे मिटून स्तब्ध उभे होते. बराच काळानंतर त्यांनी डोळे उघडून समोर पाहीले.

सर्व खोली कसल्याश्या धुराने भरून गेली होती. रामुकाकांनी डोळे चोळून चोळून पहाण्याचा प्रयत्न केला, परंतू तो त्यांचा भास नसुन खरोखरच खोलीत सुवासीत धुर पसरला होता. त्या धुसर प्रकाशात रामुकाका आजुबाजुला पहाण्याचा प्रयत्न करु लागले.

दिवाणखान्याच्या दुसऱ्या कोपऱ्यातून पेटी आणि सतार वादनाचा मंद आवाज येत होता.

रामुकाका आवाजाच्या दिशेने जाऊ लागले. खोलीच्या दुसऱ्या भिंतीपाशी रामुकाकांना एक दार नजरेस पडले.

"खरं तर इतक्या दिवसांत हे दार कुणालाच कसे दिसले नसावे", असा विचार रामुकाकांच्या मनात झळकून गेला.

रामुकाकांनी हाताने ते दार हलकेच लोटले तसा आतून येणारा तो आवाज अधीकच स्पष्ट झाला. त्या आवाजाला अजून एका घनगंभीर, पुरुषी आवाजाची जोड होती...

'ॐ नमस्ते गणपतये।

त्वमेव प्रत्यक्षं तत्वमसि

त्वमेव केवलं कर्ताऽ सि

त्वमेव केवलं धर्ताऽसि

त्वमेव केवलं हर्ताऽसि '.....

कोणीतरी गणपती अथर्वशीर्ष म्हणत होते. रामुकाकांचे नकळत हात जोडले गेले. त्या धुसर प्रकाशात त्या छोट्याश्या खोलीच्या कोपऱ्यात एक व्यक्ति पाठमोरी बसलेली रामुकाकांना दिसुन आली.

पाठीचा कणा ताठ होता, अंगाला पांढरेशुभ्र वस्त्र गुंडाळलेले होते. दोन्ही हात जोडलेले दिसत होते.

रामुकाका काहीही न बोलता त्या व्यक्तीच्या मागे जाऊन बसले.

किती वेळ गेला असेल कुणास ठाऊक, रामुकाका अध्यात्मीक ध्यानात मग्न होऊन गेले होते.

समोरची आरती संपली तसे रामुकाका भानावर आले. त्यांनी कपाळाला हात जोडून नमस्कार केला आणि ते उठून उभे राहीले.

समोरच्या त्या व्यक्तीने शेजारच्या परडीतील फुल समोरच्या देव्हाऱ्यात वाहीली, उदबत्ती, निरांजनाने एकवार देवाला ओवाळले आणि मग कुंकुवाचा करंडा घेऊन ते उभे राहीले आणि माघारी वळले….

“पंत…..”, रामुकाकांच्या तोंडून अस्पष्ट शब्द बाहेर पडले.

पंत रामुकाकांच्या जवळ आले आणि त्यांनी कुंकुवाचे एक बोट रामुकाकांच्या कपाळाला लावले.

पंतांचे डोळे तेजाने चमकत होते, त्यांच्या चेहऱ्यावर आत्मीक समाधान, शांती ओसंडून वहात होती.

रामुकाकांनी खाली वाकून पंतांना नमस्कार केला आणि हात जोडून ते पुन्हा उभे राहीले.

पंतांनी त्यांच्या बंडीच्या खिश्यातून मळकट-चॉकलेटी रंगाची गुंडाळी केलेली काही पत्रकं रामुकाकांच्या हातात ठेवली. रामुकाकांना त्यावरून काहीही अर्थबोध होत नव्हता. ते प्रश्नार्थक नजरेने पंतांकडे बघत होते.

पंतांच्या चेहऱ्यावर क्षणभर एक मंद हास्य येऊन गेले. त्यांनी आपले डोळे बंद केले आणि आपला उजवा हात रामुकाकांच्या डोक्यावर ठेवला.

रामुकाका त्या तेजाच्या स्पर्शाने मोहरून गेले होते. डोळे बंद करून पंतांच्या हातातून येणारा तेजाचा तो झरा आपल्या ज्ञानकोशात भरून घेण्यात ते मग्न होऊन गेले होते. पंतांनी हात काढुन घेतला तसे रामुकाकांनी डोळे उघडले.

“यशस्वी भव!”, एवढे दोनच शब्द बोलून पंत माघारी वळले आणि धुराच्या त्या वलयात निघून गेले. त्यांची पाठमोरी आकृती अंधुक अंधुक होत त्या प्रकाशात विलीन झाली.

रामुकाका भारावलेल्या नजरेने त्या दिशेकडे पहात राहीले.

रामुकाका पुन्हा व्हरांड्यात आले तेंव्हा आकाश आणि जयंता अजूनही त्यांच्या खोल्या धुंडाळण्यात व्यस्त होते. रामुकाकांनी दोघांनाही हाक मारून बाहेर बोलावून घेतले.

“काय झालं रामुकाका?”, जयंताने विचारले.

“आपल्याला जे हवं होतं ते आपल्याला सापडले आहे, आता अजून शोध पुरे”, रामुकाका म्हणाले.

रामुकाकांच्या चेहऱ्यावर असामान्य तेज पसरले होते, त्यांच्या कपाळाला लागलेले कुंकुवाचे ते दोन थेंब तेजाने तळपत होते. जयंता आणि आकाश आश्चर्याने रामुकाकांमध्ये झालेला हा बदल पहात होते.

“काय आहे हे? आणि हे सापडले कुठे?”, आकाशने विचारले.

“ही भोजपत्र आहेत…”, रामुकाका म्हणाले

“भोजपत्र?? म्हणजे??”, आकाश आणि जयंताने एकदमच विचारले.

“पुर्वीच्या काळी झाडाच्या खोडांच्या साली काढुन त्याचा वापर लिहीण्यासाठी केला जायचा त्याला भोजपत्र म्हणतात…”, रामुकाका म्हणाले.

“पण ही तुम्हाला मिळाली कुठे? आणि आहे काय त्यामध्ये लिहीलेले….??”, आकाशने विचारले

“सांगतो..”, असं म्हणून रामुकाकांनी त्या खोलीत घडलेला सर्व वृत्तांत दोघांना ऐकवला.

दोघंही जण स्तंभीत होऊन रामुकाकांचे बोलणे ऐकत होते.

“पण ही भोजपत्र आहेत कसली? आपल्याला त्याचा फायदा काय? पंतांनी काही सांगितले का तुम्हाला?”, आकाशने विचारले

“नाही.. तसं म्हणलं तर पंत काहीच बोलले नाहीत, परंतू तरीही काय करायचे आहे? कसं करायचं आहे? केंव्हा करायचं आहे हे मला पुर्ण समजलं आहे.. असत्यावर सत्याचा, दुर्गुणांवर सज्जनांचा नेहमीच विजय होत आलेला आहे, कदाचित तो मार्ग खडतर असेल, कदाचित तिथे पोहोचायला आपल्याला थोडा वेळ लागेल, पण सत्याची कास धरल्यावर, चांगुलपणा अंगीकारल्यावर यशश्री आपलीच आहे….” रामुकाका बोलत होते…..

रामुकाका दोघांना घेऊन खोलीत गेले. शाल्मली आणि मोहीत गप्पा मारत बसले होते. त्या तिघांना आत येताना पहाताच दोघंही उठून उभे राहीले.

रामुकाका खोलीच्या मध्यभागी उभे राहीले आणि बाकीच्या लोकांनी त्यांच्या भोवती कोंडाळे केले. रामुकाकांनी आपल्या कपाळाचा गंध शाल्मली सोडून आकाश, मोहीत आणि जयंताला लावला आणि म्हणाले.. “उद्या आंघोळीला सुट्टी द्या, आपण इथून जाईपर्यंत हा गंधच आपले रक्षण करणार आहे, तो पुसुन देऊ नका..”

तिघांनीही गुणी बाळासारख्या माना डोलावल्या.

“रामुकाका मी राहीले…”, शाल्मली निरागसपणे म्हणाली.

“तुला पण लावणार, पण आत्ता नाही, वेळ आली की नक्की लावीन..” असं म्हणून रामुकाका आकाशकडे वळले आणि म्हणाले, “आकाश, तू इथे शाल्मली आणि मोहीतपाशीच थांब. मला आणि जयंताला बाहेर थोडं काम आहे, ते उरकून येतो”

“काय, कसलं कामं?” हे विचारण्याच्या भानगडीत आकाश पडला नाही, योग्य वेळ येताच ते एक तर कळेलच किंवा रामुकाका स्वतःहून सांगतील ह्याची त्याला खात्री होती.

रामुकाका खोलीच्या बाहेर पडले आणि कसलेही प्रश्न न विचारता जयंताही त्यांच्या मागोमाग बाहेर पडला.

रामुकाका बंगल्याचे कुंपण ओलांडून झपझप चालत बाहेर पडले. वाटेत कुणीच कुणाशी बोलले नाही.

काही मिनीटं चालल्यावर रामुकाका एका पडक्या, जुनाट कौलारु झोपडीवजा घरापाशी येऊन थांबले, क्षणभर इकडे तिकडे बघून मग त्यांनी डोळे मिटले आणि

*'ॐ श्री विष्णवे नमः ।'*

*'ॐ श्री विष्णवे नमः ।'*

*'ॐ श्री विष्णवे नमः ॥'*

असा ३ वेळा जप केला व मग जयंताला म्हणाले, “जयंता, दाराचे हे कुलुप तोड..”

जयंताने कुलुप निरखून बघीतले. कुलुप जरी मजबुत असले तरीही बरेच जुने असल्याने दरवाज्याची कडी खिळखीळी झाली होती. जयंताने अंगणातून एक मोठ्ठा दगड आणला आणि दोन-तीन घावातच त्याने कडी तोडून काढली.

करकर आवाज करत दरवाजा आतल्या बाजुने उघडला गेला.

रामुकाका आणि जयंता आतमध्ये आले. जयंताने लगेच घराच्या खिडक्या उघडल्या त्यामुळे अंधारात बुडालेले ते घर स्वच्छ सुर्यप्रकाशाने उजळून निघाले.

“रामुकाका... कुणाचे घर आहे हे?”, अत्यंत हळु आवाजात जयंताने विचारले.. “नेत्रा!!”, रामुकाका म्हणाले... तसे जयंता दोन पावलं मागे सरकला.

रामुकाकांची वेधक नजर त्या खोलीत कश्याचा तरी शोध घेत होती. बराच वेळ शोधल्यावर ते एका कॉटपाशी येऊन थांबले आणि त्यांनी जयंताला खुण केली.

“जयंता, ती खालची पेटी ओढ बरं जरा बाहेर...”, रामुकाका एका लाकडी ट्रंककडे बोट दाखवत म्हणाले.

जयंता खाली वाकला आणि त्याने ती जड पेटी बाहेर ओढली. पेटी नुसती कडी घालून बंद केली होती, त्याला कुलुप वगैरे काही लावलेले नव्हते ह्यावरून त्या पेटीत काही मौल्यवान असेल असे वाटत नव्हते.

रामुकाकांनी वरवरची धुळ हाताने झटकली आणि कडी काढून ती पेटी उघडली.

वरतीच एका निरागस १२ एक वर्षाच्या मुलीचा आणि साधारण एका पस्तीशीतल्या स्त्रीचा फोटो होता. रामुकाकांनी तो फोटो निरखून पाहीला आणि कडेला ठेवून दिला.

त्या फोटोच्या खाली लहान मुलीचे फ्रॉक्स, गळ्यातले, कानातले साधे दागीने, बिट्ट्याच्या बिया, मोडलेल्या ४-५ बाहुल्या असेच काही बाही सामान होते.

“हे..... हे सर्व नेत्राचे आहे का?”, जयंताने विचारले.
“हो.. नेत्राचेच आहे हे.. चल आपल्याला ही ट्रंक घेऊन बंगल्यावर जायचे आहे..”, असं म्हणून रामुकाकांनी ती पेटी बंद करून टाकली.

जयंताने ती पेटी उचलून खांद्यावर घेतली आणि दोघंजण पुन्हा बंगल्याच्या दिशेने चालू लागले.

दोघंजणं बंगल्यात परत आले तेंव्हा दुपारची जेवणाची वेळ टळून गेली होती. शाल्मलीने सर्वांसाठी जमेल तेवढा, जमेल तसा थोडाफार स्वयंपाक बनवून ठेवला होता. रामुकाका आणि जयंता येताच सर्वांनी प्रथम जेवून घेतले.

जेवण झाल्यावर रामुकाका ती पेटी घेऊन दिवाणखान्यात आले जेथे सर्वजण त्यांची वाट बघत बसले होते. रामुकाकांनी ती पेटी सर्वांच्या मधोमध झाकण उघडून ठेवली. सर्वजण आतील वस्तु निरखून बघत होते.

“आजची रात्र.. आपल्या सर्वांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे. आजवर जे वार आपल्यावर झाले ते आज आपण पलटवून लावणार आहोत.”, रामुकाका निर्धाराने म्हणाले.. “शमु बेटा, ह्या लढ्यात सर्वात जास्त सहभाग तुझाच असणार आहे. त्या अघोरी शक्तीने तुझ्या शरीराची निवड केली होती, तेंव्हा त्या लढ्यात आपण तुझाच वापर त्या शक्ती विरुध्द लढण्यासाठी करणार आहोत”, शाल्मलीकडे बघत रामुकाका म्हणाले.

शाल्मलीची अस्वस्थता तिच्या हालचालीतून दिसुन येत होती.

“घाबरु नकोस बेटा, आम्ही सर्व तुझ्या सोबत आहोत… तुला काही होऊ देणार नाही..”, शाल्मलीच्या डोक्यावर हात ठेवत रामुकाका म्हणाले.. “फक्त एक लक्षात ठेव तू मनाने खंबीर रहा, कुणालाही स्वतःवर आधीक्य गाजवु देवु नकोस, स्वतःचे अस्तित्व जागृत ठेव, आमच्या बोलण्याकडे लक्ष ठेव. अशी वेळ येईल जेंव्हा तुला तुझ्याशीच लढुन आम्ही सांगितलेल्या काही गोष्टी कराव्या लागतील…” रामुकाका शाल्मलीला सुचना देत होते आणि शाल्मली प्रत्येक गोष्ट लक्ष देऊन ऐकत होती.

“रामुकाका, नेत्राचा शेवट झाला म्हणजे आपण सुटलो असे समजायचे का?”, आकाशने विचारले.

“नाही…”, थोड्यावेळ विचार करून रामुकाका म्हणाले..”नेत्रा खरं तर ह्या खेळातील एक प्यादं आहे, आपल्याला नेत्रापेक्षा जास्त शक्तीमान, जास्त भयानक विकृतीविरुध्द लढा द्यायचा आहे.. आज रात्री आपण ज्या गोष्टी करणार आहोत त्या आपल्याला आपल्याच शास्त्राने,

आपल्याच संस्काराने शिकवलेल्या आहेत. पिढ्या-दर-पिढ्या आपण त्यावर डोळे झाकून विश्वास ठेवला त्या गोष्टी आज आपल्याला आचरणात आणायच्या आहेत. तेंव्हा अशी आशा करुयात कि आपल्या धर्माने जे आपल्याला, आपल्या पुर्वजांना शिकवलं, ते सर्व सत्य आहे..”

“पण रामुकाका, जर ते बोगस ठरलं तर? आपण सामान्य माणसं आहोत, कोणी ज्ञानी, तपस्वी, साधु नाही की ह्या अनिष्ठ प्रवृत्तीविरुध्द यशस्वी होऊ”, जयंता म्हणाला.

“बरोबर आहे जयंता, अगदी बरोबर आहे. आपण सामान्य माणसंच आहोत. परंतू आपल्या सामान्यत्वाला सत्यतेची धार आहे. जशी आगीची एक छोटीशी ठिणगी दारुगोळ्याने भरलेल्या कारखान्याला सुध्दा उडवून लावु शकते तसेच आपणही आहोत. आपण एक छोटीशी ठिणगीच आहोत, जी योग्य जागी पडली तर अपप्रवृत्तीला परतवून लावु शकु...”, रामुकाका म्हणाले.

सुर्य मावळतीकडे झुकला तसे रामुकाका उठून उभे राहीले. सगळ्यांनी एकमेकांकडे एकवार पाहीले आणि मग ती पेटी घेऊन आपल्या खोलीत परतले.

खोलीमध्ये आल्यावर रामुकाकांनी आपल्या सदऱ्याच्या खिश्यातून विटेचा एक तुकडा काढला जो बहुदा त्यांनी नेत्राच्या घरातून परतताना वाटेतून उचलून आणला होता.

रामुकाकांनी समोरासमोर अशी ४ मंडलं त्या विटेच्या तुकड्याच्या सहाह्याने आखली. मग ते थोडेसे दूर गेले आणि गवताच्या काड्यांच्या सहाय्याने पाचवे मंडल थोडेसे तयार केले.

"कोणतेही शुभ काम करताना आपण मंडल आखल्याशिवाय कामाला सुरुवात करत नाही. बरोबर?", रामुकाकांनी विचारले.

सर्वांनी होकारार्थी माना हलवल्या.

"असं म्हणतात की मंडल हे ब्रम्हा, विष्णू, रुद्र, लक्ष्मी आणि अग्नी देवतांसाठी स्थान निर्माण करते. त्याच्या अस्तीत्वाने ह्या देवतांचा त्या जागी वास होतो असंच आपला धर्म आपल्याला सांगतो. जेंव्हा आपण आपलं काम सुरु करु तेंव्हा शाल्मली सोडून आपण सर्वजणं ह्या मंडलामध्येच बसणार आहोत जेणेकरून कुठलीही वाईट शक्ती आपल्याला हात लावु शकणार नाही.", रामुकाका म्हणाले

"पण शाल्मली का नाही?", आकाशने विचारले.

"जसं मी मगाशी म्हणालो, आपण शाल्मलीचाच उपयोग नेत्राचा शेवट करण्यासाठी करणार आहोत आणि त्यासाठी नेत्रा शाल्मलीच्या शरीरात प्रवेश करणं महत्वाचं आहे. शाल्मली जर मंडलाच्या आतमध्ये असेल तर नेत्रा तिच्या शरीरात प्रवेश करु शकणार नाही..", रामुकाका म्हणाले..

मग शाल्मलीकडे वळून ते म्हणाले, "योग्य वेळ येताच मी तुला त्या मंडलाच्या आतमध्ये प्रवेश करायला सांगेन. अर्थात तुला तुझ्याच शरीराकडून विरोध होईल कारण तुझ्या शरीरावर त्या वेळी फक्त तुझाच नाही तर नेत्राचाही ताबा असेल. पण तू तुझी सर्व शक्ती पणाला लाव आणि ह्या मंडलामध्ये प्रवेश करं"

"रामुकाका, केवळ उत्सुकतेपोटी विचारतो, पण तसं केल्यानंतर काय होईल?", जयंता

“जयंता, गरुड पुराण सांगते, मंडलशिवाय प्राण त्याग केला तर त्या आत्म्याला पुढील जन्मासाठी योनी प्राप्त होत नाही, त्याचां आत्मा हवेबरोबर इतरत्र भटकत रहातो. एकदा का नेत्रा ह्या मंडलात आली की जे काही करायचं आहे ते मी करीनच, पण जर आपला विजय झाला तर त्यावेळी नेत्राच्या आत्म्याला मुक्ती मिळणं आवश्यक आहे आणि हे मंडल, आणि ह्या भोजपत्रात लिहिलेले काही मंत्र तिला त्याकामी मदत करतील..”, रामुकाका म्हणाले.

रामुकाकंनी त्यानंतर करावयाच्या क्रिया आणि त्यामधील प्रत्येकाची भुमीका सगळ्यांना समजावून सांगितली. मोहीतला पुन्हा पुन्हा त्या मंडलाबाहेर काहीही झालं तरी यायच् नाही हे सांगून झालं.

पौर्णिमेसाठी अवघ्या काही तासांची प्रतिक्षा असणारा चंद्र डोक्यावर आला तसे रामुकाकांनी सर्वांना हाताने खुण केली आणि सर्वजण आप-आपल्या आखलेल्या मंडलात जाऊन बसले, तर शाल्मली बेडवरच बसुन राहीली.

रामुकाकांनी हात जोडले आणि डोळे मिटून ते म्हणाले...

“य्प्रज्ञानमुक्त चेतो धृतीश्च य्ज्योन्तिरान्त्मृत प्रजासु |

यस्मात्र हृते किं चन कर्म क्रियते तन्मे मनः शिवासंकाल्प्रमास्तु: ||”

रामुकाकांचे बोलणे झाल्यावर इतरांनीही तो मंत्र पुटपुटला.

मग रामुकाका म्हणाले, “ह्याचा अर्थ जो ज्ञानी आहे, जो धैर्यरूप आहे, जो मानवजातीच्या हृदयात राहून सर्व इंद्रियांना शक्ती प्रदान करतो, जो स्थूल शरीराच्या मृत्यू

नंतरही अमर रहतो. ज्याच्याशिवाय कोणतेही कर्म करणे कठीण आहे असे माझे मन, माझा आत्म्याचे भगवंताच्या कृपेने कल्याण होवो.”

स्थिरपाण्यामध्ये एखादा दगड मारावा आणि तो छोट्टास्सा दगड त्या घनगंभीर पाण्याच्या पृष्ठभागावर असंख्य लहरी उमटवून जातात. पाण्यावर उमटलेल्या लहरी, समुद्रात निर्माण होणाऱ्या लाटा ह्या मनुष्याच्या नजरेस दिसणाऱ्या भौतीक गोष्टी असतात, पण त्या निर्माण करणाऱ्या अदृष्य शक्ती फक्त जाणवतात, त्या दिसत नाहीत, तसंच काहीसं तेथे घडलं. शांत असलेल्या त्या वातावरणात अचानक खळबळ उडाली. वाऱ्याचा एक तुफानी झोत खोलीतल्या वस्तु हलवून गेला.

सर्वजण ह्या अनपेक्षीत घटनेने दचकून गेले आणि मग त्यांची नजर शाल्मलीकडे गेली.

आपण आपली मान अवघडल्यावर जशी मान गोलाकार फिरवतो, तसाच काहीसा प्रकार डोळे मिटलेल्या शाल्मलीच्या बाबतीत होत होता. ती स्वतःशीच असंबध्दपणे तोंडातल्या तोंडात ’हम्म… हम्म..’ असा सुर काढत होती.

रामुकाकांनी सर्वांना हातानेच शांत रहायची खूण केली.

“का रं म्हाताऱ्या, गोड बोलून तुला कळेना झालंय का? आज तुजा मुडदा पाडल्याबिगर म्या शांत नाय बसनार..”, असं म्हणून शाल्मली उठून उभी राहीली. खरं तर त्याला उभी राहीली म्हणणं चुकीच ठरेल कारण तिची पावलं जमीनीपासून काही इंच वरच होती, तिचे हात पाय कडक झाले होते, विस्कटलेले केस तिचा चेहरा जणु काही झाकुनच टाकत होते.

शाल्मली रामुकाकांच्या दिशेने येत होती.

सर्वचजण हातापायाची बोटं घट्ट करून आता काय होणार ह्याचीच प्रतिक्षा करत होते.

शाल्मली मंडलापर्यंत आली आणि अचानक कश्याचा तरी चटका बसावा तशीच जागेवर थिजून उभी राहीली. मग तिने इतरांकडे आणि त्यांच्या भोवती आखलेल्या मंडलांकडे पाहीले आणि म्हणाली.. “अरं बाबा.. तू तर साधु झाला की रं.. अरं पण ह्या पोरीचं काय करशीलं रं, ती पुर्णपणे माझीया ताब्यात हाय नं.. मारु हिला मारु??”

“नाही नेत्रा.. तू तसं करणार नाहीस… तुला तुझ्या मालकानं तसं करण्याची परवानगी दिलेली नाही…”, रामुकाका म्हणाले..

“माझा मालक?? कोन माझा मालक?”, नेत्रा म्हणाली..

“तोच.. जो तळघरात लपून बसला आह्रे.. जो तुझ्याकडून सर्वकाही करवून घेत आहे… त्रिंयबकलाल…”, रामुकाका म्हणाले

“त्यो.. लंगडा?? त्यो माझा मालकं???” असं म्हणून नेत्रा छद्मी हसली.. “त्यो कसला माझा मालक?”

“नाही? तो तुझा मालक नाही? बरं राहीलं, तू म्हणतीस ते खरं! पण काय गं? तो इतका आवडायचा का गं तुला की त्याने तुला मारून टाकला तरी पण तू त्याच्या सर्वशक्तीमान होण्यासाठी स्वतःचा जीव पणाला लावते आहेस???”, रामुकाका म्हणाले

“ए म्हाताऱ्या, काय बोलत्योयेस तु, मला काय कळेना…”, नेत्रा म्हणाली.

रामुकाकांनी आकाशला एक सांकेतीक खुण केली आणि परत ते नेत्राशी बोलू लागले…”हम्म.. म्हणजे तुला काहीच आठवत नाहीये तर… बर हे बघ, हे बघून तुला काही

आठवते आहे का?", असं म्हणून रामुकाकांनी त्या पेटीतून तो फोटो बाहेर काढुन नेत्राच्या समोर धरला

तो फोटो पाहून शाल्मलीच्या चेहऱ्यावर आश्चर्याचे, गोंधळलेले भाव उमटले..

रामुकाकांनी केलेल्या सांकेतीक खुणेचा अर्थ आकाशने ओळखला होता आणि त्याने मनातूनच शाल्मलीला साद घालायला सुरुवात केली होती.. "शमु.. ऐकते आहेस ना तु.. शमु... तुला माहीती आहे ना आता काय करायचं आहे? आम्ही सर्व तुझ्या सोबत आहोत शमु.. फक्त इतक करं.. मग बघ त्या नेत्राला कसं पळवून लावतो आपण.. फक्त एवढंच कर शमु.. आय लव्ह यु शमु...."

रामुकाकांनी नेत्राला बोलण्यात इतके गुंतवून ठेवले होते ते मंडल ओलांडताना झालेला अतीतिव्र, जळका स्पर्शाने नेत्रा भानावर आली, पण एव्हाने ती मंडलाच्या आतमध्ये येऊन अडकली होती. शाल्मलीने तिला त्या मंडलाच्या आत आणून ठेवले होते.

बाहेर पडता येत नाही म्हणल्यावर नेत्रा सैरभर झाली आणि संतापाने बेभाव होऊन तिने शाल्मलीच्या दोन तिन मुस्काटात ठेवून दिल्या. त्याचा प्रहार इतका जोरात होता की त्या बोटांचे वळ शाल्मलीच्या नाजुक त्वचेवर उमटले.

आकाश संतापून उभा राहीला, परंतू रामुकाकांनी त्याला शांत बसायची खुण केली.

"आता कसं छान झालं.. आता तू माझं म्हणणं शांतपणे ऐकून घे..", रामुकाका म्हणाले.

नेत्रा संतापाने बेभान झाली होती, तिला त्या मंडलाबाहेर पडायची इच्छा असुनही पडता येत नव्हते आणि त्यामुळे ती अजूनच बेचैन होत होती.

"हा फोटो तुझा आणि तुझ्या आईचा ना?", रामुकाका म्हणाले..

“व्हयं…”, रागाच्या स्वरात नेत्रा म्हणाली..

“आणि हा गोड फ्रॉक.. तुझाचं ना?”.. रामुकाका

नेत्रा कुतुहलाने त्या फ्रॉककडे बघत होती. एका छोट्या मुलीचे आपल्याच आवडत्या ड्रेसकडे बघताना असतात तसे भाव शाल्मलीच्या चेहऱ्यावर तरळून गेले.

“आणि ह्या बिट्याच्या बिया… बहुदा तू आणि तुझ्या आईचा दुपारचा आवडीचा खेळ असणार नाही का???”, रामुकाका त्या बिया हातात धरत म्हणाले

“ह्ये कुठं मिळालं तुला सगळं? माझ्या घरी गेला व्हतास?”, नेत्रा

“हम्म.. चला म्हणजे ते तरी आठवतं आहे तुला तर..”, रामुकाका हसत म्हणाले आणि मग त्यांनी त्या सर्व वस्तु त्या पेटीत ठेवून दिल्या आणि पेटीचे झाकणं बंद करून टाकले व मग पुढे म्हणाले.. “बरं मध्ये आध्ये काय झालं, मला त्याच्याशी काही घेणं नाही. मला सांग त्रिंबकलाल भेटल्यानंतर काय झालं?”

“म्या नाय सांगनार, मला इथून जाऊ द्ये..”, नेत्रा संतापून म्हणाली.

“तुला सांगावंच लागेल नेत्रा..!!”, असं म्हणून रामुकाकांनी शेजारीच ठेवलेली एक लांब काठी उचलली आणि त्या मंडलाच्या गवताची पान हळुवारपणे आणि सावधानतेने काही कण आत सरकवली जेणेकरून त्या मंडलाच्या कक्ष्या छोट्या होतील..

“म्हाताऱ्या बऱ्या बोलानं जाऊ द्ये मला..”, इकडे तिकडे बघत नेत्रा म्हणाली.

“कोणाला शोधते आहेस, त्र्यिंबकलाल ला? तो नाही येणार वाचवायला तुला. अरे ज्याने तुला मारले, तो कश्याला तुला वाचवेल. तो फक्त तुला वापरतो आहे, त्याच्या स्वार्थासाठी. तो अजूनही अशक्तच आहे. स्वतःची सर्व शक्ती त्याने आजपर्यंत तुला जिवंत ठेवण्यासाठी वापरली आहे जेणेकरून त्याच्यासाठी तू जिवावर खेळशील आणि त्याला ह्या कोंदणातून बाहेर काढशील..”, रामुकाका म्हणाले

“काय बोल्तो आहेस तु, मला काहीबी कलत नाय..”, गोंधळलेली नेत्रा म्हणाली.

“बरं ठिक आहे, तसंही तू जे काही सांगणार तेच जगाला माहीत होते आणि तेच मला पण आधी माहीत होते, त्यामुळे तुझ्याकडून मला नवीन तर काही कळणार नाहीच. पण तुला सांगण्यासाठी माझ्याकडे खुप काही आहे..ऐक तर मग.. “, असं म्हणून रामुकाका बोलू लागले..

“सर्वप्रथम मला सांग नेत्रा, तुझा मृत्यु कसा काय झाला?”, रामुकाकांनी विचारले

“म्या उडी टाकली इहिरीमंदी, आत्मात्या केली म्या..”, नेत्रा म्हणाली.. “माजं जगणं नामुन्कीन झालं होतं, ह्ये सारं गाव मला छी थु करत होत्ये. स्वतः तोंड लपून काळं करतील, म्या पकडलो गेलो तर मला हसु लागले म्हनुन जीव दिला म्या..”

“असं तुला वाटतं नेत्रा, कारण तुला तसं वाटावं असंच तुझ्या मालकान, अर्थात त्र्यिंबकलालने करणी केली आहे. मी सांगतो तुझा म्रुत्यु कसा झाला. निट आठव ती रात्र जेंव्हा तू पंतांकडे जायला निघाली होतीस. जर तुला तुझ्या कृत्याची शिक्षा देण्यात आली होती, तर तुझ्याबरोबर गुंतलेल्या इतरांचे सुध्दा उखळ उघडे करण्याच्या इराद्याने तू पंतांकडे जाणार होतीस. त्या रात्री चार काळया आक्रुत्या त्र्यिंबकलालच्या सांगण्यावरून तुझ्यावर झेपावल्या.

मनुष्याच्या रुपातील क्रुर पशुच ते जणु. त्यांनी तुझ्या शरीराच्या चिंधड्या उडवल्या आणि त्यानंतर तुला त्या विहीरीत ढकलून दिले....", रामुकाका

"नाही, खोटं आहे हे...",नेत्रा

"आठव तुझा अंगठ्याएवढा आत्मा तुझ्या देहातून बाहेर पडून मोक्ष प्राप्तीसाठी निघाला होता.. आठव नेत्रा तो बिकट प्रवास.. कित्येक दऱ्या खोरं पार करून तू वैतरणा नदीपर्यंत पोहोचली होतीस. आठव ती नदी.. रक्ता-मासाच्या चिखलानी भरलेली, अतृप्त, पापी आत्मे त्या दलदलीत अडकून पडले होते, तुला त्या चिखलात ओढण्याचा प्रयत्न करत होते आणि त्याच वेळी कुठल्याश्या शक्तीने तुला माघारी बोलावले.

ह्या बंगल्यात, तळघरात तुला आणण्यात आले. थकलेल्या, दमलेल्या तुला कुणीतरी शक्ती प्रदान केली, स्वतःच्या इंद्रीयांची शक्ती तुला देऊ केली. का? कारण त्याच्यासाठी मुक्तीचे, सर्व शक्तीमान होण्याचे मार्ग खुले करशील. तुझ्या खांद्यावर पाय देऊन तो इथून बाहेर पडेल.

प्रत्येक पौर्णिमेला बळी घेऊन तू त्याला शक्ती देऊ केलीस. कित्येक पौर्णिमा बळींशिवायच गेल्या, तर काही पौर्णिमेला तुमच्या नशीबाने सावज हाती पडले. गेली अनेक वर्ष हाच खेळ चालू होता. तुमच्या नशीबाने म्हणा, किंवा आमच्या दुर्दैवाने म्हणा आम्ही इथे पौर्णिमेच्या वेळेस अडकलो नाही तर हि पौर्णिमासुध्दा तुमच्या हातातून गेलीच होती..", रामुकाका बोलत होते..

"पण का? त्र्यिंबकलाल असं का करेल? त्याचं तर माझ्यावर प्रेम होतं... आणि माजं बी..", नेत्रा म्हणाली...

“पंत जितके मृदु, प्रेमळ होते, तितकेच कठोर, शिघ्र कोपी सुध्दा होते. त्रिंबकलालचा सहभाग सिध्द झाल्यावर पंतांनी त्याल शाप दिला होता..त्यांनी त्याची मुक्ती बंद केली होती जेणेकरून अनेक वर्ष तो इथंच तळघरात सडत पडेल.. अर्थात ही गोष्ट कुणालाच ठाऊक नाही.

पंतांनी अनेक वर्ष कष्ट करून अभ्यास करून सिध्दी प्राप्त करून घेतली होती चांगल्या कामांसाठी. परंतू छोट्या त्रिंबकलालने लहानपणापासूनच चोरून त्यांची पुस्तक, त्यांच्या टिपण्या वाचुन सिध्दी आत्मसात करायला सुरुवात केली आणि त्याचा उपयोग तो स्वतःच्या स्वार्थासाठी करु लागला. तू त्याच्यावर भुललीस ते त्याच्या रुपगुणामुळे नाही तर त्याने केलेल्या जादु-टोण्यामुळेच….”, रामुकाका

“त्ये मला काय माहीत नाय, मी माझा बदला पुर्ण करणार, इथं येणाऱ्या प्रत्येकाला मरावंच लागेल..”, नेत्रा पुन्हा संतापून म्हणाली

“कसला बदला नेत्रा, तुझं शरीर मातीत मिसळून अनेक तपं उलटून गेली. आता तुझं जे काही अस्तित्व आहे ते फक्त एका तेजस्वी पुंजक्याच्या रुपाने. आत्माच्या रुपाने. आणि कुठल्या शरीराचा तू गर्व करत आहेस? प्राणाशिवाय शरीर हे निस्तेज असते. कुणालाही त्याबद्दल क्षणभरातच घृणा वाटु लागते. प्राणाशिवाय असलेल्या शरीराला दुर्गंधी येते आणि असे शरीर काही दिवसांतच मातीमोल होऊन जाते.

प्रेत अर्थात प्र+इत म्हणजेच जो शरीरातून निघून गेला तो आत्मा, आणि आत्मा सोडून गेल्यावर जे राहीले ते प्रेत. मग अश्या फुटकळं शरीराचा गर्व कश्याला? ज्यांनी तुझ्यावर अत्याचार केले त्यांना त्यांची शिक्षा मिळालेली असेलच.”, रामुकाका

शाल्मलीच्या चेहऱ्यावर गोंधळाचे भाव स्पष्ट दिसुन येत होते…

“पण म्या ह्यावर विश्वास कसा ठेवावा?”, नेत्रा

“त्याची काळजी तू करु नकोस. मी तुला ह्या सर्व घटनांची आठवण करून देतो..”, असं म्हणून पंतांनी स्वतःकडील ती भोजपत्र उघडली आणि काही मंत्र उच्चारायला सुरुवात केली

रामुकाकांच्या प्रत्येक वाक्याबरोबर शाल्मलीच्या चेहऱ्यावरील भाव बदलत होते. आश्चर्याचे, वेदनेचे, दुःखाचे, संतापाचे भाव तिच्या चेहऱ्यावर तरळून जात होते.

रामुकाकांचे मंत्र म्हणून झाल्यावर शाल्मलीने डोळे उघडले. तिच्या चेहऱ्यावर घर्मबिंदु जमा झाले होते, तिचा श्वाच्छोत्स्वास जोरजोरात चालू होता.

“नेत्रा, तुला तुझा बदला घ्यायचा आहे ना, मग ही शेवटची संधी तुला उपलब्ध आहे. तुला फसवणारा, तुला इतके तपं मोक्ष-प्राप्तीपासून वंचीत ठेवणारा तो अजूनही तळघरात लपून बसला आहे. जा सुड उगव त्याच्यावर..”, रामुकाका म्हणाले

शाल्मलीने होकारार्थी मान डोलावली.

रामुकाकांनी एकवार आकाश आणि जयंताकडे पाहीले. दोघांनीही होकारार्थी माना डोलावल्या.

रामुकाकांनी पुन्हा एकदा शेजारी पडलेली ती काठी उचलली आणि त्या मंडलाची पुर्वेकडील काडी बाजुला सरकवली त्याबरोबर वातावरणात पुन्हा एकदा थोडीफार हालचाल झाली आणि काही क्षणातच शाल्मली कोसळून खाली पडली.

दोन क्षण रामुकाका थांबले आणि मग ते आपल्या मंडलाबाहेर आले, त्यांनी शाल्मलीला उठून बसवले आणि आपल्या कपाळाचे कुंकु तिच्या कपाळावर सुध्दा लावले. आकाश सुध्दा आपले मंडल सोडून बाहेर आला आणि त्याने शाल्मलीला पाणी प्यायला दिले. थोडी हुशारी येताच शाल्मली उठून बसली.

“शाल्मली तू इथेच मोहीतबरोबर थांब, आकाश, जयंता चला खाली, उर्वरीत कार्यक्रम आपल्याला संपवायचा आहे..” असं म्हणून रामुकाका तळघराच्या दिशेने चालू लागले.

तळघराचे दार उघडून तिघंही जणं जेंव्हा आतमध्ये आले तेंव्हा पुन्हा एकदा मनावर तोच दबाव, शरीराला हाडं गोठवून टाकणारी थंडीचा प्रत्यय तिघांना आला. हातामध्ये बॅटऱ्या घेऊन तिघंही जणं पायऱ्या उतरवून त्या खोलीकडे आले.

खोलीच्या दारातच नेत्रा पडलेली त्यांना दिसली. तिघांनीही आळीपाळीने एकमेकांकडे पाहीले. रामुकाकांनी आपल्या बरोबर आणलेल्या भांड्यातले थोडे पाणी ओंजळीत घेतले आणि भोजपत्रातील काही ओळी म्हणून ते थेंब त्यांनी नेत्राच्या कलेवलावर शिंपडले व म्हणाले..”आम्ही भगवंताकडे प्रार्थना करतो की तुला ह्यावेळेस मुक्ती मिळो…”

“तिला मुक्ती मिळेल तेंव्हा मिळेल रे, तुमंच काय?”, खोलीच्या कोपऱ्यातून आवाज आला.

तिघांनी प्रकाशझोत आवाजाच्या दिशेने टाकले.

कोपऱ्यात त्र्यिंबकलाल उभा होता.

“व्वा लंगड्या, नेत्राकडून शक्ती काढुन घेतल्यावर उभा राहीला लागलास की गड्या तु…”, रामुकाका म्हणाले.

त्रिंबकलालचा जबडा वासला गेला आणि आतून दिसणारे दोन भयंकर अणकुचीदार दात बाहेर आले.

तो त्या तिघांच्या दिशेने येऊ लागला.

एका झेपेच्या अंतरावर आल्यावर तो अचानक थांबला. त्याची नजर तिघांच्या कपाळावर स्थिरावली होती.

तिघांच्याही चेहऱ्यावर एक छद्मी हास्य पसरले, तसे त्रिंबकलालने अत्यंत भेसुर आवाजात एक आरोळी ठोकली. तळघरातल्या त्या अंधारलेल्या भिंतीवर आपटत कित्येक वेळ तो आवाज घुमत राहीला.

रामुकाकांनी भोजपत्र उघडून त्यात दिलेले मंत्र म्हणायला सुरुवात केली. ते तिघंही एक कडवं म्हणून झाल्यावर दोन पावलं पुढे जात, तसा त्रिंबकलाल एक पाउल मागे सरके.

काही पावलं आणि काही पद्य म्हणून झाल्यावर रामुकाका थांबले. त्यांनी खिश्यातून गवताची काडी काढली आणि पाण्यात बुडवून त्याच्या सहाय्याने जमीनीवर अग्नेय दिशेकडून पुर्व दिशेकडे जाणारी एक रेघ ओढली, व मग पुढे म्हणाले…”तुझ्या शेवटाची घटका येऊन ठेपली आहे त्रिंबकलाल. ही रेषा तुझा मार्ग. तू ठरवायचेस कुठे जायचे. पुर्व दिशा तुला मुक्ती प्राप्त करून देईल, तर अग्नेय दिशा.. अर्थात अग्नीची दिशा तुला भस्म करून टाकेल. ह्या दोन टोकांशिवाय तू कुठेही जाऊ शकत नाहिस त्रिंबक…”

“म्हाताऱ्या, तू मला नै सांगायचेस मी काय करायचे, मी माझ्या मर्जीचा मालक हाय.. तुम्हाला जिता सोडनार नाय मी”, असं म्हणून त्याने एक झेप रामुकाकंच्या दिशेने घेतली.

रामुकाका क्षणार्धात बाजुला झाले आणि पाण्याने भिजवलेली ती काडी त्यांनी त्र्यिंबकलालच्या अंगावर फेकली. अंगावर एखादे तप्त लोखंडी सळई पडावी तसा त्र्यिंबकलाल किंचाळून उभा राहीला.

"ठिक तर, जर तू तुझा मार्ग निवडणार नसशील, तर आम्हालाच तुला तुझ्या मार्गावर न्हेऊन ठेवले पाहिजे.." असं म्हणून रामुकाकांनी आकाश आणि जयंताला खुण केली व म्हणाले .. "द्वादशाक्षर मंत्र…."

तिघंही जणं एकसुरात तो मंत्र म्हणु लागले..

"ॐ भूर्भुवः स्वः तत्पुरुषाय विद्महे स्वर्ण पक्षाय धीमहि तन्नो गरुड़ प्रचोदयात"

हळु हळु तो आवाज त्र्यिंबकलालला असह्य होऊ लागला. कानावर हात ठेवून तो जोर जोरात किंचाळु लागला.

द्वादशाक्षर मंत्राची सात आठ आवर्तन झाल्यावर रामुकाका दोघांना उद्देशुन म्हणाले…

"आता आपण काही मुद्रिका दर्शन करणार आहोत. मी जसे सांगतो आणी करतो तसेच करा", असे म्हणून रामुकाकांनी आपल्या दोन्ही हातांचे अंगठ्यांनी त्या त्या हाताच्या अन्गुलिका, मधले बोट आणि करंगळीला खालच्या दिशेने वाकवले. मग दोन्ही हात एकमेकाना जोडले आणि म्हणाले, "हि नरसिंह मुद्रा .."

त्यानंतर त्यांनी हातांचे अंगठे सरळ हवेत करून ते एकमेकांमध्ये अडकवले. मग दोन्ही हात छातीपासून दूर धरून त्यांनी आसमंताला अभिवादन केले आणि मग त्यांनी जप सुरु केला…

"ओम अं वासुदेवाय नमः |

ओम आं बलाय नमः |

ओम हुं विष्णवे नमः |

ओम श्री नरसिंहाय नमः |”

आकाश आणि जयंता त्यांच्या सुरात सुर मिळवून त्या मंत्राचा जप करु लागले.

त्र्यिंबकलालने कानावर घट्ट हात धरले होते, पण तो आवाज त्याचा हात चिरून त्याच्या मेंदुपर्यंत घुसला होता.

“बंद करा ही भोंदु गिरी.. मी तुम्हाला इथून जावून देतो.. निघून जा इथून..”, त्र्यिंबकलाल म्हणाला..

“हि भोंदु गिरी त्र्यिंबक? आणि तू केलेस ते काय? आपल्या साधनेचा उपयोग गैरप्रकारे करून काय साध्य केलेस तु? पंतांनी ठरवले ते बरोबरच होते, तुला मुक्ती मिळताच कामा नये. कारण मुळ दोष तुझ्या आत्म्याचाच आहे. पुन्हा मनुष्य योनीत जन्मला असतास तर पुन्हा कुणाचेतरी वाईटच चिंतले असतेस. नाही आता तुला मुक्ती नाही…” असं म्हणून रामुकाकांनी भोजपत्राच्या शेवटच्या पानावर लिहीलेल्या सर्व ओळु वाचुन् काढल्या आणि भांड्यातले ते सर्व पाणी त्र्यिंबकलालच्या अंगावर फेकले.

अंगावर ॲसीड पडावे तसा त्र्यिंबकलाल तडफडु लागला आणि क्षणार्धात त्याच्या शरीरातून आगीचे लोळ निघाले. काही क्षण तो थयथयाट करत खोलीभर पळत राहीला आणि मग एका कोपऱ्यात जाऊन कोसळला.

रामुकाका, आकाश आणि जयंता जवळ गेले तेंव्हा तेथे एक राखेचा डोंगर शिल्लक राहीला होता.

“मुलांनो उठा, तुमच्यासाठी बाहेर एक गंमत आहे…”, दिवाणखान्यातच झोपलेल्या सर्वांना उठवत रामुकाका म्हणाले..

रामुकाका कसली गंमत दाखवत आहेत हे पहाण्यासाठी सर्वजण उठून बाहेर दारापाशी आले आणि रामुकाका बोट दाखवत होते त्यादिशेने पाहु लागले.

समोरच्या झाडावर पक्ष्यांचा एक थवा किलबिलाट करण्यात मग्न होता..

“आजपर्यंत आपण इथे एकही पक्षी, एकही प्राण्याचे अस्तित्व पाहीले नव्हते आणि आज अचानक इतके पक्षी इथे.. ह्यावरूनच आपण समजु शकतो इथले अमानवी, अघोरी शक्तींचे अस्तित्व संपलेले आहे.. नाहि का??”, रामुकाका म्हणाले.

बाहेरचे ते सुंदर दृश्य पहाण्यात सर्वजण मग्न होऊन गेले होते.

“बरं चला, तुम्ही आवरून घ्या. मी नाश्ता आणि दुपारच्या जेवणाची व्यवस्था करतो. तुम्ही मला इथं स्वयंपाकाच्या कामासाठी आणले होतेत आणि खरं तर माझी त्या कामात तुम्हाला काहीच मदत झाली नाही. तेंव्हा इथून जाण्यापुर्वी एकदा तरी माझ्या हातचा साग्रसंगीत स्वयंपाक होऊन जाऊ देतच..”, रामुकाका हसत म्हणाले.

“रामुकाका..”, रामुकाकांचा हात हातात घेत शाल्मली म्हणाली..”केवळ तुम्ही होतात म्हणून ह्या प्रकरणातून आम्ही सहीसलामत सुटलो…”

“नाही बेटा, मी नाही, आभार मानायचेच तर पंतांचे माना. त्यांनीच आपल्याला ह्या प्रकरणातून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवला”, असं म्हणून रामुकाका उठले आणि स्वयंपाकघरात कामासाठी गेले.

सर्वजण आवरण्यात मग्न होते तर मोहीत चेंडुशी खेळत होता. १५-२० मिनीटं झाली असतील, रामुकाका टेबलावर गरमागरम पोह्याच्या डिशेस मांडतच होते तेवढ्यात मोहीत धावत धावत आला आणि म्हणाला....”आई.. आई.. तिकडे.. तिकडे...”

“काय झालं मोहीत.. काय तिकडे???”, शाल्मली घाबरून म्हणाली...

“तिकडे.. टकलू ताई नाहीये अगं...”, असं म्हणून खट्याळपणे हासत मोहीत शाल्मलीला बिलगला.

बाकीचे सर्वजणही पोह्यांचा आस्वाद घेत त्या हासण्यात सामील झाले.....................

[समाप्त]

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील सुमारे साडॆतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत. महाराष्ट्राच्या जवळपास प्रत्येक तालुक्यातील खेड्यापाड्यांत ई साहित्य चे वाचक आहेत. याशिवाय सुमारे तीस ते चाळीस लाख वाचक ई साहित्यच्या वेब्साईटला भेट देऊन पुस्तके डाऊन लोड करतात. पण याने आमचे समाधान नाही. जोवर महाराष्ट्रातील प्रत्येक साक्षर हा वाचक होत नाही तोवर ही चळवळ चालेल. आमचे लक्ष्य सहा कोटींचे आहे. आमच्या पाठीशी माऊलींचा आशिर्वाद आहे. “ ईये मराठीचिये नगरी, ब्रह्मविद्येचा सुकाळू करी” ही त्यांची प्रार्थना आपणा सर्वांकरवी सुफ़ळ संपूर्ण व्हावी.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail. com या पत्त्यावर पाठवा बरं!